CMYK


|| जय माता जी ||



|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||

गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : ८ | अंक : ३९ | सोमवार दि. १४ सप्टेंबर २०२० ते रविवार दि. २० सप्टेंबर २०२० | पाने : ८ | किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com | महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक | crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ औरंगाबाद ■ लातूर ■ उस्मानाबाद ■ सोलापूर ■ नांदेड


## शिव्या घातल्याने संतापला फार माथेफिरुने केले म्हातारीला ठार

वाडा/संजय लांडगे



मयत रखमाई

माणसाच्या रागाला डोळे नसतात. त्यामुळे शुल्लक कारणावरून सुद्धा संतापलेल्या माणसाच्या हातून काहीही घडू शकते. कारण माणसाला स्वतःवर संयम राखता येत नाही. त्यामुळे तो मागचा पुढचा जराही विचार न करता एखाद्याचा जीवही घेऊ शकतो. वाडा तालुक्यातील कादिवली येथे शेतात गुरे गेल्याच्या कारणावरून झालेल्या भांडणात एका माथेफिरूने त्याला शिव्या घालणाऱ्या वृद्ध महिलेच्या डोक्यात दगड घालून तिची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे. मात्र वृद्ध महिलेच्या हत्येने वाडा तालुक्यात संतापाचे वातावरण परसले असून या घटनेमुळे वृद्धांची सुरक्षा पुन्हा ऐरणीवर आली आहे.

वाडा शहरापासून हाकेच्या अंतरावर असलेल्या कादिवली येथे मंगळवारी रात्रीच्या सुमारास एका वृद्ध महिलेच्या डोक्यात दगड घालून तिची हत्या केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी पोलिसांनी आरोपीला तातडीने अटक केली आहे. मयत वृद्धेच्या शेतात आरोपीने बैल चारण्यास नेले होते. याबाबत मयत वृद्धेने शिवीगाळ केल्याचा राग धरून सदर महिलेच्या डोक्यात दगड घालून तिचा खून केल्याची माहिती पोलीस सूत्रांनी दिली आहे. कादिवली येथे राहणारी वृद्ध महिला रखमाई धर्मा गवते (वय ६५) हिला जीवे ठार मारण्याच्या इराद्याने डोक्यात दगडाने वार करून अज्ञात व्यक्ती पसार झाला आहे. रात्री उशिरा ही खबर पोलिसांना मिळाली असून पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेऊन या प्रकरणी वाडा पोलीस स्टेशनमध्ये भा.दं.वि.स. ३०२ व २०१ प्रमाणे गुन्ह्याची नोंद करण्यात आली असून दोन संशयितांना ताब्यात घेतले असल्याची माहिती पोलीस सूत्रांकडून मिळाली आहे. या प्रकरणी अधिक तपास पोलीस निरीक्षक जयकुमार सूर्यवंशी करत आहेत.

# विवाहितेच्या हत्या प्रकरणात संशयाने घेरलेत जळकोट पोलीस पुन्हा 'खलनायक' ठरलेत?




जळकोट/क्राईम रिपोटर

कोणत्याही सराईत गुन्हेगाराला एखादे प्रकरण पचले कि त्याचा आत्मविश्वास वाढतो आणि मग तो तसेच गुन्हे करायला लागतो. हि मानसिकता फक्त गुन्हेगारांच्याच बाबतीत असते असे नाही, तर काही पोलिसांमध्येही अशाच प्रकारची मनोवृत्ती आजकाल जोर धरू लागली आहे. आपण काहीही केले कुणाच्याही बाबतीत कसेही वागलो, तरी आपल्यायला कुणीही विचारणारे नाही. म्हणून काही पोलीस ठाण्यांमधील अधिकारी अत्यंत मुजोर बनलेत. तर काही पोलीस अधिकारी मात्र प्रामाणिकपणे आपली सेवा बजावताना जनतेशी, प्रसार माध्यमांशी सौजन्याने वागतात. आपण जनतेचे मालक नसून सेवक आहोत याचे भान राखून काम करतात. अशा पोलिसांचा लोकंही आदर करतात. पण जे मुजोरी दाखवतात त्यांची मात्र कधी ना कधी खाट टाकण्याची लोक संधी शोधात असतात. लातूर जिल्ह्यातील जळकोट पोलीस ठाण्यातील पोलीस अधिकारी सुध्दा असेच मुजोर बनले असल्याचा आरोप त्या भागातली जनता करीत आहे. बालाजी कांबळे हत्याकांडातील आरोपींना वाचवण्याच्या आरोपावरून जळकोट पोलीस अगोदरच संशयाच्या भोवऱ्यात असताना आता रेखा बालाजी चव्हाण खून प्रकरणात सुद्धा पोलिसांनी लपवा छपवी करीत असल्याचा गंभीर आरोप रेखाच्या माहेरच्यांनी केला आहे. तेंव्हा या प्रकरणाचा तपास जळकोट पोलिसांकडून काढून घेऊन तो सीआयडीकडे सोपवावा अशीही मागणी केली जात आहे.

उदगीर तालुक्यातील सोमनाथ पीर तांडा येथे राहणारे केरबा आडे यांची मुलगी रेखा हिचा दोन महिन्यापूर्वी जळकोट तालुक्यातील बालाजी चव्हाण याच्याशी विवाह झाला होता. सुरवातीचे फक्त काही दिवसच सुखाचे गेले. मात्र त्यानंतर बालाजी आणि रेखा यांच्यात काहीना काही कारणावरून भांडणे होऊ लागली आणि ६ सप्टेंबर रोजी रात्री रेखा हिने शेतातील घरात गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळली. दुसऱ्या दिवशी सकाळी याबाबतची माहिती रेखाचा पती बालाजी कांबळे यांनी पोलिसांना कळवली. त्यानंतर पोलीस घटनास्थळी आले आणि त्यांनी रेखाचा मृतदेह पंचनामा ...पान २ वर

## खाकीवर्दीकडूनच विश्वासघात झाला पोलीस अधिकाऱ्यानेच बलात्कार केला



आरोपी विपिन हसबणीस

सांगली/क्राईम रिपोर्टर

कोणत्याही अनोळखी माणसाला कधीही आपली खरी माहिती सांगू नये. अगदी तो पोलीस कर्मचारी असला तरीही अनोळखी असेल तर त्याच्यावरही जास्त विश्वास ठेवू नये. लिफ्ट देण्याच्या बहाण्याने एका पोलीस अधिकाऱ्याने एका तरुणीला आणि तिच्या आजीला आपल्या गाडीत बसवले आणि त्यांच्याशी गोड बोलून त्या मुलीचा नंबर घेतला. नंतर सतत फोन करून ओळख वाढवली आणि स्पर्धा परीक्षेला तुला माझी पत्नी मदत करील असे सांगून तिच्यावर वारंवार बलात्कार केला. या प्रकरणी पिडीत तरुणीच्या तक्रारीवरून पोलिसांनी आरोपी पोलीस अधिकाऱ्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. तसेच त्याला पोलीस सेवेतून निलंबित करण्यात आले आहे.

स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी मार्गदर्शन करेन असे आमिष दाखवून २८ वर्षीय तरुणीवर वारंवार बलात्कार केल्याप्रकरणी गुन्हा दाखल झालेल्या कडेगाव (जि. सांगली) पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विपिन हसबणीस याच्यावर कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक डॉ. सुहास वारके यांनी निलंबनाची कारवाई केली आहे. पीडित तरुणी व तिची आजी कासेगाव ता. वाळवा येथील बसस्थानकाजवळ थांबल्या होत्या. दरम्यान हसबनीस आपल्या गणवेशामध्ये कोल्हापूरहून कराडच्या दिशेने जात असताना त्याला पीडित तरुणी व तिची आजी वाहनाच्या प्रतिक्षेत थांबल्या असल्याचे दिसून आले. हसबणीस याने पीडित मुलगी कुठे जाणार आहे, लॉक डाऊन असल्यामुळे तुम्हाला वाहन मिळणार नाही. तुम्हाला मी कराडपर्यंत सोडतो असे सांगून दोघींना त्याच्या गाडीमध्ये बसवून घेतले.

कराडपर्यंतच्या प्रवासादरम्यान त्याने पीडित तरुणीचा मोबाईल नंबर मागून घेतला. प्रवासात पीडित तरुणीने ती स्पर्धा परीक्षेची तयारी करत असल्याचे ...पान २ वर



उपविभागीय अधिकारी पिंगळे

## सोन्याच्या चैनीवर ठेवला डोळा मित्रानेच दाबला मित्राचा गळा

कासारवडवली/क्राईम रिपोर्टर

सध्या माणूस इतका स्वार्थी बनलाय कि स्वतःच्या पलीकडे तो कुणाचाही विचार करायला तयार नसतो आणि पैशा समोर तर त्याला कुणाचीही परवा नसते. पैशासाठी जिथे माणूस जन्मदात्या आई-वडिलांचा खून करू शकतो, तिथे मित्राचे काय? कासारवडवली येथे अशाच एका घटनेमध्ये चार तोळ्याच्या सोन्याच्या चैनीसाठी एका मित्रानेच मित्राचा गळा दाबून खून केला आणि प्रेत गोणीत भरून खाडीत टाकले. मात्र रिक्षा चालकाने दिलेल्या जबानीवरून पोलिसांनी आरोपी आणि त्याच्या साथीदारांना अटक केली.



घोडबंदर रोडवरील वाघबीळ येथे राहणारा अक्षय हेमंत डकी हा तरुण बेपत्ता झाल्याची फिर्याद ४/९/२०२० रोजी कासार वडवली पोलीस ठाण्यात नोंदवण्यात आली होती. त्यानंतर पोलिसांनी शोध सुरु केला. अक्षयचे मित्र मंडळी नातेवाईक सर्वांकडे शोध घेतला. पण तो सापडला नाही. अक्षयच्या तपासासाठी पोलिसांची दोन पथके संपूर्ण घोडबंदर रोड परिसरातील वेग वेगळ्या भागात शोध घेत होती. पण तो सापडला नाही. त्यामुळे अक्षयचा घातपात झाला असावा असा ...पान २ वर

## दहा लाखांच्या खंडणीसाठी अचूक साधला नेम मुंबईतील शुटरांनी केला व्यावसायिकाचा गेम

मुंबई/एस.कुमार

आजकाल रिअल इस्टेट क्षेत्र हे पूर्णपणे गुन्हेगारांच्या ताब्यात गेलेले आहे. त्यामुळे जमीन बळकावण्यापासून ते बिल्डरांकडून खंडणी वसूल करण्यापर्यंत वेगवेगळ्या प्रकारच्या गुन्ह्यात गुन्हेगारी टोळ्या सक्रीय आहेत. कर्नाटकातील हुबळी येथील रियल इस्टेट व्यावसायिक इरफान हंचनाल याच्या हत्येची मुंबईतील गुंडांना सुपारी देण्यात आली होती आणि त्या सुपारीबाजांनी १० लाखांची सुपारी घेऊन इरफानचा हुबळीला जावून गेम केला. मात्र पोलिसांच्या कचाट्यातून ते निसटू शकले नाहीत. पोलिसांनी या सुपारीबाजांना अटक केली.

दि.६ आगस्ट २०२० रोजी कर्नाटक राज्यातील धारवाड येथील ओल्ड हुबळी पोलीस ठाण्याच्या हद्दीत रियल इस्टेट व्यवसायिक इरफान अल्लाबक्ष हंचनाल उर्फ अलियास उर्फ फुट इरफान (वय ४५) हे आपल्या ऑफिसमध्ये बसले असताना, त्यांच्यावर कोणी तरी अज्ञात इसमांनी अग्नीस्त्रामधून गोळीबार केला होता. या हल्ल्यात ते गंभीर जखमी झाले होते. रक्तबंबाळ अवस्थेत त्यांना तातडीने तेथील रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले मात्र उपचारापूर्वीच डॉक्टरांनी त्यांना मयत घोषित केले. या प्रकरणी ...पान २ वर

## मेव्हणीवर संशय घेणे महागात पडले जावयाला मारून सासुरवाडीत गाडले

निपाणी/क्राईम रिपोर्टर

दारुडा नवरा हा केवळ त्याच्या बायकोच्याच डोक्याला ताप ठरत नाही, तर त्याच्या घरच्या लोकांसाठी ही तो मोठी डोकेदुखी ठरलेला असतो. गडहिंग्लज येथील सचिन भोपळे या दारुड्याच्या बाबतीतही तसेच घडत होते. तो दारू पिऊन जोवर बायकोला त्रास देत होता तोवर सर्व ठीक होते. पण तो जेंव्हा तिच्या माहेरच्या लोकांना शिव्या घालू लागला आणि मेव्हणीच्या चारित्र्यावर संशय घेऊ लागला तेंव्हा मात्र त्याची पत्नी बिथरली आणि मग तिने माहेरच्या माणसाना सांगून पतीच्या हत्येचा कट रचला. त्यानुसार पतीला माहेरी बोलावून घेतले आणि आपली बहिण आणि भावाच्या मदतीने त्याला ठार मारून माळरानावरच्या घराजवळच गाडले. मात्र त्यांच्या एका चुकीमुळे त्यांच्या दुष्कृत्याचा पर्दाफाश झाला आणि पोलिसांनी सर्व आरोपींना अटक केले.





गडहिंग्लज येथील सचिन भोपळे याचा विवाह गेल्या दहा अकरा वर्षापूर्वी हंचिनाळ येथील राजाराम घाटगे यांची मुलगी अनिता हिच्याबरोबर झाला होता. अनिता ही दिसायला देखणी आणि सुंदर होती. त्या दोघांचा संसार फुलत होता. त्याना एक मुलगा ही झाला. मुलगा झाल्याने... पान २ वर

## त्याचे तिच्यावर मुळीच नव्हते प्रेम मन भरताच याराने केला तिचा गेम

मेरठ/क्राईम रिपोर्टर



शरीर सुखाला चटावलेली बाई हि एखाद्या नागिनी सारखी असते आणि हि नागीण कधी डंख मारेल याचा भरोसा नसतो आणि विवाह बाह्य संबंध हे सुद्धा फार काळ टिकत नाहीत. कारण पर पुरुषाला जोवर त्या बाईच्या शरीराचे आकर्षण असते तोवरच तो तिच्यात गुंतलेला असतो. आकर्षण संपले कि मग तो तीला टाळू लागतो. हसीना हिने दुकानात काम करणाऱ्या नोकराला जवळ केले. बरेच दिवस त्या दोघांचे चोरटे संबंध सुरु होते. पण काही काळाने हसीनाच्या तरुण प्रियकराचे तिच्यावरून मन उडाले. त्यामुळे तो तिला टाळू लागला. पण ती त्याचा पिच्छा सोडत नव्हती. अखेर एकेदिवश त्याने तिला शेतात बोलवून तिला ठार मारले आणि सुटका करून घेतली. मात्र पोलिसांनी त्याला अटक केली आहे.

विवाहित हसीना ही दिसायला देखणी आणि चिकनी होती. ती चार मुलांची आई असली तरी तिची सळसळीत जवानी ...पान ६ वर

## भ्रष्टाचारात महिलाही मागे नाही राहिल्या उपजिल्हाधिकारी मॅडम लाचखोर निघाल्या



उपजिल्हाधिकारी सूर्यवंशी

परभणी/क्राईम रिपोर्टर

भ्रष्टाचार हि समाजाला लागलेली एक कीड आहे. पण भ्रष्टाचाराच्या या वृक्षाची पाळेमुळे इतकी खोलवर रुजली आहे कि ती खणून काढण्यासाठी एकटे अण्णा हजारे पुरे पडणार नाहीत. कारण खालपासून वरपर्यंत सर्व शिष्टीमच भ्रष्टाचाराने पोखरलेली आहे आणि आता भ्रष्टाचारात महिलाही मागे राहिलेल्या नाहीत. परभणीत रस्ता अनुदानासाठी आलेल्या निधीच्या मान्यतेसाठी महिला उप जिल्हाधिकारी स्वाती सूर्यवंशी यांनी साडेचार लाखांची लाच मागितली. या प्रकरणी भ्रष्टाचार विरोधी पथकाने त्यांना दोन कारकुनांसह अटक केली आहे.

परभणीच्या निवासी उपजिल्हाधिकारी स्वाती सूर्यवंशी यांच्यासह दोघे कारकुन लाच स्वीकारल्या प्रकरणी एसीबीच्या जाळ्यात आज सापडले. एसीबीच्या पथकाने आज ही कारवाई केली. शासनाच्या विशेष रस्ता अनुदानासाठी आलेल्या निधीची प्रशासकीय मान्यता देण्यासाठी असलेल्या निधीच्या दीड टक्के साडेचार लाख रुपयांची लाच त्यांनी मागितली होती. परभणीच्या गंगाखेड नगरपरिषेदत पाच प्रभागांसाठी मिळून विशेष रस्ता अनुदानासाठी तीन कोटी रुपयांचा निधी मिळालेला होता. याबाबत तांत्रिक मान्यता घेऊन देखील कित्येक दिवस उलटले तरी ...पान २ वर

## सवर्णांनी हत्या केलेल्या बालाजी कांबळे यांच्या कुटुंबियांना क्राईम संध्याने मिळवून दिला न्याय!

देवणी/क्राईम रिपोर्टर

सवर्णाच्या सोयाबीनच्या शेतात मातंगाच्या बकऱ्या गेल्याने बालाजी कांबळे नावाच्या मातंगाची हत्या करण्यात आल्याची संतापजनक घटना लातूर जिल्ह्याच्या जळकोट तालुक्यातील येवरी गावात घडली होती. मात्र हे प्रकरण पोलिसांनी दाबण्याचा प्रयत्न सुरु केला होता. पण क्राईम संध्या वृत्तपत्राने हे संपूर्ण प्रकरण उघडकीस आणले. त्यामुळे आरोपींना तर अटक झालीच, पण पिडीत कांबळे कुटुंबियांना समाज कल्याण केंद्राकडून सव्वा आठ लाखांची मदतही मिळाली. या बद्दल कांबळे कुटुंबीयांनी क्राईम संध्याचे जाहीर आभार मानून या प्रकरणातील आरोपींना कठोर शिक्षा मिळण्यासाठी आवश्यक ती कायदेशीर मदत आणि जनतेचे नैतिक पाठबळ मिळवून देण्याचे आश्वासन क्राईम संध्याचे संपादक लक्ष्मणराव पाटोळे यांनी दिले आहे.


गुन्हेगारीचा कर्दनकाळ

क्राईम संध्या

सवर्णांच्या मुजोरीमुळे दलितांचे जीवनच धोक्यात आले

शेळी शेतात गेली म्हणून एका गरीब मातंगाला ठार केले

फिर्यादीवर प्रकरण मिटवण्यासाठी दबाव

येवरी गावातील बालाजी कांबळे यांच्या हत्येने संपूर्ण मराठवाडा हादरला होता. केवळ बकऱ्या शेतात गेल्याच्या शुल्लक कारणावरून मादलापुरे कुटुंबीयांनी बालाजी कांबळे यांना लोखंडी रॉड आणि काठ्यांनी मारहाण केली होती. यावेळी त्यांच्यासोबत असलेला त्यांचा भाऊ केशव कांबळे यालाही मारहाण करण्यात आली होती. मात्र बालाजीची प्रकृती अत्यंत गंभीर होती. त्यातच उदगीरच्या माऊली रुणालयात कोरोनामुळे बेड उपलब्ध नसल्याने त्याला दाखल करून घेण्यात आले नव्हते. त्यामुळे तो घरीच वेदनेने तडफडून मेला. या प्रकरणी गजानन मादलापुरे, विवेकानंद मादलापुरे, काशिनाथ मादलापुरे आणि चंद्रकला मादलापुरे यांच्यावर गुन्हा दाखल होऊनही त्यांना अटक होत नव्हती. त्यामुळे या प्रकरणाला क्राईम संध्याने १७ ऑगस्ट २०२० च्या अंकात बातमी छापून वाचा फोडली. त्यामुळे संपूर्ण लातूर जिल्ह्यात खळबळ माजली. त्यातच डीवायएसपीपासून पोलीस ठाण्यातील तपास अधिकाऱ्यांपर्यंत कुणीही ...पान ६ वर

CMYK

## पान १ वरून....

### विवाहितेच्या हत्या प्रकरणात संशयाने ...

करून शवविच्छेदनासाठी रुग्णालयात पाठवला. आश्चर्याची गोष्ट म्हणजे गावातील लोकांमध्ये रेखा आणि बालाजीच्या भांडणाची चर्चा असतानाही पोलिसांनी याबाबत जराही चौकशी केली नाही. तर दुसरीकडे मुलीच्या माहेरचे लोकही रेखाची आत्महत्या नसून हत्या आहे असा आक्रोश करून गोंधळ घालीत होते. तसेच रेखाच्या सासरच्या मंडळीना तातडीने अटक करा अशी मागणी करीत होते. दरम्यान रेखाचा शवविच्छेदन अहवाल आला त्यात रेखाचा गळा आवळून खून करण्यात आला असल्याचे नमूद करण्यात आले होते. त्यानंतर पोलिसांनी रेखाचा पती बालाजी चव्हाण याला अटक केली. मात्र या बाबत पोलीस कोणतीही माहिती द्यायला तयार नाहीत. या हत्येत एकटा बालाजीच सामील आहे कि त्याच्या कुटुंबातील इतर लोकही सामील आहेत, याबाबत पोलीस बालाजी कांबळेच्या हत्या प्रकरणासारखेच काहीतरी लपवत आहे. त्यामुळे संशयाचे धुके निर्माण झाले आहेत. खूना सारख्या गंभीर गुन्ह्यात पोलीस प्रसारमाध्यमांच्या आणि लोकांच्या मनात संशय निर्माण होईल असे का वागतात. प्रसारमाध्यांना माहिती न देण्यामागे पोलिसांचे काही वेगळे धोरण आहे का? किंवा या लपवा छापविमागे काही आर्थिक हितसंबंध लपलेले आहेत का? असाही सवाल केला जातोय. जळकोट पोलीस लागोपाठ दुसऱ्यांदा खुनाच्या प्रकरणात लपवा लपवी करीत असल्याचे उघडकीस आल्याने जिल्हा पोलीस अधीक्षकांनी या प्रकरणाची गंभीर दाखल घेवून संबंधित अधिकाऱ्यांची चौकशी करावी. त्याच बरोबर प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींशी जळकोट पोलिसांनी सौजन्याने वागावे अशी त्यांना समाज देण्याची मागणीही पत्रकार करीत आहेत. कारण खुनाच्या प्रकरणात पोलीस जर गुन्हा दाखल होऊनही माहिती देणार नसतील तर नाविलाजाने बाहेर उपलब्ध असलेल्या माहितीच्या आधारे बातमी बनवावी लागेल जी कदाचित पोलिसांच्या विषयी संशय निर्माण करणारीही असू शकते असे प्रसार माध्यमातील लोकांचे म्हणणे आहे.

### खाकीवर्दीकडूनच विश्वासघात झाला...

हसबनीसला सांगितले. त्याने तरुणीचा अंदाज घेऊन त्याची पत्नी एमपीएससी व युपीएससी स्पर्धा परिक्षांचे मार्गदशन करत असून ती तिला मार्गदर्शन करेल असे आमीष दाखवून त्याने तरुणीला आपल्या राहत्या घरी वारंवार बोलवून बलात्कार केल्याचा उल्लेख पिडीत तरुणीने आपल्या फिर्यादीत केला आहे. सदरची घटना ही एप्रील ते जुलै महिन्याच्या कालावधीत घडली आहे. याबाबत तरुणीने कुणास काही सांगितल्यास अगर पोलिसात तक्रार केल्यास मी आत्महत्या करेन अशी धमकी हसणवीस याने पिडीत तरुणीला दिली होती. तरुणीने बलात्काराची तक्रार केल्यानंतर कडेगाव पोलिस स्टेशन मध्ये हसबनिस याच्यावर गुन्हा दाखल होताच हसबनीस अद्याप फरार आहे. गुन्हा दाखल होऊन दहा दिवस उलटले तरी संशयित आरोपी अद्याप पोलिसांना मिळालेला नाही. सदर घटनेची गांभीर्याने दखल घेवून कोल्हापूर परिक्षेत्राचे पोलीस महानिरीक्षक डॉ. सुहास वारके यांनी संशयित हसबनिस यांच्यावर तात्काळ निलंबनाची कारवाई केली आहे. गुन्ह्याच्या तपासामध्ये घटनास्थळावरील पंचनामा, महत्त्वाच्या साक्षीदारांचे जबाब घेण्यात आले असून फिर्यादीचा जबाब न्यायालयासमोर नोंदविण्यात आलेला आहे. गुन्ह्याच्या अनुषंगाने महत्त्वाचे पुरावे हस्तगत करण्यात आले असून तांत्रिक माहिती प्राप्त करण्यात आली असल्याचे पोलिसांनी सांगितले. संशयित हसबनिस याला अटक करण्यासाठी इस्लामपूर पोलीस ठाण्याचे एक पथक व स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेकडे पथक अशी दोन पथके पाठविण्यात आलेली आहेत. सदर गुन्ह्याचा तपास इस्लामपूरचे उपविभागीय अधिकारी कृष्णात पिंगळे यांच्याकडे सोपविण्यात आला आहे. उपविभागीय अधिकारी पिंगळे यांनी वाळवा व शिराळा तालुक्यातील गुन्हेगारीला चाप बसविण्यात यश मिळवले आहे. तसेच त्यांच्या कार्यतत्परतेमुळे सांगली पोलीस दलामध्ये त्यांनी चांगला नावलौकिकही प्राप्त केला आहे. इस्लामपूर मधील शाळकरी मुलाच्या अपहरणाची घटना किंवा गुंडांवर केलेली मोक्का अंतर्गतची कारवाई अशा त्यांच्या कडक कार्यपद्धतीमुळे ते एक कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणून ओळखले जातात. त्यांनी गतवर्षी आलेल्या महापुरात व लॉकडाऊनच्या काळात माणुसकीचं नातं सारख्या सामाजिक संघटनांच्या माध्यमातून आणि स्थानिक दानशूर व्यक्तींच्या सहकार्याने गरजू लोकांना खुप सहकार्य केले आहे. त्यांच्या या कार्यामुळे समाजातील प्रत्येक घटकातील पोलीसांच्याबद्दल आपुलकी निर्माण झाली आहे. सांगली जिल्हा पोलीस प्रमुखांनी या घटनेचे गांभीर्य ओळखून विश्वासाने ही जबाबदारी त्यांच्यावर सोपविली आहे. विपीन हसबणीस हा खाकी वर्दी मध्ये काम करीत असताना २८ वर्षे तरुणीवर बलात्कार केल्याच्या आरोपामुळे सध्या फरार आहे. जिथे जनतेच्या रक्षणाची जबाबदारी अपेक्षित असताना मात्र हसबनीस सारख्या पोलीस अधिकाऱ्याच्या राक्षशी प्रवृत्तीमुळे खाकी वर्दी बदनाम होत आहे. एका बाजूला लॉक डाऊन च्या काळात जनतेसाठी देवदूत बनणाऱ्या पोलिसांना किती मोठा सन्मान मिळत आहे. मात्र दुस-या बाजूला हसबनिसांसारखे नासके अधिकारी समाजात वावरत आहेत. अशा प्रकारची कृत्य करताना त्याला वर्दीचे व आपल्या जबाबदारीचे भान का राहू नये याचेच आश्चर्य जनतेला वाटते. ज्याच्याकडे दाद मागायची तोच राक्षस बनला तर विश्वास ठेवायचा कोणावर असा प्रश्न निर्माण होतो.

### सोन्याच्या चैनीवर ठेवला डोळा...

पोलिसांना संशय येऊ लागला. याच दरम्यान एका रीक्षावाल्याकडून पोलिसांना महत्वाची माहिती मिळाली. अक्षयचा मित्र धनराज याने त्या रिक्षावाल्याला ४/९/२०२० रोजी पहाटे पाच वाजता भाडे आहे तयार राहा असे सांगितले. त्यानुसार तो रिक्षावाला त्याने सांगितलेल्या ठिकाणी पहाटे ५ वाजता पोहचला. यावेळी धनराज याने घरातून दोन २० लिटरचे पाण्याचे जार घेऊन रिक्षात बसला. काही अंतर पुढे गेल्यावर त्याने रिक्षा बाजूला लावण्यास सांगितली आणि जवळच असलेल्या झुडुपात घुसला आणि झुडुपातून एक भरगच्च वजनाची गोणी घेऊन बाहेर आला. ती गोणी त्याने रिक्षात टाकली आणि रिक्षा मालजीपाडा वसईच्या दिशेने न्यायला सांगितली. थोड्या वेळाने अहमदाबाद हायवेवर येताच एका ब्रिजवर त्याने रिक्षा थांबवली आणि ती भरगच्च गोणी बाहेरकाढून खाली खाडीच्या पाण्यात फेकली आणि रिक्षात येऊन बसला. एवढी माहिती समजताच पोलिसांनी धनराजला ताब्यात घेतले आणि त्याची कसून चौकशी केली असता त्याने आपला गुन्हा कबुल केला व अक्षयच्या गळ्यातल चार तोळे सोन्याच्या चैनीसाठीच आपण त्याला साथीदारांच्या साथीने ठार मारल्याचे सांगितले. त्यानंतर धनराज तरुडे याच्यावर गु.र.क्र.२२९/२०२० आयपीसीच्या कलम ३०२,३६४,२०१,३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. तसेच या गुन्ह्यात त्याला मदत करणार त्याचा भाऊ कृष्ण घोडके यालाही अटक करण्यात आली. सदर कारवाई ठाण्याचे पोलीस आयुक्त विवेक फणसाळकर, पश्चिम विभागाचे अपर पोलीस आयुक्त सुरेश कुमार मेकला, उपयुक्त अनिल कुंभारे, अविनाश अंबुरे, एस.एस.बुरसे, प्रकाश निलेवाड या सहाय्यक पोलीस आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक किशोर खैरनार, पो.नि.प्रदीप उगले, वैभव धुमाळ, अविनाश काळदाते , स.पो.नि.सागर जाधव, चौघुले, पो.उप.नि.मोरे, रत्ने, पो.उप.नि. रणपिसे, पो.हवालदार अंकुश पाटील, एस.बी. खरात, आर.एस. चौधरी, चंद्रकांत गायकवाड, प्रवीण घोडके, पो.नाईक आर.एस. महापुरे, पी.आर.तायडे, महेंद्र लीन्गोले, आर.आर.रावते, राहुल दबडे यांनी कारवाईत भाग घेतला.

### दहा लाखांच्या खंडणीसाठी अचूक...

ओल्ड हुबळी पोलीस ठाण्यात गु र क्र ९०/२० भा.द.वि. कलम १४३,१४७,१४८,३०७,१४९,३०२ भादवि सह ३,२५ भारतीय हत्यार कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. या निर्घृण हत्याकांड प्रकरणाचा तपास ओल्ड हुबळी पोलीस ठाण्याचे पथक करत होते. गुन्हयाच्या तपासादरम्यान हा खुन कर्नाटक येथील म्हैसुर कारागृहात जन्मठेपेची शिक्षा भोगत असलेला कुप्रसिध्द गॅगस्टर युसुफ सुलेमान कादरी उर्फ युसुफ बचकाना याने त्याचे कर्नाटक व मुंबई येथील हस्तकांकडुन घडवुन आणल्याचे तपासादरम्यान निष्पन्न झाले होते. या माहितीच्या आधारे गुन्हे अन्वेषण विभाग कक्ष १२ चे पथक वरिष्ठांच्या आदेशाने नमुद गुन्हयातील गँगस्टर युसुफ बचकाना याच्या हस्तकांचा शोध घेत होते. तसेच ओल्ड हुबळी पोलीस ठाणे, हुबळी धारवाड, राज्य कर्नाटक ठाण्याचे पोलीस पथक तपासकामी मुंबईत आले होते. या दरम्यान ओल्ड हुबळी पोलिसांनी तपास करून सात आरोपीना अटक केली होती. मात्र या गुन्ह्यातील गॅगस्टर युसुफ बचकाना गँगचा मुख्य हस्तक आद्यप ही फरार होता. पोलीस त्याच्या मागावर होते. हा हस्तक गँगस्टर युसुफ बचकाना याच्या सातत्याने संपर्कात होता. तसेच त्याचे साथीदार गुन्ह्याच्या वेळी हुबळी, कर्नाटक येथे गेल्याचे तपासात आढळून आले होते. त्यानुसार मुंबई सह पोलीस आयुक्त (का.व सु.) विजयकुमार चौबे, पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण -१), अकबर पठाण व सहाय्यक पोलीस आयुक्त (डी-पुर्व) अविनाश शिंगटे यांचे मार्गदर्शनाखाली कक्ष १२ चे प्रभारी पोलीस निरीक्षक सागर शिवलकर, पोलीस निरीक्षक सचिन गवस, अतुल डहाके, सहाय्यक पोलीस निरिक्षक प्रकाश सावंत, अतुल आव्हाड, आशिष शेळके, पोउपनि हेमंत गिते, हरेष पोळ, पोलीस हवालदार सुनिल बिडये, शांताराम भुसारा, मुरलीधर कारंडे, अरविंद म्हामुनकर, पोना दिनेश राणे, पो.ना राजु सावंत, संतोष बने, पो.शि.सचिन जाधव पो.ह.वा. आव्हाड इत्यादीं या हस्तकाचा शोध घेत असताना दि .२४ ऑगस्ट रोजी त्यांना गुप्त बातमीदारामार्फत अशी माहिती मिळाली की, सदर गुन्ह्यातीळ संशयित आरोपी हा दहिसर बोरीवली (पुर्व) परिसरात येणार आहे. त्यानुसार सदर पथकाने त्या ठिकाणी सापळा रचून गुन्हयातील मुंबईतील मुख्य आरोपी राजेंद्र मोहन सिंग रावत उर्फ राजू नेपाळी यास ताब्यात घेतले. त्यास गुन्हे शाखेच्या कार्यालयात आणून त्याची चौकशी केली असता, त्याने गुन्हयामधील त्याचा सहभाग असल्याबाबतची सविस्तर माहिती दिली ती पुढील प्रमाणे.!

राजेंद्र मोहन सिंग रावत उर्फ राजू नेपाळी (वय ३८) असे या आरोपीचे नाव असून तो, टाटा पॉवर हाऊस, देवला पाडाजवळ बोरीवली (पुर्व), मुंबई येथील रहिवासी असून तो कर्नाटक राज्यातील गॅगस्टर युसुफ बचकाना याच्या गँगसाठी काम करीत होता. गँगस्टर युसुफ बचकाना याने राजेंद्र मोहन सिंग रावत उर्फ राजू नेपाळी यास फोनवरून संपर्क साधुन कर्नाटक राज्यातील धारवाड येथील ओल्ड हुबळी पोलीस ठाण्याच्या हद्दीत रियल इस्टेट व्यवसायिक इरफान अल्लाबक्ष हंचनाल उर्फ अलियास उर्फ फुट इरफानच्या हत्येच्या कटाची माहिती देवुन सदर गुन्हयाकरीता शुटर पुरविण्यासाठी त्याला गुन्हयापुवी दोन लाख रुपये दिले होते व गुन्हयानंतर दहा लाख रुपये देण्याबाबत व त्यांच्या कर्नाटक व मुंबई येथील वाहतुक व वास्तव्याची व्यवस्था करण्याबाबत चर्चा झाली होती. राजेंद्र मोहन सिंग रावत उर्फ राजू नेपाळी याचा गुन्हे अभिलेख पडताळला असता त्याच्या वर सन २०१३ मध्ये कक्ष १२ येथे अशाच पध्दतीने कुप्रसिध्द गँगस्टर युसुफ सुलेमान कादरी उर्फ युसुफ बचकाना याने म्हैसूर, कर्नाटक येथे जन्मठेपची शिक्षा भोगत असताना त्याच्या हस्तकाकडुन खंडणीकरीता बोरीवली (पुर्व) येथील बांधकाम व्यवसायकाच्या गाडीवर अग्निशस्त्रामधुन गोळीबार करून जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला होता. याबाबत त्याच्या वर कस्तुरबा मार्ग पोलीस ठाणे गु.र.क्र. १४५/१३) कलम ३०७,३८४,३८७.३४ भादविस ३,२५,२७ भाहका अंतर्गत गुन्हा दाखल करून त्यास अटक करण्यात आली होती. तसेच सन २००९मध्ये वनराई पो.ठाणे येथे गुर.क्र.११/०९ कलम ३,२५,२७ भाहका व सन २०१९ मध्ये कस्तुरबा पो.ठाणे येथे गु.र.क्र.३५७/१९ कलम ४४८,४५२,१०६ भादवि प्रमाणे गुन्हे नोंद असुन त्यांमध्ये त्यास अटक केलेली आहे. या तीन्ही गुण्यात राजू नेपाळी यास कस्तुरबा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून त्यास अटक करण्यात आली होती. अशा प्रकारे जन्मठेपची शिक्षा भोगत असताना त्याच्या हस्तकाकडुन खंडणीकरीता बोरीवली (पुर्व) येथील बांधकाम व्यवसायकाच्या गाडीवर अग्निशस्त्रामधुन गोळीबार करून जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केल्या प्रकरणी पोलिसांनी अटक केली व त्यास वरिष्ठांचे आदेशान्वये पुढील कारवाईकामी ओल्ड हुबळी पोलीस ठाणे, हुबळी धारवाड, राज्य कार्नाटक यांच्या ताब्यात देण्यात आले आहे. अशा प्रकारे कक्ष १२, गुन्हे शाखेच्या पथकाने मानवी कौशल्याचा अचूक समन्वय साधून कर्नाटक येथे रिअल इस्टेट व्यवसायीकाची हत्या करण्याकरीता मुंबई येथुन शूटर पाठविण्यासाठी व इतर मदत मिळविण्यासाठी पैसे पुरविण्याऱ्या कुप्रसिध्द गँगस्टर युसुफ सुलेमान कादरी उर्फ युसुफ बचकाना याच्या मुंबईतील मुख्य हस्तकास जेरबंद करण्याची यशस्वी कामगीरी पार पाडली आहे. ही कामगिरी सह पोलीस आयुक्त (का.व सु.) विजयकुमार चौबे, पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरन-१), अकबर पठाण व सहाय्यक पोलीस आयुक्त (डी-पुर्व), अविनाश शिंगटे यांचे मार्गदर्शनाखाली प्रभारी पोलीस निरीक्षक सागर शिवलकर, पोलीस निरीक्षक सचिन गवस, अतुल डहाके, सहाय्यक पोलीस निरिक्षक प्रकाश सावंत, अतुल आव्हाड, आशिय शेळके, पोउपनि हेमंत गिते, हरेष पोळ, पोलीस हवालदार सुनिल बिडये, शांताराम भुसारा, मुरलीधर कारंडे, अरविंद म्हामुनकर, पोना दिनेश राणे, पो.ना राजु सावंत, संतोष बने, पो.शि.सचिन जाधव, पो.ह.वा. आव्हाड यांनी पार पाडली.

### मेव्हणीवर संशय घेणे महागात पडले...

संसाराचा भार वाढला होता.म्हणून सचिन हा कामासाठी म्हणून कोल्हापूर जवळील गोकुळ एमआयडीसी तील एका कारखान्यात कामाला लागला होता. काम मिळाल्यावर तो पत्नी आणि मुलाला घेऊन आला. आता तो नेर्ली तामगाव येथे भाडयाने खोली घेऊन पत्नी मुलासह राहत होता. तो एमआयडीसीत काम करीत असल्याने त्यांची पाळी ही बदलत होती. कधी तो बारा तास काम करीत होता.तर कधी आठ तासाच्या शिफ्टमध्ये त्याला काम करावे लागत होते. घरी आल्यानंतर पत्नी, मुलाकडे बघुन त्याचा कामाचा सगळा शिणवटा जात होता. आता त्याच्या लग्नाला बरीच वर्ष झाली होती. अनिताही वयाच्या तिशीत पोहचली होती. त्यातच सचिनला आता तिच्या वागण्या बोलण्यात बदल जाणवत होता. ती तासन तास कुणाबरोबर तरी मोबाईलवरून बोलत असायची. आपल्या सुंदर देखण्या पत्नीकडे तो आता वेगळ्याच नजरेने पाहत होता. ती मोबाईलवरून कुणाशी काय बोलते, आपण कामावर गेलो की ती काय करते याच्यावर तो बारकाईने लक्ष ठेवून होता. त्याला तिच्या वागण्या बोलण्यात आणि राहणीमानात फरक जाणवू लागल्याने अलिकडे तो कामावरून येताना दारू पिऊन येऊन तिच्याबरोबर भांडण काढून तिला मारहाण करीत होता.या भांडणात ती ही त्याला वरचढ ठरत होती. नवरा बायकोच्या भांडणाला एकदा का सुरूवात झाली की ती भांडणे दोन दोन तीन दिवस मिटत नव्हती. अलिकडे तर तो जास्तच तिच्यावर संशय घेऊन तुझ्या माहेरचे लोक ही तसेच आहेत. लग्नाआधी तुम्ही दोघी बहिणीनी काय काय गुण उधळले आहेत हे न समजण्यासारखे आहे. असे तो तिला भांडणात म्हणत होता. त्यामुळे तिला ही आता त्याचा भंयकर राग येत होता. तुम्ही मला काय बोलायचे बोला. मला काय म्हणायचे ते म्हणा. पण माझ्या माहेरच्या लोकांना विषेशता माझ्या बहिणीला ही त्याच नजरेने बघून माझ्या माहेरच्या लोकांचा बहिणीचा उध्दार करू नका असे ती त्याला बजावत होती. आपल्या लग्नाला आता दहा अकरा वर्ष झाली आहेत. आपल्याला एक मुलगा सात वर्षाचा आहे. तुम्ही माझ्यावर संशय घेऊन मला बदनाम करू नका. दारु पिवून येऊन भांडणात तो तिला भलतेच नको ते बोलून अश्लिल आरोप करीत होता. त्यामुळे अनिता ही वैतागलेली होती. तिने नवरा आपल्या चारित्र्यावर संशय घेऊन मारहाण करून शिव्या देत असतो. आपल्या सगळ्याचा उद्दार करतो आणि बहिण वनितावरही तो तशाच पध्दतीने संशय घेतो, असे तिने भाऊ कृष्णांत याला सांगितले होते. तो ही भावोजी सचिनवर चिडला होता. त्याने ही त्याला हंचिनाळ येथे बोलावून घेऊन समजावून सांगितले होते. तरीही सचिनच्या वागण्यात काहीच फरक पडला नव्हता. त्याचे मागचे तसे पुढे चालु झाले होते. नेर्ली -तामगाव येथील घरात नवरा बायको दोघेच असले की त्या दोघांच्या भांडणाला सुरूवात होत होती. तिच्या बहिणीने ही त्याला भावोजी तुम्ही उगाच ताईकडे संशयाने बघून नकासा. तुमच्या जीभेला काही हाड आहे का नाही, काय आम्ही दोघी तुम्हांला त्यातल्या बायका वाटतो. असे खडासावून विचारले होते. तो तिलाही तसेच म्हणत होता.त्यामुळे ती ही बहिणीच्या नवऱ्यावर चिडून होती. नवरा बायकोच्या भांडणाने वेगळेच वळण घेतले होते. अनिता ही सारखी भांडून माहेरी हंचिनाळ येथे जात होती. गेल्या पंधरा दिवसापूर्वी याच कारणाने त्या दोघा नवरा बायकोत भांडणे झाली होती. तो ही बायको भांडून माहेरी गेली म्हणून नेर्ली तामगाव येथे कामावर न जाता दिवसभर आणि रात्रभर दारू पिवून इकडे तिकडे करत होता. त्यातच तो लॉकडाऊनमुळे काम बंद असल्याचे सांगून घरातच राहत होता.त्याला तेच कारण मिळाले होते.परंतु खरे कारण बायको माहेरी गेल्याचे होते.त्याने तिला येण्यासाठी दोन तीन वेळा मोबाईलवर फोन केला होता. परंतु यावेळी सचिनला कायमचे अद्दल घडावयची आहे असे तिने बहिण वनिता,भाऊ कृष्णांत याना सांगितले होते. त्यामुळे त्यांनी सचिनलाच हंचिनाळ येथे बोलावून घेण्याचे ठरविले होते.गुरूवार ३सप्टेंबर रोजी अनिताने त्याला फोन करून हंचिनाळ येथे येण्यास सांगितले. काही झाले तरी ती त्याची बायको होती. म्हणून तो तिच्या बोलवण्या वरून त्या दिवशी सकाळीच लवकर सासरवाडी हंचिनाळ येथे गेला. तो सासरवाडीला गेला खरा, पण जाताना तो व्यवस्थीत गेला नाही. जाताना त्याने येथेच्छ दारू ढोसली होती. सासरवाडीत आपल्या बरोबर बायको, मेहुणी, मेहुणा हे भांडणारच आहेत हे त्याने ओळखले होते. म्हणून त्याने घशाखाली थोडी रिचवली होती. त्याने जी अपेक्षा केली तसेच तेथे गेल्यावर झाले होते. सासरवाडीत गेल्यावर काहीवेळाने त्याच्या बायकोने आणि मेहुणीने त्याच्या बरोबर भांडण उकरून काढले होते. त्या भांडणात मेहुणा ही पडला होता. ते तिघेही त्याच्याबरोबर भांडण काढून त्याला नको नको ते बोलत होते. तो सुध्दा टाकून असल्याने त्याला उलट सुलट बोलून तुम्ही सगळे भांडखोर आहात. तुमच्या दोघीचें वागणेच बरोबर नाही असे म्हणून त्याच्यावर तोडसुख घेत होता. दिवसभर त्याच्यात भांडणे होत होती. त्याला त्यांनी त्यावेळी जावायच्या नात्याने जेवण देखिल विचारले नव्हते. त्यामुळे तो जास्तच चिडला होता. भांडणात ते तिघे त्याच्या अंगावर जात होते. तो ही मागे न सरता त्यानां जशास तसे उत्तर देत होता. त्याचवेळी तो अनिताला तुझ्या माहेरच्या घरात आणि शेतात ही वाटणी घे. म्हणून सांगत होता. एक तर तो तिच्यावर चारित्र्याचा संशय घेत होता. तर लगेच तिच्या माहेरची वाटणी मागत होता. त्यामुळे त्याना ही त्याचा राग येत होता. त्याच्या भांडणात त्या दिवशी संध्याकाळ झाली, संध्याकाळी उशिरा ते दोघे नवरा बायको गावातील माळावरच्या घराकडे झोपायला गेले होते.माळावरचे घर आणि गावातील घर थोडे फार जवळचे अंतर होते. भांडत भांडत ते दोघे नवरा बायको तेथे आले. तेथे ही त्याचे भांडण वाढले होते. तो दारूच्या नशेत बायको अनिताला काठीने मारहाण करायला सुरूवात केली होती. ही बातमी गावात असणारा तिचा भाऊ कृष्णांत याला समजली. त्यावेळी त्याच्याबरोबर त्याची बहिण वनिता आणि नात्यातील पाहुणा गणेश रेडेकर हे तेथे आले होते. ते तिघे आल्याचे बघून अनिताला चेव चडला होता. तो तिला काठीने मारहाण करीत असताना कृष्णांत याने याच्या हातातून काठी काढुन घेतली होती. त्यावेळी अनिता आणि वनिता या दोघीं बहिणीनी मिळुन सचिनला खाली पाडले. तो खाली पडल्यावर तिच काठी अनिताने उचलली होती. यावेळी कृष्णांत, गणेश आणि वनिता यांनी त्याला दाबून धरले होते. त्याचेवेळी रागाच्या भरात असणाऱ्या अनिताने ही त्याला काठीने मारहाण करायला सुरूवात केली. त्या चौघांच्या मारहाणीने सचिन घायाळ झाला होता. त्याचवेळी अनिताच्या हातातील काठी कृष्णांत याने काढून घेतली. आणि त्याच काठीने त्याने सचिनच्या डोक्यात एक वर्मी घाव घातला होता. हे बघून अनिता त्याच्या उरावर बसून त्याचा दोरीने गळा आवळायला सुरुवात केली. त्यासरशी त्याची हालचाल मंदावली होती. ती गळा दाबत असताना कृष्णांत, वनिता आणि गणेश यांनी त्याला दाबून धरले होते. त्याच्या मारहाणीत आणि गळा दाबल्यामुळे सचिनचा जागीच मृत्यु झाला होता. हे बघून त्यांची पाचावर धारण बसली होती. आपल्या हातून जावायचा खून झाल्याचे लक्षात येताच ते बावचाळले होते.तो रक्ताच्या थारोळयात पडला असताना त्यांनी त्याच्या मृतदेहाची विल्हेवाट लावण्याचे ठरविले होते. त्या चौघांनी विचार करून त्याचा मृतदेह त्याच रात्री शेतात खड्डा काढुन पुरून टाकण्याचे ठरविले होते. म्हणून त्यांनी तशी योजना आखली आणि कामाला लागले. कृष्णांत याला गावात जेसीबीने खड्डा काढणार कोण आहे हे माहित होते. म्हणून जेसीबी चालक सुनिलदास राठोड या मोबाईल फोनवरून सांगितले की घरातील म्हैशीचे रेडकु मेले आहे. त्या रेडकुला शेतात खड्डा काढुन पुरावयाचे आहे .हे ऐकून काम मिळाले म्हणून सुनिलदास राठोड हा जेसीबी घेऊन माळावरील शेतात आला होता. रात्र ही बरीच झाली होती.त्या अंधाऱ्या रात्रीच त्यांना काम करायचे असल्याने त्यांनी दाखविलेल्या ठिकाणी जेसीबी चालकाने जेसीबीच्या सहाय्याने खड्डा खोदला होता.त्याने खड्डा खोदल्यानंतर गणेश रेडेकर याने सुनिलदास राठोड या जेसीबी चालकाला गोड बोलून चहा घेण्यासाठी म्हणून गवातील घराकडे नेले.ते दोघे चहा पिण्यासाठी गेल्यावर कृष्णांत अनिता आणि वनिता या तिघांनी मिळून बाजुला घराच्या मागे ठेवलेला सचिनचा मृतदेह आणून त्या खड्डुयात पुरून टाकला होता. आणि वरून हातांनी माती सारली होती.परत आल्यावर जेसीबी चालकाने रेडकु कुठे आहे म्हणून विचारले असता त्यांनी त्याला पुरून टाकले असल्याचे सांगितले.यावर सुनिलदास राठोड याचा विश्वास बसत नव्हता.कारण त्यांनी जेसीबीच्या सहाय्याने खड्डा न मुजविता हातांनी माती सारून तो खड्डा मुजविला होता.त्याच्या मनात शंका येत होती.काही तरी काळेबेरे आहे याची त्याला खात्री वाटु लागली होती.म्हणून त्याने त्याना खोदून खोदुन परत परत विचारले होते.परंतु त्या चौघांनी ही त्याला गोड बोलून पैसे देऊन वाटेला लावले होते.त्याच्या मनात शंका असल्याने तो रात्रभर झोपू शकला नव्हता.दुसऱ्या दिवशी त्याने ही घटना कोगनोळी आऊट पोलीस ठाण्यात जावून सांगितली.त्यांनी ही माहिती लगेच निपाणी ग्रामीण पोलीस स्टेशनला सांगितली. या घटनेची माहिती मिळताच निपाणी पोलीसांनी जेसीबी चालकाला घेऊन हंचिनाळ येथील कोडी मळ्यातील सर्व्हे नं.११५/९ येथे दाखल झाले. यावेळी जेसीबी चालकाने दाखविलेल्या ठिकाणी परत खड्डा उकरण्यास सुरूवात केली. प्रांतधिकारी योगेश कुमार, डीवायएसपी मनोजकुमार नायक, सपीआय संतोष सत्यनायक, निपाणीचे तहसीलदार प्रकाश गायकवाड, बेनाडी प्राथमिक आरोग्य केंद्राचे सलीम मजावर, प्रशिक्षानार्थ आयपीएस दीप, सहाय्यक पोलीस नि.ए.एस टोलगी, ग्रामपंचायत कार्यदर्शी शिवानंद तेली, तलठी एस.एच गस्ते हे उपस्थितीत होते. खड्डा खणल्या नंतर त्या खड्डातून मानवी मृतदेह सापडला .शासकीय अधिकाऱ्या च्या उपस्थितीत घटनेचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी सरकारी रुग्णालयात पाठवून देण्यात आला.या घटनेनंतर यातील संशयीत आरोपी पळून गेले होते. पोलीस त्यांचा शोध घेत होते.या घटनेची फिर्यादी जेसीबी चालक सुनिलकुमार राठोड याने निपाणी ग्रामीण पोलीसांत दिली होती. पोलीस संशयीत आरोपीचा शोध घेत होते. शनिवार दि.५ सप्टेंबर रोजी रात्री या घटनेतील संशयीत आरोपी हे नॅशनल हायवे वरील कागल जवळील आयबीपी पेट्रोल पंपाजवळ असल्याची व तेथून ते मुंबईला पळून जाण्याच्या तयारीत असल्याची माहिती निपाणी पोलीसांना मिळाली होती. सीपीआय संतोष नायक याच्या टिमने त्वरीत हालचाल करीत तेथून या आरोपीना ताब्यात घेतले होते. त्याना पोलीस स्टेशनला आणून त्याच्याकडे या घटनेची चौकशी पोलीसांनी केली असता. त्यांनी आपला गुन्हा कबुल केला. सचिन सदाशिस भोपळ (वय ३५.रा.नेर्ली तामगाव) याचा खून करून पुरावा नष्ट केल्याप्रकरणी त्याची पत्नी अनिता सचिन भोपळ(वय ३०) रा.नेर्ली तामगाव तिची बहिण वनिता कृष्णांत चव्हाण (वय २९.) रा. सिध्दर्नेली कागल,भाऊ कृष्णांत राजाराम घाटगे (वय २६,) रा. हंचिनाळ आणि नातेवाईक गणेश आणाप्पा रेडेकर (वय२१) रा.हुन्नरगी याच्या विरोधात भा.दं.वी.कलम ३०२,२०१ प्रमाणे गुन्हा नोंदवून पोलीसांनी या चौघांना निपाणी न्यायालयासमोर उभे केले असता. मा.न्यायालयाने या चौघांना ही १५ दिवसाची पोलीस कोठडी सुनावली होती. म्हणून पोलीसांनी त्याची रवानगी बेळगाव येथील हिडंगलगा जेलमध्ये केली होती. पोलीस कोठठी दरम्यान पोलीसांनी त्याच्याकडून गुन्हयात वापरलेली काठी आणि दोरी जप्त केली होती. या घटनेचा पुढील तपास निपाणी पोलीस ठाण्याचे सीपीआय संतोष सत्यनायक आणि त्याचे सहकारी करीत आहेत.पत्नीच्या चारित्र्याचा संशय जर मनात निर्माण झाला तर काही केल्या संशय कमी होत नाही. पती स्वैरभैर होतो.आणि नवरा बायकोच्या भांडणाला सुरूवात होते. त्यातूनच अघटित अशी घटना घडते. हेच या घटनेवरून दिसून येते.

### भ्रष्टाचारात महिलाही मागे नाही राहिल्या...

त्यासाठी प्रशासकीय मान्यता मुद्दाम दिली जात नव्हती. या प्रशासकीय मान्यतेसाठी परभणीच्या निवासी उपजिल्हाधिकारी स्वाती सूर्यवंशी यांनी तक्रारदाराकडे तब्बल साडेचार लाख रुपयांची लाच मागितली होती. सदर अनुदान विकास निधींसाठी असल्यामुळे ही लाच का द्यायची? हा प्रश्न गंगाखेडचे तकारदार नगरसेवकास सतावत होता. याबाबत तक्रारदार नगरसेवकाने परभणीच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभाग अर्थात एसीबीकडे तक्रार दाखल केली होती. त्यांच्या तक्रारीनुसार लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस उपअधीक्षक भारत हुंबे यांनी रितसर सापळा तयार केला. त्या सापळयात स्वाती सुर्यवंशी अडकल्या. आज दुपारी पंचासमक्ष लाचेची रक्कमही थेट स्वाती सूर्यवंशी यांच्या म्हणण्यानुसार जिल्हाधिकारी कार्यालयातील अव्वल कारकून अब्दुल हकीम आणि श्रीकांत कारभाजन यांना देण्यात आली. सापळा यशस्वी झाल्यानंतर एसीबीच्या अधिकाऱ्यांनी या तिघांना अटक करत पुढील कारवाई केली. स्वाती सूर्यवंशी यांच्याकडे परभणीत सध्या भूसंपादन, रोजगार हमी, अप्पर जिल्हाधिकारी आणि निवासी उपजिल्हाधिकारी अशा एकुण चार विभागांचा कारभार देण्यात आला आहे. परभणीत येण्यापुर्वी त्या अहमदनगर येथे भूसंपादन अधिकारी म्हणून कार्यरत होत्या. सन २००४-२००५ मध्ये कळमनुरी येथे तहसीलदार असताना तत्कालीन शिवसेना आमदार गजानन घुगे यांच्या तक्रारीनुसार स्वाती सुर्यवंशी यांच्यावर संजय गांधी निराधार योजना आर्थिक घोटाळ्यात शिस्तभंगाची कारवाई करण्यात आली होती. परभणीच्या सेलु येथे त्या तहसीलदारपदी असताना औरंगाबाद येथील विमानतळावर त्यांच्याकडे विना परवाना बंदुकीची काडतुसे मिळून आली होती. त्या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला होता. जिंतूरमध्ये तहसीलदार पदी असतांना एकाच दिवसात रोहयो अंतर्गत १०० कोटींच्या विहिरी आणि रस्त्यांच्या कामांना त्यांनी वर्क ऑर्डरचे आदेश दिले होते. परभणी येथे आरडीसी असताना सन २०१४ च्या हिवाळी अधिवेशनात त्यांना निलंबित करण्यात आले होते. जिंतुरच्याच एका प्रकरणात त्यांच्या मालमतेची चौकशी एसीबी कडून अद्याप सुरु असल्याचे समजते. हे प्रकरण पुर्ण होईपर्यत त्यांना महत्वाच्या कार्यकारी पदावर पदस्थापना देऊ नये असे आदेश होते. असे असले तरी त्यांना परभणीत महत्वाचे पद देण्यात आले होते.

14 TO 20 SEPTEMBER 2020 - Page 3 (CRIME SANDHYA):Layout 1 12/09/2020 8:35 PM Page 1



# भिवंडी रोड रेल्वे स्थानकात पार्सल टर्मिनस सुरू; मालगाडी सुटणार!

**भिवंडी/अभिजित हिरे**

भिवंडीरोड रेल्वे स्थानकात पार्सल टर्मिनस सुरू झाले असून भिवंडी तालुका व परिसरातील व्यावसायिकांना देशातील विविध भागात मालगाडीद्वारे माल पाठविण्याचा स्वस्त पर्याय उपलब्ध झाला आहे. भिवंडी लोकसभा क्षेत्राचे भाजपाचे खासदार कपिल पाटील यांच्या प्रयत्नाने टर्मिनस साकारले असून भिवंडीकरांना वाहतूकीच्या कोंडीतूनही दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे.

भिवंडी शहर हे कापड यंत्रमागासाठी प्रसिद्ध असून आशियातील सर्वात मोठी गोदामनगरी आहे. या ठिकाणी देशभरातील विविध भागात माल पाठविला जातो. रस्ते वाहतूकीपेक्षा रेल्वेचा मालवाहतुकीचा दर कमी आहे. मात्र भिवंडीरोड रेल्वेस्थानकातून माल पाठविण्याची सुविधा नसल्यामुळे व्यापाऱ्यांना रस्तेमार्गाने जादा भाडे द्यावे लागत होते. त्याचबरोबर भिवंडीतील गोदामांमधून माल ने-आण करण्यासाठी येणाऱ्या जड- अवजड वाहनांमुळे भिवंडी, कल्याण, शीळफाटा आणि ठाणे परिसरात मोठी वाहतूक कोंडी होत होती. त्यात दररोज प्रवास करणाऱ्या चाकरमान्यांचे खूपच हाल होत आहेत. मात्र आता पार्सल टर्मिनसमुळे भिवंडीत येणाऱ्या जड-अवजड ट्रकची वाहतूक निश्चितच कमी होणार आहे.या पार्श्वभूमीवर खासदार कपिल पाटील यांनी रेल्वे मंत्री पियूष गोयल, मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक, विभागीय व्यवस्थापक यांच्याकडे भिवंडीरोड रेल्वे स्थानकात पार्सल टर्मिनस सुरू करण्याची मागणी केली होती. ती रेल्वे मंत्रालयाने तात्काळ मान्य केली असून पार्सल टर्मिनसची सेवा सुरू झाली आहे. भिवंडीरोड रेल्वे स्थानकातून भिवंडीतील विविध माल घेऊन पहिली मालगाडी रवाना होणार आहे. भिवंडीतील यंत्रमाग व्यावसायिकांबरोबरच लघु उद्योजकांना रेल्वेच्या माध्यमातून वेगाने माल पाठविता येईल. पार्सल टर्मिनसमुळे भिवंडीतील व्यावसायिकांना निश्चितच दिलासा मिळेल अशी प्रतिक्रिया खासदार कपिल पाटील यांनी व्यक्त केली आहे .

# उपजिल्हाधिकारी यांच्या लेखी आश्वासनानंतर शेतकऱ्यांचे मावेजासाठीचे आमरण उपोषण मागे



**अहमदपूर/फिरोज शेख**

तालुक्यातील सुमठाना येथील शेतकऱ्यांनी गेल्या बारा वर्षापुर्वी उर्ध्व मनार उपसा सिंचन प्रकल्पा अंतर्गत कालव्यात (कॅनॉल)गेलेल्या जमिनीचा मावेजा मिळावा यासाठी उपविभागीय कार्यालयासमोर गणेश पोले हे शेतकऱ्यांसह दि ८ सप्टेंबर रोजी आमरण उपोषणास बसले होते. याची उपजिल्हाधिकारी प्रभोदय मुळे यांनी तात्काळ दखल घेऊन दिलेल्या लेखी आश्वासना नंतर शेतकऱ्यांनी आमरण उपोषण मागे घेतले.

याविषयी सविस्तर माहिती अशी की, उर्ध्व मनार उपसा सिंचन प्रकल्प योजने अंतर्गत डावा/उजव्या (कॅनॉलमध्ये) सुमठाना येथील जवळपास ३५ शेतकऱ्यांच्या जमिनीचे भुसंपादन करून इ.स २००७-२००८ मध्ये खोदकाम केले गेले आहे. परंतु आज पर्यंत त्यांना कोणत्याही प्रकारचा मोबदला मिळाला नाही. त्यामुळे संबंधीत शेतकऱ्यांना मोबदला मिळवुन द्यावा व शेतकऱ्यांची फसवणुक करणाऱ्या अधिकाऱ्यांवर योग्यती कार्यवाही करण्यात यावी आदी मागण्या सह उपविभागीय कार्यालयासमोर सामाजिक कार्यकर्ते गणेश पोले हे शेतकऱ्यांच्या वतीने उपोषणास बसले होते.

कोरोना संसर्गजन्य रोगाच्या वाढता प्रादुर्भाव पाहता सामाजिक कार्यकर्ते गणेश पोले यांनी सर्व शेतकऱ्यांना एकाच वेळी आमरण उपोषणास घेऊन न बसता दररोज चार शेतकरी या साखळी पध्दतीने लाक्षणिक उपोषण सुरू केले होते. उपविभागीय कार्यालयासमोर जोपर्यंत शेतकऱ्यांच्या मागण्या मान्य होत नाहीत तोपर्यंत हे आमरण उपोषणास चालू राहणार होते. शेतकऱ्यांच्या न्याय मागण्यांची प्रशासनाने तात्काळ दखल घेऊन शेतकऱ्यांसोबत उप-जिल्हाधिकारी प्रभोदय मुळे यांच्या दालनात लघु पाटबंधारे उपविभागीय अधिकारी उंबरकर ए.बी, लिपिक बनसोडे योगेश, गणेश पोले व इतर शेतकरी यांच्या सोबत तब्बल दिड तास चाललेल्या बैठकीत शेतकऱ्यांच्या मागणीनुसार ताबा पावती बाबत नियमानुसार योग्यती कार्यवाही करण्यात येईल असे संबंधीत संस्थेचे उपविभागीय अधिकारी यांनी मान्य केले. तसेच खाजगी वाटा घाटीने थेट खरेदी प्रस्ताव सादर करण्यात आलेला भुसंपादन प्रस्ताव आज रोजी मोजणी स्तरावर असुन मोजणी झाल्यानंतर तात्काळ पुढील कार्यवाही करण्यात येईल असे लेखी आश्वासन दिल्यानंतर शेतकऱ्यांनी आमरण उपोषण मागे घेतले. यावेळी शेतकऱ्यांच्या उपोषणास भाजपा नेते गणेश हाके, माजी आमदार बब्रुवान खंदाडे, पं.स उपसभापती बालासाहेब गुट्टे, पं.स सदस्य राम नरवटे, माणिक नरवटे, भाजपा तालुका अध्यक्ष हनुमंत देवकत्ते ,सरपंच संघटनेचे अध्यक्ष सुधाकर जगताप, रामानंद मुंडे लांजीकर आदींनी भेट देऊन शेतकऱ्यांच्या मागणीला पाठींबा दिला.

## थोडक्यात वृत्तांत

### लिफ्ट देण्याच्या बहाण्याने जबरी चोरी

नालासोपारा : महामार्गावर लिफ्ट देण्याच्या बहाण्याने ४८ वर्षीय इसमाला तीन आरोपींनी लुटून जबरी चोरी केल्याची घटना मंगळवारी पहाटे घडली आहे. वालीव पोलीस ठाण्यात तक्रार आल्यावर जबरी चोरीचा गुन्हा दाखल केला आहे. भाईंदर पश्चिमेकडील कमला पार्कमध्ये राहणारे अनिलकुमार छेदिलाल गुप्ता (४८) यांना लुटले आहे. मंगळवारी पहाटे ६ वाजण्याच्या सुमारास वसई पूर्वेकडील चिंचोटी फाटा येथे स्विफ्ट डिझायर या गाडीतून आलेल्या ३ चोरट्यानी कुठे जायचे विचारले. नंतर गाडीत बसवून पुढे थोडे अंतरावर गेल्यावर दोघांनी चाकूचा धाक दाखवून खिशातील १० हजार रुपये रोख रक्कम, ५० हजारांची २० ग्रॅमची गळ्यातील सोन्याची चेन, २१ हजारांची हातातील ७ ग्रॅमची सोन्याची अंगठी, ५ हजारांचा मोबाईल, आयडीबीआय बँकेचे एटीएम कार्ड, पॅनकार्ड, आधारकार्ड, मतदान कार्ड, कंपनी आयडी कार्ड आणि ब्लॅक कलरची ऑफिसची बॅग असा एकूण ८६ हजारांचा मुद्देमाल चोरी केला आहे.

### कर्ज देण्याच्या आमिषाने फसवणूक

नालासोपारा : वसई पश्चिमेकडील कृष्णा टाऊनशिप मध्ये राहणाऱ्या ३५ वर्षीय इसमाला कर्ज देण्याचे आमिष दाखवून हजारो रुपयांची फसवणूक केली आहे. माणिकपूर पोलिसांनी फसवणुकीचा गुन्हा गुरुवारी दाखल केला आहे. पश्चिमेकडील कृष्णा टाऊनशिप मधील लक्ष्मी निवास मध्ये राहणारे पराग रामदास कदम (३५) यांची फसवणूक झाली आहे. पराग यांनी कर्ज घेण्यासाठी फेसबुकद्वारे आलेल्या लिंक वर क्लिक करून लोन ॲप्लिकेशन फॉर्ममध्ये वैयक्तिक माहिती भरली. नंतर त्यांच्या मोबाईलवर एक कॉल आला व त्याने ५ लाख रुपये लोन मिळाल्याचे पत्र पाठवले. त्याबदल्यात वेळोवेळी आरोपीच्या गुगल पे वर ७४ हजार १६२ ट्रान्स्फर करून फसवणूक केली आहे.

### गणेश मंडळांचा महापालिका करणार गौरव

लातूर : गणेशोत्सवादरम्यान शहरातील सार्वजनिक गणेश मंडळांनी राबवलेल्या उपक्रमांना महापालिकेच्यावतीने गौरविण्यात येणार आहे. यासाठी गणराया पुरस्कार २०२० देण्याची घोषणा पालिकेने केली आहे.त्यासाठी गणेश मंडळांना गुगल फॉर्म द्वारे नोंदणी करण्याचे आवाहन महापौर विक्रांत गोजमगुंडे, उपमहापौर चंद्रकांत बिराजदार यांनी केले आहे. कोरोनाच्या पार्श्र्वभूमीवर यावर्षीचा गणेशोत्सव शांततेत पार पडला. इतर वर्षाप्रमाणे यावर्षी विविध सामाजिक उपक्रम झाले नसले तरीही परिस्थितीचे भान राखत सार्वजनिक गणेश मंडळांनी आरोग्यविषयक उपक्रमांना प्राधान्य दिले.अनेक मंडळांनी कोरोना विषयी जनजागृती केली. काही मंडळांनी रक्ताचा तुटवडा दूर करण्यासाठी शिबिरे घेतली. कोरोना संसर्ग कमी करण्यासाठी पुढाकार घेत काही मंडळांनी मास्क, सॅनिटायझर आणि प्रतिकार शक्ती वाढवणाऱ्या गोळ्यांचे वाटपही केले.प्रशासकीय यंत्रणेला मदत करण्यासाठी काही मंडळांनी पुढाकार घेतला. ज्या सार्वजनिक गणेश मंडळांनी सामाजिक उपक्रम राबवले त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी महापालिकेने या पुरस्कारांचे आयोजन केले आहे. याअंतर्गत प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाचे पुरस्कार दिले जाणार आहेत.यासाठी सार्वजनिक गणेश मंडळांना https://forms.gle/fW8zwxGwWK 8xo5cX7 या लिंक वर जाऊन गुगल फॉर्म द्वारे नोंदणी करणे आवश्यक आहे. शहरातील जास्तीत जास्त सार्वजनिक गणेश मंडळांनी या उपक्रमात सहभाग नोंदवावा, असे आवाहन महापौर विक्रांत गोजमगुंडे, उपमहापौर चंद्रकांत बिराजदार यांनी केले आहे.

### प्राण्यांना क्रूरतेने वागविण्यास प्रतिबंध



पालघर : पालघर जिल्ह्यामध्ये असणाऱ्या घोड्यांची संख्या व या प्राण्यांचा ओढ्काम, भारवाहतूक घोडेस्वार, लग्नसमारंभ इत्यादींसाठी करण्यात येणारा वापर लक्षात घेता घोडे मालकांकडून सदर प्राण्यांवर होत असलेले अत्याचार पाहता या बाबतीत आयुक्त पशुसंवर्धन ह्यांनी जारी केलेल्या पत्रानुसार सदर बाब हि अत्यंत गंभीर असल्याचे निर्देशित केले आहे. सदर घोड्यांना नियंत्रित करण्यासाठी अणुकुचीदार, जखम करणाऱ्या वस्तू, चाबूक, लगाम, इ. गोष्टीचा वापर करण्यात येत असल्याने सदर बाब ओढ्काम व भारवाहतूक करणाऱ्या प्राण्यांना क्रूरतेने वागविण्यास प्रतिबंध नियम १९६५ चे उल्लंघन करणारी असल्याचे भारतीय जीवजंतू कल्याण मंडळ यांनी निर्देशित केले आहे. सदर कामकाजा दरम्यान घोड्यांना नियंत्रित करण्यासाठी अणुकुचीदार, जखम करणाऱ्या वस्तू, चाबूक, लगाम, इत्यादी गोष्टीचा वापर करण्यात येऊ नये. सदर प्राण्यांच्या बाबतीत वरील साधनांचा वापर करण्यात येणार नाही व या पासून प्राण्यांना कसलीही शारीरिक इजा होणार नाही याची खबरदारी प्रत्येक घोडे मालकांनी घ्यावी. तसेच ओढ्काम व भारवाहतूक करणाऱ्या प्राण्यांना क्रूरतेने वागविण्यास प्रतिबंध नियम १९६५ याचे उल्लघन होणार नाही याची दक्षता प्रत्येक घोडे मालकांनी घ्यावी असे आवाहन जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त पालघर डॉ. प्रशांत ध. कांबळे यांनी केले.

# वसईत महामंडळाची एसटी बँक फोडण्याचा चोरांचा प्रयत्न फसला

**वसई/प्रतिनिधी**

वसई पश्चिमेकडील रा.प. महामंडळातील कर्मचाऱ्यांची असलेली एस टी कॉपरेटिव्ह बँक फोडून चोरी करण्याचा प्रयत्न झाल्याची धक्कादायक घटना बुधवारी मध्यरात्री घडली आहे. गुरुवारी सकाळी बँकेचे अधिकारी बँक उघडण्यासाठी आल्यावर हा प्रकार उघडकीस आला आहे. वसई पोलिसांनी गुरुवारी चोरीचा प्रयत्न हा गुन्हा दाखल केला आहे.

वसई पश्चिमेकडील रा. प. महामंडळाच्या आगारात असलेल्या सिक्युरिटीच्या कार्यालयातून बँकेची चावी घेऊन गुरुवारी सकाळी १० वाजण्याच्या सुमारास बँकेचे कर्मचारी सुनील तांदळेकर (५३) आणि प्रकाश नाईक बँक उघडण्यासाठी गेले. बँकेच्या तळ मजल्यावरील ग्रील एका बाजूने वाकवून उघडलेले दिसून आले. तसेच बँकेचे ग्रीलचे टाळे हे तोडून जिन्यावर फेकलेले. मुख्य दरवाजाचा कडी कोयंडा टाळ्यासह उचकटून दरवाजा उघडा दिसला. सदरचा प्रकार सुनील यांनी स्टँड इंचार्ज संजीव पॉल डिसुझा व सुरक्षारक्षक आर एस किणी यांना बोलावून दाखवले. तसेच बँकेचे मुख्य कार्यालय आणि पालघर येथील रामपचे विभागीय कार्यालय यांना कळवून वसई पोलिसांना घडलेल्या घटनेची माहिती दिली. पोलीस घटनास्थळी आल्यावर बँकेच्या आतमध्ये जाऊन बँकेची तिजोरी खोलून पहिली. तिजोरीतील रक्कम तपासली असता ती बरोबर होती. बँकेतील इतर दस्तावेज तपासले असता सुस्थितीत व व्यवस्थित होते. चोरांनी बँक लुटण्याचा प्रयत्न केला होता.

दरम्या बँकेची ग्रील, कडी कोयंडा तोडून मुख्य दरवाजा उघडा दिसल्यावर वरिष्ठांना आणि माझ्या सहकाऱ्यांना सांगितल्यावर वसई पोलीस ठाण्यात तक्रार देऊन गुन्हा दाखल केला आहे, असे बँक कर्मचारी आणि फिर्यादी सुनील तांदळेकर यांनी सांगितले.



**सदर बँकेत चोरांनी चोरी करण्याचा प्रयत्न केला आहे. तक्रार आल्यावर घटनास्थळी जाऊन पाहणी केली व तक्रार घेऊन गुन्हा दाखल केला आहे.**

**- अनंत पराड (वरिष्ठ पोलीस निरीक्षक, वसई पोलीस ठाणे)**

# वसईत जुन्या वादातून वाहन चालक तरुणावर कटरने वार

वसई : वसई पूर्वेकडील चिंचपाडा येथील परिसरात राहणाऱ्या २६ वर्षीय वाहन चालक तरुणावर आरोपीच्या भावासोबत झालेल्या जुन्या भांडणाचा राग मनात धरून आरोपीने धारदार कटरने गळ्यावर वार केल्याची घटना मंगळवारी संध्याकाळी घडली आहे. त्याला जखमी अवस्थेत उपचारासाठी महानगरपालिकेच्या सर डी एम पेटिट रुग्णालयात भर्ती केले आहे. हॉस्पिटलमधून जवाब आणल्यावर पोलिसांनी आरोपी विरोधात जबर दुखापतीचा गुन्हा दाखल केला आहे. वसई पूर्वेकडील चिंचपाडा येथील मराठी जिल्हा परिषद शाळेजवळील चाळीमध्ये राजेंद्र रामचंद्र कांबळे (२६) वा वाहन चालक तरुण परिवारासह राहतो. मंगळवारी संध्याकाळी साडे सात वाजण्याच्या सुमारास राजेंद्र मराठी शाळेजवळ फिरत होता. काही दिवसांपूर्वी त्याचे आरोपीचा भाऊ सैफ याच्यासोबत किरकोळ भांडण झाले होते. हाच राग मनात धरून आरोपी सलमान अन्सारी याने राजेंद्रला शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. तो घरी जाण्यासाठी निघाल्यावर आरोपीने पाठीमागून येऊन धारधार कटरने डाव्या बाजूच्या गळ्यावर वार करून जखमी केले.

# धनेगांव येथे अवैध देशी दारु विक्री बंद करण्याची मागणी

**देवणी/प्रतिनिधी**

तालुक्यातील व ग्रामीण भागातील शिक्षणाचे माहेरघर म्हणून पंचक्रोशीत नाव लौकिक असलेले धनेगांव हे अवैध धंद्याचे माहेरघर झाले आहे. गलोगल्ली देशी दारुचा धंदा जोरात चालु आहे. याकडे मोठ्या प्रमाणात तरुण पिढी देखील आकर्षीत होत आहे. त्यामुळे गावचे व देशाचे भविष्य असलेली तरुण पिढी हि व्यसनाधीन झाल्यामुळे यांचे व देशाचे भविष्य अंधकारमय झाले आहे व या अवैध दारुविक्रीमुळे यापुर्वी गावातील सात कुंटुबे उधवस्त झाली आहेत.या दारुविक्रीमुळे गावात भांडणे, तंटे, मारामारी, चोरी करणे इत्यादी प्रकार सर्रासपणे होत असल्याचे निवेदनात सांगण्यात आले आहे. धनेगांव गावातील अवैध दारु विक्री लवकर बंद नाही झाली. तर ग्रामस्थाच्या वतीने लोकशाही पध्दतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल असे सांगण्यात आले आहे. सदरील निवेदन देवणी पोलीस स्टेशनचे पोलीस निरक्षक कामठेवाड यांना देण्यात आले. या निवेदनावर भाजयुमो तालुका अध्यक्ष रामलिंग शेरे, बाळासाहेब बिरादार, किशोर बिरादार, मुरहारी बिरादार, बालाजी बिरादार, राम खारे, ललुबाई शेटकार, उषाबाई शेटकार, माणिक बिरादार, राजकुमार बिरादार, रामभाऊ बिरादार, दिपक आलमले, बालाजी बिरादार, बाबुराव व्यंकोबा बिरादार, गणेश अंगद बिरादार, उध्दव नरसिंग बिरादार या ग्रामस्थाच्या निवेदनावरती स्वाक्षरी आहेत. या निवेदनाच्या प्रती तहसीलदार व वरिष्ठ पोलिस प्रशासनाला देण्यात आल्या आहेत.

# वन अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना हौतात्म्य आल्यास सानुग्रह अनुदानाची योजना मंत्रिमंडळासमोर आणणार -संजय राठोड




**यवतमाळ/प्रतिनिधी**

वन विभागातील फ्रंटलाइन अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रत्यक्ष वन्यजीव व वन संरक्षण करताना हौतात्म्य आल्यास सानुग्रह अनुदान देण्याबाबतची योजना लवकरच मंत्रिमंडळासमोर आणणार असून प्रत्येक जिल्ह्यात वन हुतात्मा स्मारक उभारणार असल्याचे वन मंत्री संजय राठोड यांनी सांगितले. यवतमाळ येथे आज राष्ट्रीय वन हुतात्मा दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात वन हुतात्म्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यावेळी ते बोलत होते.

मंत्री राठोड म्हणाले, आपला समाज हा पूर्वीपासूनच निसर्गपूजक म्हणून ओळखला जातो. जंगले वाढली तरच मानवाचा या धरतीवर टिकाव लागेल. जंगलांचे महत्व संतांनीसुद्धा वर्णिले आहे.११ सप्टेंबर १७३८ रोजी, स्थानिक राजाने दिलेल्या वृक्षतोडीच्या अयोग्य आदेशाविरूद्ध, राजस्थान येथील बिष्णोई समाजाच्या ३६३ व्यक्तींनी आपले बलिदान दिले होते. राज्यात सुद्धा अनेक वन अधिकारी व कर्मचारी यांनी वन्यजीव व वने यांच्या संरक्षणासाठी आपल्या प्राणांची आहुती दिली आहे. वन्यजीव व वन संरक्षणासाठी वन अधिकारी व कर्मचारी यांनी दिलेले बलिदान हे नक्कीच प्रेरणादायी व स्फूर्तिदायक आहे. त्यांच्या या अतुलनीय बलिदानाच्या स्मरणार्थ नागपुर येथे वन हुतात्मा स्मारक उभारण्यात आले आहे. त्या धर्तीवर प्रत्येक जिल्ह्यात वन हुतात्मा स्मारक उभारण्यात येणार आहे. वन्यजीव व वनसंपदेचे संरक्षण व संवर्धन करणे ही वन विभागाची प्राथमिकता आहे. त्या अनुषंगाने राज्यात वन अधिकारी व कर्मचारी यांच्यामार्फत आपण वन्यजीव व वनसंपदेचे संरक्षण व संवर्धन करत आहोत. आजही वन्यजीव यांची शिकार आणि नैसर्गिक संसाधनांची तोड व चोरटी वाहतूक रोखण्यासाठी अनेक वनाधिकारी आणि वन कर्मचारी स्वत:चा जीव धोक्यात घालत आहेत. बऱ्याच वेळा असे संरक्षण करत असतांना अशा अधिकारी व कर्मचारी, विशेषतः फ्रंटलाईन अधिकारी व कर्मचारी जसे वन परिक्षेत्र अधिकारी, वनपाल, वन रक्षक, वाहनचालक यांच्यावर प्राणघातक हल्ले होत असतात. अशा हल्यात बऱ्याच वेळा त्यांना आपल्या प्राणास मुकावे लागते. अशी दुर्दैवी घटना घडल्यास अशा अधिकारी व कर्मचारी यांच्या कुटुंबियांसाठी सानुग्रह अनुदान देण्याची योजना लवकरच मंत्रिमंडळासमोर आणणार असल्याचे वनमंत्र्यांनी सांगितले.

# कोकण विभागातील मृत्यूदर कमी करण्यासाठी प्रयत्न करावेत -मिसाळ

**नवी मुंबई/प्रतिनिधी**

कोविड-१९ च्या आजाराने कोकण विभागातील मृत्यूदर कमी करण्यासाठी सर्व यंत्रणांनी एकत्रितपणे प्रतिबंधात्मक सर्व उपाययोजना करावी. असे आदेश आज कोकण विभागीय महसूल आयुक्त आण्णासाहेब मिसाळ यांनी दिले. राज्यातील ज्या महानगरपालिकेत सॅम्पल पॉझिटिव्ह रेशियो जास्त आहे.

अशा ठिकाणी तपासणीच्या संख्या मोठया प्रमाणावर वाढविण्यात यावेत. जेणेकरून आजाराचे निदान होऊन मृत्यूदर कमी होईल. तसेच सद्यस्थिती रुग्ण संख्या विचारात घेऊन एक महिन्यातील वाढ विचारात घेता उपचार सुविधा म्हणजे आयसीयु, ऑक्सीजन सुविधा देण्यात याव्यात अशा सूचना विभागीय महसूल आयुक्त आण्णासाहेब मिसाळ यांनी दिल्या. या शिवाय वादळात झालेल्या नुकसान भरपाईचे वाटप, सातबारा, संगणीकरण, ई-फेरफार याबाबत उर्वरित कामे तात्काळ करण्याचे निर्देश विभागीय आयुक्त आण्णासाहेब मिसाळ यांनी दिले.



यावेळी कोकण विभागातील जिल्हाधिकारी ते तहसिलदारपर्यतची टेलिफोन डिरेक्टरीचे प्रकाशन विभागीय आयुक्त आण्णासाहेब मिसाळ यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उपायुक्त (महसूल) सिध्दाराम सालीमठ, उपायुक्त (सामान्य) मनोज रानडे, उपायुक्त (करमणूक) श्रीमती सोनाली मुळे, उपायुक्त (पुनर्वसन) पंकज देवरे, उपायुक्त (विकास) गिरीष भालेराव आदि उपस्थित होते.

# सावकारी, मटका आता जुगाऱ्यांची बारी; जुगार अड्ड्यावर छापा

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापुरातील सम्राट चौक परिसरातील एका जुगार अड्ड्यावर शहर गुन्हे शाखेने छापा टाकून बारा जणांना अटक केली असून त्यांच्याकडून रोख रक्कम ७०००० हजार तसेच पाच लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. याबाबत १२ जणांवर जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे सावकारी, मटक्यावरील पोलिसांच्या कारवाईनंतर जुगारावर मोठी धाड टाकण्यात आल्याने अवैध धंदेवाल्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

अश्विन शिंदे हा सम्राट चौक येथील एका पत्र्याच्या शेडमध्ये जुगार अड्डा चालवत असल्याची माहिती शहर गुन्हे शाखेला मिळाली होती. त्यानुसार फौजदार संदीप शिंदे व त्यांच्या पथकाने शुक्रवारी रात्री जुगार अड्ड्यावर छापा टाकला. त्यावेळी बारा जण जुगार खेळत बसलेले होते. पोलिसांनी या सर्वांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडील ७१ हजार रुपयांची रोकड. सहा मोटारसायकली असा चार लाख ९० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. अश्विन प्रल्हाद शिंदे (वय ३४) यांच्यासह ११ नामे रविराज बलभीम गायकवाड (वय ३५), नितीन सुरेश नागटिळक (वय ४०), संजय अजित पोळ (वय ४०), अभिजीत शिवानंद म्हमाणे (वय ३५), श्रीनिवास नागनाथ गायकवाड (वय ४२), हरिश्चंद्र प्रकाश कुंभारे (वय ३०), लक्ष्मण सुरेश कांबळे (वय २४) गौरव तुकाराम माळी (वय ३६), संदीप बन्सी जाधव (वय ३०), शुभम अंकुश गायकवाड (वय २४), राजू काशिनाथ सुर्वे (वय ३४) अशी यांची नावे आहेत. वरील सर्वजण गोलाकार बसून पत्त्यांच्या पानांवर पैज लावून अंदर- बाहर, मन्ना नामक जुगार खेळत होते. निदर्शनास आल्याने त्यांना ताब्यात घेतले असून त्यांचे ताब्यातून जुगार मुद्देमाल हस्तगत करून सदर बाबत जोडभावी पोलीस ठाणे येथे रोख रक्कम ७० हजार ९५०, ११ मोबाईल, ६ मोटरसायकल, ६ लाख ९० हजार ९५० चा मुद्देमाल हस्तगत केला गेलेला आहे. सदरची कामगिरी सोलापूर शहर पोलीस आयुक्त अंकुश शिंदे, पोलीस उपायुक्त गुन्हे शाखा बापू बांगर, सहाय्यक पोलीस आयुक्त गुन्हे अभय डोंगरे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक गुन्हे शाखा संजय जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली संदीप शिंदे, दिलीप नागटिळक, अजय पाडवी, जयसिंग भोई, सागर गुंड, अश्रूभान दुधाळ, गणेश शिंदे, चालक काकडे यांनी पार पाडली आहे.

14 TO 20 SEPTEMBER 2020 - Page 4 (CRIME SANDHYA):Layout 1 12/09/2020 8:38 PM Page 1



# महाराष्ट्राची बदनामी करणाऱ्या हिंदी न्यूज चॅनलवर बहिष्कार टाका!

लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या प्रसार माध्यमांची विश्वसनीयता आता संपल्यात जमा आहे असे म्हणायला काही हरकत नाही. कारण प्रिंट मीडिया आपल्या मर्यादेत राहून काम करीत असताना इलेक्ट्रॉनिक मीडियाने मात्र अक्षरशः लाज लज्जा सोडली आहे. कारण गेल्या काही महिन्यांपासून इलेक्ट्रॉनिक मीडियामध्ये जे काही सुरू आहे ते पत्रकारितेच्या मूळ तत्वाला डांबर फासणारे आहे. कुठलं तरी एक प्रकरण घ्यायचं आणि ते दिवसभर चघळत राहायचं. त्यातून एखाद्या पक्षाला किंवा राज्याला टार्गेट करून त्याची सतत बदनामी करीत राहायचं. हाच धंदा सध्या इलेक्ट्रॉनिक मीडियामध्ये सुरू आहे. त्यामुळे या लोकांच्या विरोधात जनतेत एक असंतोषाची भावना निर्माण झालेली आहे आणि सरकारने जनतेच्या या असंतोषाची जर वेळीच दखल घेतली नाही तर सहनशीलता संपलेले लोकं यांना स्टुडिओत घुसून मारतील, इतकेच नाही तर यांच्या रिपोर्टर लोकांना रस्त्यावर फिरायला देणार नाहीत. कारण लोकांचा संताप काय असतो हे काही चॅनलवाल्यांनी यापूर्वी अनुभवले आहे. सध्या सुशांतसिंग राजपूत आत्महत्येच्या प्रकरणापासून हिंदी चॅनलवाल्यांनी महाराष्ट्राची सुपारी घेतली आहे. महाराष्ट्र सरकार असो की मुंबई पोलीस असो सर्वांची हिंदी चॅनलवरून बदनामी सुरू आहे. सुशांत आत्महत्या प्रकरणात म्हणे मुंबई पोलीस आरोपींना वाचवत आहेत. तसेच महाराष्ट्र आणि मुंबई आता लोकांसाठी सुरक्षित राहिलेला नाही अशी कोल्हेकुई त्यांनी सुरू केलेली आहे. कोणतेही हिंदी चॅनल लावा त्यावर महाराष्ट्राची बदनामी सुरू असते. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांचा एकेरी उल्लेख केला जातोय. महाराष्ट्र हे आर्थिक आणि सामाजिक दृष्ट्या देशातील सर्वात मोठे प्रगत राज्य म्हणून ओळखले जाते. मुंबई, महाराष्ट्राने देशाच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या सर्वांना इथे रोजी रोटी दिली, त्यांना मोठे होण्याची संधी दिली. तरी महाराष्ट्र वाईट कसा? उलट युपी-बिहार पेक्षा महाराष्ट्राची स्थिती कितीतरी पटीने चांगली आहे. मात्र हिंदी चॅनलवाल्यांना महाराष्ट्राबद्दल नेहमीच आकस होता आणि आताही आहे. म्हणून तर रोजच्या रोज महाराष्ट्राची बदनामी केली जात आहे. त्यामुळे केंद्राने इलेक्ट्रॉनिक मीडियाच्या बेताल वर्तनाची दाखल घेऊन त्यांच्या या कृत्याना कुठे तरी पायबंद बसेल अशी काहीतरी मीडिया पॉलिसी आणावी. चॅनलवाल्यांना कुणाचीही बदनामी करण्याचा, प्रतिक्रियेसाठी कुणावरही जबरदस्ती करण्याचा एखाद्या मोठ्या प्रकरणाच्या तपासात आरोपीला घाबरवण्याचा किंवा अगोदरच दोषी ठरवण्याचा या लोकांना कोणी अधिकार दिला आहे. मुळात एखाद्या संवेदनशील प्रकरणाचा तपास सुरू असताना आरोपी किंवा तपास अधिकारी यांनी इलेक्ट्रॉनिक मीडियाला तपासाबाबत माहिती का द्यावी. कारण त्यांनी गोळा केलेल्या माहितीनुसार गोपनीयतेवरच पुढील तपासाची दिशा अवलंबून असते. अशावेळी आरोपी अथवा तपास अधिकाऱ्यांनी मिडीयाला काही माहिती दिली तर त्या प्रकरणातील जे खरे दोषी असतील ते सावध होऊन अंडर ग्राउंड होऊ शकतात आणि तपास रेंगाळू शकतो याची साधी अक्कल ही बूम घेऊन फिरणाऱ्या नसेल तर त्यांना पत्रकार का म्हणावे? सुशांत प्रकरणाचा तपास सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशावरून सीबीआयकडे देण्यात आला आहे आणि सीबीआय आता योग्य दिशेने तपास करीत आहे. मात्र हा तपास सुरू असताना रिया चक्रवर्ती तिचे कुटुंबीय सीबीआयसमोर चौकशीला जात असताना त्यांना ज्या पद्धतीने या इलेक्ट्रॉनिक मीडियावाल्यांनी त्रास दिला ते पाहणे संतापजनक होते आणि हे प्रकरण एनसीबीकडे गेल्यावर तर हा त्रास इतका वाढला की रियाला या तथाकथित मीडियावाल्यांपासून संरक्षण मिळावे म्हणून पोलिस ठाण्यात धाव घ्यावी लागली. अशा तऱ्हेने एखाद्या आरोपीला हे लोक का त्रास देतात यांना तसा कोणी अधिकार दिला आहे. कारण त्यांची स्पॉटवरची मुजोरी आणि बॉडी लँगवेज पाहता हेच लोक जणू काही सरकार किंवा पोलिस खाते आहेत अशा प्रकारे वागत असतात. पण ते असे का करतात? त्यांना त्यांची पायरी ओळखता यायलाच हवी. समजा एखाद्या माणसाने त्यांना कॅमेऱ्याच्या समोर प्रतिक्रिया दिलीच नाही तर हे लोक त्याच काय वाकड करू शकतात आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे कंगना राणावत प्रकरणात या हिंदी चॅनलवाल्यांनी ज्या पद्धतीने मुंबई पोलिसांची आणि महाराष्ट्र सरकारची बदनामी केली ती पूर्णपणे अन्यायकारक होती. प्रत्येक मराठी माणसाच्या मनात चीड निर्माण करणारी होती. समजा एखाद्या माणसाची सहनशीलता संपली असती आणि त्याने यांच्या रिपोर्टर किंवा कॅमेरामनला रस्त्यातच चोपले असते तर हे लोक काय करणार आहेत? प्रत्येक माणसाला त्याच्या राज्याचा त्याच्या शहराचा स्वाभिमान असतो हे हिंदी चॅनलवाले जाणून बुजून लोकांच्या स्वाभिमानाला डिवचण्याचा प्रयत्न करीत असतात. त्यामुळे आज ना उद्या यांना मराठी माणसाच्या प्रक्षोभचा सामना करावाच लागणार आहे. ठीक आहे तुम्ही एखाद्या ठिकाणी अन्याय होत असेल तर त्याविरुद्ध जरूर आवाज उठवा, पण एकतर्फी वृत्तांकन करू नका. कंगना नावाची पिसळलेली कुत्री महाराष्ट्राला पाकिस्तान म्हणत असताना महाराष्ट्रातली परिस्थिती खरोखरच पाकिस्तान सारखी आहे का असे तिला या लोकांनी का विचारले नाही? किंवा महाराष्ट्र जर तिला पाकव्याप्त काश्मीर प्रमाणे वाटत असेल तर इतकी वर्ष ती इथे सुरक्षित कशी राहिली हा प्रश्न हे इलेक्ट्रॉनिक मीडियावाले कंगनाला का विचारत नाहीत. फक्त कंगनाची लाल करायची तिच्यावर महाराष्ट्र सरकार कशाप्रकारे अन्याय करीत आहे हे दिवसभर दाखवायचे, त्यावर डिबेटसाठी त्यांच्याच मर्जीतल्या दोन चार लोकांना बोलवून त्यांच्याकडूनही महाराष्ट्र कसा वाईट आहे आणि कगंनावर कसा अत्याचार होतोय हे वदवून घ्यायचे, असे प्रकार सध्या सुरू झालेत. हे जर दुसऱ्या कुठल्या राज्यात झाले असते तर या लोकांनी मार खाल्ला असता. पण महाराष्ट्रातला माणूस समजदार आहे. कायदा मानणारा आहे आणि मुख्य म्हणजे महिलांचा सन्मान करणारा आहे आणि त्याचाच कंगना आणि हे हिंदी चॅनलवाले गैरफायदा घेत आहेत. त्यामुळे महाराष्ट्रातील जनतेने या हिंदी वृत्तवाहिन्यांवर बहिष्कार टाकावा केबलवाल्यांनी त्यांना काही काळासाठी तरी ब्लॅक आऊट करावे त्यांना जाहिराती देणाऱ्या कंपन्यांच्या उत्पादनावर बहिष्कार टाकावा एकदा का त्यांचा टीआरपी घसरला की मग त्यांची अक्कल ठिकाणावर येईल. महाराष्ट्रातील १२ कोटी जनतेने महाराष्ट्राचा अपमान करणाऱ्या या हिंदी वृत्त वाहिन्यांना धडा शिकवण्याची वेळ आता आली आहे. त्यांना छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्य शाली महाराष्ट्राची ताकत दाखून द्या जेणे करून त्यांना पुन्हा महाराष्ट्राची बदनामी करण्याचे धाडस होणार नाही.

# मराठा आरक्षणाचे भवितव्य काय!



मराठा आरक्षणाचा मुद्दा पुन्हा एकदा तापला असून सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयावर संपूर्ण मराठा समाज नाराज आहे. कारण सर्वोच्च न्यायालयाने हे प्रकरण घटना पिठाकडे वर्ग करताना मराठा आरक्षणाला स्थगिती दिली आहे. त्यामुळे २०२०/२०२१ या काळात नोकरी अथवा शैक्षणिक क्षेत्रात आरक्षणानुसार मराठा समाजाला सवलत मिळणार नाही. मात्र याला राज्य सरकार जबाबदार आहे. कारण सरकारने या प्रश्नावर न्यायालयात योग्यरीत्या बाजू मांडली नाही, म्हणूनच आरक्षणाला स्थगिती मिळाली असा मराठा संघटनांचा आरोप आहे. पण हे सर्व कसे झाले? कारण तामिळनाडू सरकारने आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडली आणि प्रकरण जेंव्हा सर्वोच्च न्यायालयात गेले तेंव्हा तिथे ते टिकले. मग महाराष्ट्र सरकारलाच मराठा आरक्षण सर्वोच्च न्यायालयात का टिकवता आले नाही? असा सवाल आता मराठा संघटना करीत आहेत. त्यांचा आता महाराष्ट्र सरकारवर विश्वास राहिलेला नाही. म्हणून मराठा क्रांतीमोर्चा आता पुन्हा आंदोलनाच्या तयारीत आहे. काल भलेही मराठा संघटनांच्या प्रतिनिधींशी मुख्यमंत्र्यांची चर्चा झालेली असली तरी मराठा क्रांती मोर्चा आता भलताच आक्रमक झाला आहे. वास्तविक जरी हे प्रकरण घटना पीठाकडे वर्ग करण्यात आले असले तरी अंतरिम आदेशात न्यायालयाकडून मराठा आरक्षणाला स्थगिती मिळेल असे कुणालाही वाटले नव्हते. त्यामुळे भलेही हे प्रकरण घटना पिठाकडे गेलेले असले तरी आता तिथेही मराठा आरक्षणाचे भवितव्य काय असेल याबाबत शंका निर्माण झाली आहे आणि म्हणूनच मराठा क्रांती मोर्चाचे नेते अस्वस्थ आहेत. कारण या मराठा आरक्षणासाठी त्यांनी एकाच वेळी रस्त्यावरची आणि न्यायालयीन अशा दोन लढाया लढल्या आहेत. महाराष्ट्राच्या इतिहासातील हे एक मोठे आंदोलन होते आणि या आंदोलनाच्या काळात मराठा आरक्षणासाठी ४४ तरुणांचे बळी गेले आहेत. संपूर्ण महाराष्ट्रात ५६ मुक मोर्चे काढूनही मराठा समाजाला न्याय मिळालेला नाही आणि म्हणूनच मराठा समाज संतापलेला आहे. राणे समितीच्या शिफारशींवरून तत्कालीन काँग्रेस राष्ट्रवादी सरकारने मराठ्यांना नोकरी व शिक्षणात १६ टक्के आरक्षण दिले होते. मात्र असे आरक्षण देताना ते कायद्याच्या कसोटीवर टिकेल की नाही याचा जराही विचार केला नव्हता आणि शेवटी तसेच झाले. मराठा आंदोलन कायद्याच्या कसोटीवर टिकलेच नाही. मात्र २०१४ साली राज्यात सत्तांतर होऊन सेना-भाजप युतीचे सरकार आले आणि या सरकारने विधिमंडळात मराठा आरक्षणाचा ठरावच मंजूर करून घेतला. तसेच हे आरक्षण कायद्याच्या कसोटीवर कसे टिकेल यासाठी प्रयत्न सुरू केले. कारण राज्यात ऑलरेडी ५० टक्के आरक्षण विविध समाजाला दिलेले असताना आरक्षणाची मर्यादा ओलांडता येत नव्हती. त्यामुळे तामिळनाडूच्या धर्तीवर मराठा समाजासाठी स्वतंत्र प्रवर्ग तयार करून मराठा आरक्षण टिकवण्याची प्रयत्न केला. त्यासाठी मराठा समाजामध्ये सुद्धा आर्थिक दृष्ट्या मागासलेपणा असून तसे पुरावे तयार करून प्रकरण मागासवर्ग आयोगाकडे देण्यात आले आणि मागासवर्ग आयोगाने या सर्व पुराव्यांचा अभ्यास करून मराठा समाजाला सरकारने जे आरक्षण दिले आहे ते योग्य असल्याचा अहवाल मुंबई उच्च न्यायालयाला सादर केला आणि या अहवालनुसार उच्च न्यायालयाने मराठ्यांना शिक्षणात १२ तर नोकऱ्यांमध्ये १३ टक्के आरक्षण देण्यास मंजुरी दिली. मात्र आरक्षणाची ५० टक्क्यांची मूळ मर्यादा ओलांडलेली असल्याने मुंबई उच्च न्यायालयाच्या या आदेशाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले आणि तेंव्हापासून हा प्रश्न सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहे. सध्याच्या महाविकास आघाडीने मराठा आरक्षण न्यायालयात टिकावे यासाठी एक उपसमिती तयार केली. तसेच निष्णात वकिलांची फौज उभी केली. पण सरकार कमी पडले. कारण ज्या पद्धतीने तामिळनाडू सरकार न्यायालयीन लढाई लढले त्या पद्धतीने महाराष्ट्र सरकार लढत नसल्याचा आणि म्हणूनच हा प्रश्न लोमबकळत राहिल्याचा आरोप आता मराठा समाज करीत आहे. मराठा आरक्षणाच्या या मुद्यावर ठोस आणि कायमस्वरूपी तोडगा निघावा म्हणून हे प्रकरण घटना पिठाकडे वर्ग करण्याची विनंती मराठा नेत्यांनी केली होती ती मान्य करण्यात आली. पण असे करताना हे प्रकरण घटना पिठाकडे जाईपर्यंत सर्वोच्च न्यायालय आरक्षणाला स्थगिती देईल असे कुणालाच वाटले नव्हते. पण न्यायालयाने मराठा आरक्षणाला स्थगिती दिल्यामुळे या प्रकरणाची घटना पिठात जेंव्हा केंव्हा अंतिम सुनावणी सुरू होईल आणि त्यानंतर घटना पीठ आपला अंतिम आदेश देईल. तोपर्यंत मराठा आरक्षणावर स्थगिती राहणार आहे. त्यामुळेच मराठा संघटना धास्तावलेल्या आहेत. त्याच बरोबर सर्वोच्च न्यायालयाच्या या आदेशामुळे ११वीच्या प्रवेशा संदर्भात शिक्षण खात्याची कोंडी झाली आहे. कारण विविध महाविद्यालयांमध्ये अकरावीची प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. मात्र ज्यांनी मराठा आरक्षणाचे शैक्षणिक सवलतीनुसार प्रवेश घेतला आहे त्यांचे काय? एकूणच यातील गुंता वाढला आहे. त्यामुळे मराठा आरक्षणाच्या भवितव्याबद्दल प्रश्नचिन्ह निर्माण झाला आहे.

**संध्या स्ट्रोक**

**सोनू जाधव**

**(मोबाईल नंबर : ७०२१४७६१५३)**

# देशातील प्रत्येक सातवी आत्महत्या महाराष्ट्रात!

## राज्य बनले आत्महत्येचं केंद्र

**दिशायन**



अभिनेता सुशांत सिंह राजपूत याच्या आत्महत्या प्रकरणमुळे गेल्या जवळपास ३ महिन्यांपासून सर्व देश ढवळून निघाला आहे. सारी माध्यमे या एका आत्महत्येभोवती रेंगाळत आहे. त्याच वेळी राष्ट्रीय गुन्हे नोंद (नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरो) विभागाचा आत्महत्येसंदर्भात धक्कादायक अहवाल प्रसिध्द झाला आहे. टाळेबंदीच्या काळात देशात सुशांतसह इतर ३३७ व्यक्तींनी आत्महत्या केली. या आत्महत्या करोना विषाणूला घाबरून, एकटेपणामुळे आणि पैशांची चणचण असल्यामुळे झाल्याचे समजते. एकीकडे करोनाच्या थैमानामुळे लोकांचे मोठ्याप्रमाणात संसर्गाने मृत्यू होत आहेत, तर दुसरीकडे आत्महत्यांचे प्रमाण वढत आहे. राष्ट्रीय गुन्हे नोंद विभागाने या अहवालात मागील वर्षभरात घडलेल्या गुन्ह्यांचा लेखाजोखा मांडलेला असतो. त्यानुसार भारत जगात आत्महत्येची राजधानी बनला आहे. तर महाराष्ट्र देशातल्या आत्महत्येचा केंद्र ठरला आहे.

भारतात आत्महत्येचे प्रमाण २०१९ या वर्षात ३.४ टक्क्यांनी वाढले आहे. म्हणजेच २०१८ मध्ये १ लाख ३४ हजार आत्महत्या झाल्या होत्या. तर २०१९ मध्ये १ लाख ३९ एवढ्या आत्महत्या झाल्या. मागील वर्षी देशात झालेल्या एकूण आत्महत्यांपैकी प्रत्येक सातवी आत्महत्या महाराष्ट्रात झाली. राज्यातील आत्महत्येचे प्रमाण ५ टक्क्यांनी वाढले आहे. महाराष्ट्रात २०१८ मध्ये १७ हजार ९७२ आत्महत्या झाल्या होत्या. तर २०१९ मध्ये या संख्येत ९४४ आत्महत्येच्या प्रकरणांची भर पडली आहे. अर्थात १८ हजार ९१६ लोकांनी विविध कारणांमुळे आत्महत्या केल्या.

महाराष्ट्राच्या खालोखाल दुसऱ्या क्रमांकावर तमिळनाडू राज्यात सर्वाधिक १३ हजार ४९३ एवढ्या आत्महत्या झाल्या आहेत. तर तिसऱ्या क्रमांकावर पश्चिम बंगाल आहे. येथे १२ हजार ६६५ इतक्या आत्महत्या झाल्या. चौथ्या क्रमांकावर मध्यप्रदेश असून १२ हजार ४५७ एवढ्या आत्महत्या झाल्याची नोंद आहे. तर पाचव्या क्रमांकावर असलेल्या कर्नाटक राज्यात ११ हजार २८८ आत्महत्या झाल्या आहेत. शहरांमध्ये होणाऱ्या आत्महत्यांपैकी २२ टक्के आत्महत्या या बेरोजगारीमुळे आणि उद्योगातील अपयशामुळे झाल्या आहेत. या अहवालावरुन पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे की महाराष्ट्रत शेतकरी आत्महत्या सर्वाधिक होतात. जसा महाराष्ट्र नोकऱ्या निर्मिती करण्यात, कर भरण्यात, उद्योग-धंद्यांमध्ये पहिल्या क्रमांकावर आहे. तसेच देशात महाराष्ट्र शेतकरी आत्महत्यांमध्ये पहिल्या क्रमांकावर आहे. मागील वर्षभरात भारतात १० हजार २८१ शेतकरी आत्महत्या झाल्या. त्यापैकी ३ हजार ९२७ आत्महत्या महाराष्ट्रात झाल्या.

जगात दर ४० सेकंदाला एक आत्महत्या होते. जगात होणाऱ्या ७९ टक्के आत्महत्या या कमी आणि मध्यम उत्पन्न असणाऱ्या देशात होत असल्याचेही निदर्शनास आले आहे. माणसाचा मृत्यू आजारपण, अपघात इत्यादी वेगवेगळ्या कारणांनी होत असतात. आत्महत्या हे माणसाच्या मृत्यूचे तिसरे महत्त्वाचे कारण बनले आहे. जगातील २० टक्के आत्महत्या या किटकनाशके प्राशन करून अर्थात स्वत:ला विषबाधित केल्यामुळे होतात. जगातल्या पहिल्या आत्महत्येची नोंद इ.स.पूर्व ४३४ मधील आहे. ही आत्महत्या एम्पेडॉक्लेस यांनी ग्रीसमध्ये केली होती. निश्चितच यापूर्वीही आत्महत्या झालेल्या असू शकतात. मात्र या आत्महत्येची सर्वात जुनी आणि पहिली नोंद असल्याचे पुरातत्त्वशास्त्रांनी सांगितले आहे.

जगातील वाढत्या आत्महत्यांचे प्रमाण बघता, २०१४ मध्ये पहिल्यांदा आत्महत्या रोखणे जगाची गरज' हा जागतिक आत्महत्या अहवाल बनवण्यात आला. आत्महत्या हा फक्त वैयक्तिक किंवा कौटुंबिक प्रश्न राहिलेला नसून तो सार्वजनिक मानसिक आरोग्याचा प्रश्न बनला आहे, असे जागतिक आरोग्य संघटनेने म्हटले. आत्महत्या थांबविण्यासाठी प्रत्येक देशाला मेंटल हेल्थ ॲक्शन प्लॅन राबविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. भारतात आत्महत्या होण्यामागे आर्थिक संकट, कौटुंबिक समस्या आणि करिअरमधील अडथळे ही तीन महत्त्वाची कारणे सांगितली जातात. मात्र तरुणांच्या आत्महत्येमागे अर्थ व्यवस्थापनाचा ताण, कामाचा अधिक दबाव, मानसिक थकवा, पीअर प्रेशर आणि पालकांचा विविध गोष्टींसाठी झालेला दबाव. या सारख्या कारणांवरुन तरुणांमध्ये झालेल्या कॉपीकॅट' आत्महत्येचे प्रमाण ५ टक्क्यांनी वाढले असल्याचे अभ्यासाअंती निदर्शनास आले आहे. तर परीक्षेत नापास होणाऱ्या विद्यार्थांपैकी ९० ते ९५ विद्यार्थी आत्महत्या करतात.

### माणसामधील आत्मघाती वर्तन

दिवस-दिवसभर उदास राहणे, मन:स्थिती सतत बदलत राहणे, अनपेक्षितरीत्या खूप राग येणे, रागामुळे स्वत:वरचा ताबा सुटणे, कामाबाबत उदासीनता, भविष्याबद्दल निराश वाटणे, नैराश्य-ताण यामुळे झोपेवर परिणाम होणे, आवडत्या गोष्टी नावडत्या वाटू लागणे, दैनंदि कामे बंद करणे इत्यादी लक्षणे आत्मघात करणाऱ्या व्यक्तीमध्ये सामान्यपणे दिसतात. या लक्षणांना टेलटेल साईन्स असेही म्हणतात. काही व्यक्ती अचानक घडलेल्या गोष्टीचा धक्का घेऊनही आत्महत्या करतात. अशावेळी व्यक्तीमधील लक्षणे ओळखता येत नाहीत. मात्र आपण एखाद्यामध्ये ही लक्षणे ओळखल्यानंतर आपण स्वत: त्या व्यक्तीशी बोलण्याचा प्रयत्न करावा. जुन्या आठवणी, त्याच्यातील चांगल्या गोष्टीची आठवण करून द्यावी, हसते-खेळते वातावरण निर्माण करावे. इत्यादी गोष्टी करून काही फरक पडत नसेल, तर त्वरीत त्या व्यक्तीचा समुपदेशकांशी संपर्क करून द्यावा किंवा समुपदेशकाकडे घेऊन जावे, असे मानसोपचार तज्ज्ञ, डॉ. महेश्वरी सचदेव यांनी सांगितले. आपल्या शाळा, महाविद्यालये, ट्युशन-क्लासेस, वसतिगृहे, कार्यालये इत्यादी ठिकाणी आत्महत्या प्रतिबंध आणि समुपदेशन केंद्राची माहिती, हेल्पलाईन क्रमांक प्रदर्शित करावेत. टाळेबंदी दरम्यान नागरिकांमधील नैराश्याचे प्रमाण वाढले होते, तसेच आत्महत्याही होत होत्या. यासाठी महाराष्ट्र शासनाने १८००१२०८२००५० हा टोल फ्री हेल्पलाईन क्रमांक सुरू केला. हा क्रमांक प्रत्येकाने आपल्या मोबाईलमध्ये साठवून ठेवावा. इतरांसाठी किंवा स्वत:साठी वेळ पडल्यावर याचा वापर करता येईल.

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून काशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): राम पाटोळे, कायदेशीर सल्लागार : ॲड.अनिल सांडभोर. न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

14 TO 20 SEPTEMBER 2020 - 5 (CRIME SANDHYA):Layout 1 12/09/2020 8:35 PM Page 1



# भिवंडी ग्रामीणमध्ये ८१९ बेडचे अत्याधुनिक साथ रोग नियंत्रण रुग्णालय लवकरच रुग्णांसाठी उपलब्ध

**भिवंडी/अभिजित हिरे**

मुंबई, ठाणे येथील रुग्णालयांवर आरोग्य सुविधेचा भार अधिक वाढत आहे.त्यामुळे रुग्णांची गैरसोय होत असल्याचे समोर आल्याने त्या पार्श्वभूमीवर ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री एकनाथ शिंदे यांनी जिल्ह्यातील आरोग्य सेवा अत्याधुनिक कशा होतील याकडे कटाक्षाने लक्ष केंद्रित केले असून त्यांच्या मार्गदर्शनाखाली भिवंडी तालुक्यातील सावद ग्रामपंचायत क्षेत्रात उभारले जाणारे अत्याधुनिक कोव्हिडं रुग्णालय भविष्यात जिल्ह्याचे साथ रोग नियंत्रण रुग्णालय म्हणून ओळख निर्माण होईल असे अत्याधुनिक रुग्णालय २ लाख ३० हजार चौरस फूट क्षेत्रफळाच्या जागेत बनविण्याचे काम अंतिम टप्प्यात असून त्याचे काम युद्धपातळीवर सुरू असून लवकरच रुग्णांसाठी उपलब्ध होणार असल्याची माहिती भिवंडी प्रांत अधिकारी डॉ.मोहन नळदकर यांनी दिली आहे.



तालुक्याच्या ग्रामीण भागात कोरोना रुग्ण व मृत्यु संख्या वाढत असल्याने ग्रामीण भागातील रुग्णांवर उपचार करणारी सक्षम आरोग्य यंत्रणा उभारली जावी अशी मागणी ग्रामीण भागातून करण्यात येत होती त्याची दखल भिवंडी उपविभागीय अधिकारी डॉ.मोहन नळदकर यांनी घेऊन पालकमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे रुग्णालयाचा प्रस्ताव सादर करून भिवंडी- कल्याण या महामार्गावरील सावद ग्रामपंचायत क्षेत्रातील सदरचे गोदाम बांधकाम याची निवड केली आहे. हे ठिकाण भिवंडी, शहापूरसह कल्याण, मुरबाड या तालुक्यातील ग्रामीण भागासाठी सुध्दा सोयीस्कर आहे.या जागेवर तब्बल ४० दिवस दिवसरात्र मेहनत करून हे रुग्णालय निर्माण करण्यात येत आहे. ३६० महिला, ३७९ पुरुष, ऑक्सीजन बेडच्या सुविधेसह ८० अतिदक्षता कक्षात २० व्हेंटिलेटर, २० बायपॅक व ४० हायफ्लो नॅशल कॅनॉल सुविधा असलेले बेड या ठिकाणी उपलब्ध केले आहेत.

या अत्याधुनिक रुग्णालयाची माहिती देताना उपविभागीय अधिकारी डॉ.मोहन नळदकर यांनी सांगितले की हे रुग्णालय उभारले जात असताना पालकमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्वतः चार वेळा भेटी देऊन येथील कामाचा आढावा घेऊन कामामध्ये कोणतीही कमतरता करू नये अशा सूचना केल्या आहेत. या रुग्णालयात वापरण्यात आलेले सर्व साहित्य हे आग प्रतिरोधक असून हे पुनः वापरात येणारे आहे. त्यामुळे या ठिकाणी साहित्याचा होणारा घसारा कमी येणार आहे.विशेष म्हणजे या रुग्णालायात रुग्णांसाठी योगाभ्यास, करमणुकीसाठी कॅरम, टीव्ही आदी सुविधांसह रुग्णांना कुटुंबियांशी संवाद साधण्यासाठी दहा टॅब ठेवून त्याद्वारे व्हिडीओ कॉल करून कुटुंबियांशी संवाद साधत आपल्या उपचारासोबतच अडचणीबाबत माहिती देता येणार आहे.या रुग्णालय परिसरात तब्बल ७५ सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात आले असून त्यांचे नियंत्रण करण्यासाठी कंट्रोल रूम बनविण्यात आले आहे. येथील रुग्णांना ऑक्सीजन पुरवठा कमी पडू नये यासाठी तब्बल तीन ऑक्सीजन टँक या ठिकाणी लावण्यात आले आहेत.तर रुग्णालयात दुर्घटना घडल्याच्या घटना लक्षात घेता काही शौचालय सुध्दा ऑक्सीजन युक्त केले आहेत. या रुग्णालयाची विशेषतः म्हणजे येथील रुग्णांसोबत काम करणाऱ्या डॉक्टर, नर्स यांचा थेट संपर्क येणार नाही यासाठी वेगळा नर्स वे बनविण्यात आला आहे.त्या ठिकाणी पीपीई किट्स न घालता वेगळ्या वातावरणात त्यांना राहता येणार असल्याने त्यांच्यावर कामाचा ताण राहणार नाही. येथील डॉक्टर्स, नर्स वॉर्डबॉय यांची सेवा पुरविण्याची जबाबदारी खाजगी यंत्रणेवर सोपविण्यात आल्याने या ठिकाणी रुग्णसेवेवर कोणतेही परिणाम होणार नाही. याकडे लक्ष राहणार आहे. त्यासाठी चार शासकीय वैद्यकिय अधिकारी या सर्व कामावर लक्ष ठेवणार आहेत.

पालकमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रयत्नातून साकारणाऱ्या या रुग्णालयाचे काम मागील ४० दिवसात पूर्णत्वास जात असताना या कामावर शिवसेना ग्रामीण जिल्हा प्रमुख हातमाग महामंडळाचे अध्यक्ष प्रकाश पाटील व आमदार शांताराम मोरे हे प्रत्यक्ष लक्ष ठेवून आहेत.ग्रामीण भागातील कोरोना रुग्णांची झालेली हेळसांड व त्यांना शहरातील रुग्णालयातून मिळत नसलेले उपचार या रुग्णालयाच्या माध्यमातून वेगळी यंत्रणा उभी करून मिळणार आहे. त्यामुळे येत्या काळात ग्रामीण भागातील जनतेला चांगल्या उच्च दर्जाच्या आरोग्य सेवा मिळाव्यात याकडे आमचे लक्ष असल्याची भावना शिवसेना ग्रामीण जिल्हा प्रमुख तथा हातमाग महामंडळाचे अध्यक्ष प्रकाश पाटील यांनी बोलून दाखविली आहे. या रुग्णालय उभारणीच्या कामाकडे मी आव्हान म्हणून पाहत असून स्वतः डॉक्टर असल्याचा फायदा मला करून घेता आला आहे.या कामात कोणत्याही त्रुटी राहणार नाहीत यासाठी वेळोवेळी तज्ञ डॉक्टर मंडळींशी बोलून तसे बदल करून घेतल्याने हे रुग्णालय उभारण्याची संधी मिळणे मी माझे भाग्य समजत असल्याची भावना उपविभागीय अधिकारी डॉ.मोहन नळदकर यांनी व्यक्त केली आहे.

## तालुक्याच्या ठिकाणी ५० ऑक्सिज नेट बेड उभारावेत

# होम आयसोल्यूशन झालेल्या व्यक्ती घराबाहेर फिरल्यास कारवाई -जिल्हाधिकारी जी.श्रीकांत

**लातूर/करकरे अंबादास**



लातूर जिल्हयात कोरोना (कोव्हिड-१९)चा प्रार्दुभाव वाढतच आहे. हा प्रार्दुभाव रोखण्यासाठी जिल्हयातील सर्व संबंधित अधिकाऱ्यांनी परस्परात योग्य समनव्य ठेवून जिल्हयातून कोरोना हद्दपार करण्यासाठी प्रयत्न करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी जी.श्रीकांत यांनी दिले. जिल्हाधिकारी कार्यालयातील नवीन सभागृहात आयोजित कोरोना (कोव्हिड-१९) प्रार्दूभाव आढावा बैठकीत दिले. या बैठकीस मुख्यकार्यकारी अधिकारी अभिनव गोयल, महानागरपालिका आयुक्त देवीदास टेंकाळे, अतिरिक्त जिल्हाधिकारी अरविंद लांडगे, अतिरिक्त मुख्यकार्यकारी अधिकारी संतोश जोशी, उपविभागीय पोलीस अधिकारी सचिन सांगळे, जिल्हा शल्यचिकित्स डॉ. संजय ढगे,जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.गंगाधर परगे उपस्थित होते. या बैठीस मार्गदर्शन करताना जिल्हाधिकारी जी.श्रीकांत म्हणाले की, जिल्हयात कोरोनाचा प्रार्दूभाव वाढतच आहे यास घाबरुन न जाता सर्व संबंधित अधिकारी वर्गाने पूर्ण ताकतीने कोरोनावर मात करण्यासाठी प्रयत्न करावेत.तसेच जिल्हयात होम आयसोल्यूसेशन जास्तीत जास्त करण्यासाठी प्रयत्न करावेत असे सूचित केले.महारनगपालिकेतील तीन ठिकाणी तीन कोव्हिड केअर सेंटर आहेत त्या ठिकाणास मनपा आयुक्त यांनी प्रत्येक दिवशी भेट दयावी. तसेच जिल्हयातील प्रत्येक तालुक्यातील कोव्हिड सेंटरला संबंधित तहसिलदार, बिडीओ, बिओ यांनी भेटी देऊन कोरोना प्रार्दूभाव टाळण्यासाठी योग्य ते प्रयत्न करावे. जिल्हयात बऱ्याच ठिकाणी होम आयसोल्यूशन झालेली व्यक्ती घराबाहेर फिरत असल्याचे निर्देशनास आल्यास त्यांच्यावर कारवाई करण्याच्या सूचना यावेळी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. तसेच उपविभागीय अधिकारी यांनी त्यांच्या विभागात प्रत्येक दिवशी बैठक घ्यावी व प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी किमान ५० ऑक्सीजनेट बेड उभारावेत अशा सूचना जिल्हाधिकारी जी. श्रीकांत यांनी दिल्या.

जिल्हयात रॅपिड व अँन्टीजन टेस्टची कमतरता नाही. आयसीएमआरच्या मार्गदर्शक सूचने प्रमाणे टेस्ट करणे नितांत गरजेचे आहे. अनावश्यक टेस्ट करु नयेत. लक्षणे असतील तरच टेस्ट करण्याच्या सूचना यावेळी देण्यात आल्या. जिल्हयात उभारण्यात आलेल्या कोव्हिड केअर सेंटर मध्ये स्वच्छता ठेवावी. कोव्हिड केअर सेंटर बाबत तक्रार आल्यास संबंधितावर कारवाई करण्यात येईल असे जिल्हाधिकारी जी. श्रीकांत यांनी सूचित केले. प्रत्येक तालुक्यातील कोरोना डाटा इंट्रीचे काम पेंडींग असल्याचे निर्देशनास आले आहे. या कामास प्राधान्य देऊन उपलब्ध मनुष्यबळावर डाटा इंट्रीचे काम ताबडतोबीने पूर्ण करण्याच्या सूचना संबंधितांना दिल्या. प्रारंभी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संजय ढगे यांनी जिल्हास्तरीय कोरोना आढावा बैठकीचे प्रस्ताविक केले. या बैठकीस उपविभागीय अधिकारी सुनिल यादव, अविनाश कांबळे, निवासी उपजिल्हाधिकारी विजय कुमार ढगे, सर्व तालुक्याचे तहसिलदार, गटविकास अधिकारी, गटशिक्षण अधिकारी, जिल्हा आरोग्य अधिकारी,संबंधित अधिकारी उपस्थित होते.

## थोडक्यात वृत्तांत

### सुधारित वेळेमध्ये मद्य विक्री करण्यास परवानगी!

लातूर : लातूर जिल्हयातील अबकारी अनुज्ञप्ती धारकांना त्यांच्या अनुज्ञप्तीमधून सकाळी ९:०० ते सायंकाळी ७:०० वाजेपर्यत मद्यविक्री करण्यास देण्यात आलेली आहे. तथापी लॉकडाऊन कालावधीत दिलेल्या मार्गदर्शक सूचनेनुसार व प्राप्त निर्देशानुसार व या कार्यालयास प्राप्त निवेदनाच्या अनुषंगाने आता संबंधित अनुज्ञप्तीधारकांनी सकाळी ९:०० ते रात्री ९:०० या सुधारित वेळेमध्ये त्यांच्या अनुज्ञप्तीमधून मद्य विक्री करण्यास परवानगी देण्यात येत असल्याचे जिल्हाधिकारी जी.श्रीकांत यांनी आदेश जारी केले आहेत. तथापी जिल्हयातील सर्व अबकारी अनुज्ञप्तीधारकांनी सदरची मद्य विक्री ही निर्देशानुसार, अटी व शर्तीच्या अधिन राहूनच करावयाची आहे.या कडे सर्व अबकारी अनुप्तीधारकांचे लक्ष वेधण्यात येत आहे असे ही आदेशात नमुद केले आहे.

### व्यावसायिकाची विष पिऊन आत्महत्या



भिवंडीः तालुक्यातील दिवे (केवणी) येथील ट्रान्सपोर्ट व्यावसायिक तरुणाने राहत्या घरात विषारी औषध प्राशन करून आत्महत्या केल्याची घटना बुधवारी पहाटे घडली आहे. त्याने प्रेम भंगातून आत्महत्या केली असावी? असा अंदाज पोलिस सूत्रांकडून व्यक्त केला जात असून त्या दृष्टीने तपास सुरू असल्याची माहिती तालुका पोलिस ठाण्याचे पोलिस उपनिरीक्षक वैभव देशपांडे यांनी दिली आहे. राकेश भानुदास पाटील (२८ रा.दिवे) असे आत्महत्या केलेल्या तरुणाचे नांव आहे. तो गोदामामध्ये टेंपो ट्रान्सपोर्टचा व्यवसाय करून त्याच्या आई सोबत राहत होता. मोठ्या बहिणीची कालवार येथे तिच्या सासरी प्रसूती झाल्याने आई दोन दिवसांपासून तिच्याकडे गेली होती. तो एकटाच घरी होता.त्यामुळे त्याला जेवण शेजाऱ्यांकडून दिले जात होते. आज सकाळी शेजारी चहा, नाश्ता घेऊन गेले असता त्याने दरवाजा उघडला नाही. त्यावेळी खिडकीतून डोकावून पाहिले असता राकेश याच्या तोंडाला विषारी औषधाचा वास येऊन तो जमिनीवर निपचित पडल्याचे दिसून आले. त्यामुळे शेजाऱ्यांनी तात्काळ दरवाजा तोडून त्याला बेशुद्धावस्थेत उपचारासाठी स्व.इंदिरा गांधी उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले.मात्र उपचार सुरू असताना त्याचे दुर्दैवी निधन झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. या आत्महत्येची नोंद तालुका पोलिस ठाण्यात केली असून पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक वैभव देशपांडे करीत आहेत.

### युवतीची तीन लाखांची फसवणूक

भिवंडी : भिवंडी शहरातील एक युवतीस कौन बनेगा करोडपती या मध्ये लक्की ड्रॉ द्वारे बक्षीस लागल्याचे मोबाईलद्वारे सांगून तिच्या कडून २ लाख ९२ हजार रुपये गुगल पे द्वारा उकळल्याचा प्रकार समोर आला आहे. नदीनाका बारक्या कंपाऊंड अमिना बाग या परिसरात राहणाऱ्या शेख आफरीन बानो मोहम्मद इस्माईल या युवतीच्या मोबाईल वेगवेगळ्या तीन मोबाईल वरून फोन करून आपणास कौन बानेगा करोडपती ची २५ लाख रुपयांची लॉटरी लागली असून त्यासाठी तुमचा लक्की नंबर ७०३ असल्याचे सांगून विश्वास संपादन करून त्यासाठी ते पैसे मिळविण्यासाठी २ लाख ९२ हजार रुपये एस बी आय बँक खाते क्रमांक २०३३७६४९५६७ या वर गुगल पे द्वारा भरण्यासाठी तगादा लावला असता युवतीने सदरचे पैसे भरल्या नंतर बक्षीस रक्कम न मिळाल्याने युवतीने निजामपूर पोलीस ठाण्यात अज्ञात मोबाईल क्रमांक धारकां विरोधात तक्रार दिली असून पोलिसांनी त्या आधारे भादंसं कलम ४२० प्रमाणे गुन्हा नोंद केला आहे.

क्राईम Reporter 9890718873
औरंगाबाद, कोल्हापूर, सातारा, परभणी, जळगाव, सांगलीतील बातम्या व गुन्हे कथा या क्रमांकावर पाठवा

# टेम्पोतील अमेझ्झॉनचे साहित्य चोरणाऱ्या दोघांना अटक



**भिवंडी/अभिजित हिरे**

भिवंडी तालुक्यातील ठाकुरपाडा या ठिकाणी अमेझॉन मधील विविध प्रकारचे ३८२ बॉक्स साहित्य घेऊन जाणार टेम्पो उभा करून ठेवला असता त्यामधील १ लाख ७७ हजार ८६२ रुपयांचे साहित्य असलेले १३ बॉक्स टेम्पोचे सील तोडून चोरी प्रकरणी कोनगाव पोलिसांनी दोघा आरोपींना बेड्या ठोकल्या असून त्यांच्या कडून चोरीस गेलेल्या मुद्देमाला पैकी १ लाख ४ हजार ९०४ रुपयांचे साहित्य व गुन्हयात वापरलेली ४ लाख रुपयांची एक मारूती सुझूकी कंपनीची इर्टिका कार असा एकूण ५ लाख ४ हजार ९०४ किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात यश मिळविले आहे. गंगाराम पाडा, कुकसेगांव येथील गोदमातून विविध कंपनीचे साहित्य असलेले ३८२ बॉक्स ज्यामध्ये बॉडी लोशन, टॉय मिक्सर खेळणे, डिझायनर लेडीज सारीज्, जॉकी मेन्स् कॉटन टिशर्ट, हेडसेटस्, डिशवॉशर, वायरलेस गेमिंग हेन्डसेट असा माल भरलेला टेम्पो चालक राहुलकुमार लखन माहतो याने खाली करण्यासाठी अमेझॉन बॉम्बे गोडावून प्रथमेश कॉम्प्लेक्स, एफ.एस.सी. गोडावूनचे मागे, ठाकुरपाडा याठिकाणी २ सप्टेंबर रोजी सायंकाळी उभा करून ठेवला असता रात्री एक वाजताच्या सुमारास आलेल्या अज्ञात चोरट्यानी टेम्पो च्या मागील बाजूस असलेले सील तोडून त्यामधील १३ बॉक्स ची चोरी केल्या बाबत चालकांने दिलेल्या तक्रारी वरून कोनगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्हयात पोलीस उपायुक्त राजकुमार शिदे,सहाय्यक पोलीस आयुक्त नितिन कौसडीकर, कोनगाव पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रमेश काटकर यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि नरेंद्र पवार, सपोनि संतोष बोराटे, पोना मासरे, पोशि चोरगे, व पोशि पाटील, पो. शी. ढवळे यांनी गुन्हयाचा कसोशीने तपास करून अजय गणेश पाटील वय २१ वर्षे, रा.सोनाळे गांव, ता. भिवंडी, स्वप्निल मधुकर पाटील वय २१ वर्षे, रा. पुंडास,पो महापोली, ता. भिवंडी यांचा शोध घेवून सदर गुन्हयात त्यांना बेड्या ठोकण्यात यश मिळविले आहे.

# पोलीस नाईक चौंगुले धावत्या गॅस टँकरवर चढून टँकर थांबविला



सोलापू : सोलापूर पुणे राष्ट्रीय महामार्गावरील सावळेश्वर टोल नाक्याजवळ बेशुद्धावस्थेतील गॅस टँकर चालकाचे नियंत्रण सुटले होते. प्रसंगावधान राखून राष्ट्रीय महामार्ग पोलीस मदत केंद्रातील पोलीस नाईक संजय चौगुले यांनी सतर्कतेने मोठ्या शिफातीने चालत्या गॅस टँकरवर चढून दरवाजा उघडून ब्रेक मारून धावता टँकर थांबविला. सोलापूर पुणे राष्ट्रीय महामार्गावरील पाकणी येथील महामार्ग पोलीस मदत केंद्राजवळ पोलीस नाईक संजय चौगुले (बक्कल नं २२५) हे सेवा बजावीत होते. यावेळी पुण्याहून सोलापूरच्या दिशेने येणाऱ्या वेडावाकडा येत असल्याचे पो.ना.चौगुले यांच्या निदर्शनास आले त्यानंतर चौगुले यांनी त्या टँकर चालकाला हात दाखवित थांबविण्याचा इशारा केला, परंतु ट्रक चालक हा सीटवर पडलेला दिसला. त्यानंतर चौगुले यांनी मोठ्या सिंघम स्टाईलने चालत्या गॅस टँकरवर चढून चालकाच्या साईडचा दरवाजा उघडून ब्रेक मारून गॅस टँकर थांबविला. चौगुले यांनी केलेल्या धाडसी कार्यामुळे अपघाती दुर्घटना टळली.

# नालासोपाऱ्यात इमारत दुर्घटनेप्रकरणी अखेर विकासकावर गुन्हा दाखल

**नालासोपारा/प्रतिनिधी**

पूर्वेकडील संकेश्वर नगर मधील असलेली साफल्य नावाची चार मजली इमारत ११ वर्षातच पत्याप्रमाणे मंगळवारी मध्यरात्री कोसळली होती. ही इमारत बांधणाऱ्या विकासकावर महापालिकेने तक्रार दिल्यावर तुळींज पोलिसांनी अखेर बुधवारी गुन्हा दाखल केला आहे.

पूर्वेकडील मौजे आचोळे येथील सर्व्हे नंबर १२८, १५७, १५८ आणि १५९ मधील प्लॉट नंबर २२ मध्ये साफल्य सांगली बँक एम्प्लॉईज सोसायटी नावाची इमारत होती. ही जुनी इमारत रहिवाश्यांकडून पुनर्विकासासाठी मेसर्स श्री साई गणेश डेव्हलपर्सचे विकास अभय पुरूषोत्तम नाईक यांनी सन २००७ साली घेतली. सिडकोकडून २४ जानेवारी २००७ साली ग्राऊंड + तीन मजली (अ) २० सदनिका बांधण्याचे ३९९.८८ स्केअर मीटर बांधकाम करण्याची परवानगी मिळाली होती. विकासकाने स्वतःच्या फायद्यासाठी सिडकोने दिलेल्या बांधकाम परवानगीपेक्षा व इंजिनिअर आणि आर्किटेक्ट यांनी दिलेल्या प्लाननुसार बांधकाम न करता ग्राऊंड + चार मजल्याचे (अ) वाढीव बांधकाम करून त्यात १० दुकाने व २३ सदनिका अनधिकृत निकृष्ट दर्जाचे बांधकाम केले. सदर बिल्डिंगचे स्ट्रक्चरमध्ये बदल करून ग्राहकांच्या जीविताशी व मालमत्तेचे नुकसान होईल अशी जाणीव असताना अनधिकृत निकृष्ट बांधकाम केल्याने मंगळवारी रात्री इमारत कोसळली.

वसई विरार महानगरपालिकेच्या डी प्रभागाचे अतिरिक्त प्रभारी कारभार असणारे सहायक आयुक्त प्रमोद सुरेश चव्हाण (४३) यांनी बुधवारी तुळींज पोलीस ठाण्यात विकासकाविरुद्ध तक्रार दिली. पोलिसांनी आरोपी विकासक अभय नाईक याच्याविरोधात फसवणूक सह महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ५२, ५३, ५४ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

इमारत कोसळल्याप्रकरणी महानगरपालिकेने कागद पत्रांसह तक्रार दिल्यावर विकासकावर गुन्हा दाखल केला आहे. तो फरार झाला असून त्याला लवकरात लवकर पकडण्यात येईल. तसेच यात कोणी अजून दोषी असतील त्यांच्यावरही कारवाई करणार, असे डी.एस.पाटील वरिष्ठ पोलीस निरीक्षक, तुळींज पोलीस ठाणे यांनी सांगितले.

# एमसीक्यू परीक्षा पद्धतीत विद्यार्थ्यांना क्वेशन बँक पुरवण्याची विद्यार्थी भारती संघटनेची मागणी पूर्ण करण्याचे उदय सामंत यांचे आश्वासन



**भिवंडी/प्रतिनिधी**

महाविद्यालयांच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा संदर्भात मागील कित्येक दिवस वाद सुरू असतानाच सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णय नंतर परीक्षा घेतल्या जात असून विद्यापीठांनी एमसीक्यु स्वरूपात परीक्षा घेण्याचा निर्णय घेतला असताना परीक्षा घेताना विद्यार्थ्यांना क्वेशन बँक देण्याची मागणी विद्यार्थी भारती संघटनेने राज्याचे उच्च शिक्षण मंत्री उदय सामंत यांना निवेदन देऊन केली आहे. विद्यार्थी भारती संघटनेच्या शिष्टमंडळाने नुकताच मुंबई विद्यापीठाचे कुलसचिव विनोद पाटील यांची भेट घेऊन या बाबत मागणी केली होती, परंतु कुलसचिवांनी सदर निर्णय घेण्याबाबत असमर्थता व्यक्त केल्याने यांच्या या निर्णयाचा संघटनेने तीव्र शब्दात निषेध करीत या आधी एमसीक्यू पद्धतीने कधीही परीक्षा न झाल्याने विद्यार्थ्यांना परीक्षा देणे अवघड जाईल तसेच विद्यार्थ्या कडे स्टडी मटेरियल नाही त्यामुळे अनेक विद्यार्थी या प्रक्रियेत शिक्षण बाह्य होऊ शकतात तरी विद्यार्थ्यांच्या हिताचा निर्णय शासनाने घ्यावा अशी मागणी विद्यार्थी भारती च्या राष्ट्रीय अध्यक्षा मंजिरी धुरी यांनी राज्याचे उच्च शिक्षण मंत्री उदय सामंत यांच्या कडे केली आहे. विद्यार्थी भारती संघटनेच्या शिष्टमंडळाने शिक्षण मंत्री उदय सामंत यांच्या सोबत केलेल्या चर्चे दरम्यान क्वेशन बँक पुरविण्याची मागणी केली असता विद्यार्थ्यांना क्वेशन बँक पुरविण्याची मागणी पूर्ण करण्याचे आश्वासन दिल्याची माहिती विद्यार्थी भारती संघटनेच्या महाराष्ट्र अध्यक्षा पूजा मुधाणे यांनी दिली आहे.

# शामराव पेजे कोकण इतर मागासवर्ग आर्थिक विकास महामंडळामार्फत लघुउद्योग व व्यवसायाकरिता कर्ज उपलब्ध

पालघर/प्रतिनिधी

शामराव पेजे कोकण इतर मागासवर्ग आर्थिक विकास महामंडळामार्फत लघुउद्योग व व्यवसायाकरिता कर्ज पुरवठा केला जातो. त्या अनुषंगाने सन २०२०-२१ या वित्तीय वर्षाकरिता विविध योजनांचे पालघर जिल्हा कार्यालयाकरिता उद्दिष्ट प्राप्त झाले आहेत.

यामध्ये २०% बीज भांडवल योजना, रु. १.०० लाखापर्यंत थेट कर्ज योजना तसेच ऑनलाईन योजनेमध्ये वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना, गट कर्ज व्याज परतावा योजना या योजनांचा समावेश आहे. रु. १.०० लाखापर्यंत थेट कर्ज योजनेकरिता अर्जदारांचा सिबिल स्कोअर किमान ५०० इतका असणे बंधनकारक आहे. ऑनलाईन योजनेसाठी महामंडळाच्या www.msobcfdc.org या वेबसाईटवर नोंदणी करुन अर्ज भरता येईल यांची नोंद घ्यावी. सन २०२०-२१ या आर्थिक वर्षामध्ये योजनानिहाय आर्थिक व भौतिक उद्दिष्ट खालीलप्रमाणे देण्यात आलेले आहे.

१) २०% बीज भांडवल भौतिक ५० आर्थिक (रु. लाखात) ३७.५० २) वैयक्तिक कर्ज व्याज परतावा (रु. १०.०० लाखापर्यंत) भौतिक १४० आर्थिक (रु. लाखात) १५९.६० ३) गट कर्ज व्याज परतावा (रु. १०.०० लाख ते रु. ५०.०० लाखापर्यंत) भौतिक २५ आर्थिक (रु. लाखात) १४३.७५ ४) थेट कर्ज योजना (रु. १.०० लाखापर्यंत) भौतिक १०० आर्थिक (रु. लाखात) १००.०० अधिक माहितीसाठी शामराव पेजे कोकण इतर मागासवर्ग आर्थिक विकास महामंडळ मर्या., खोली क्र. १०२, मॉक्स गोकुळ बिल्डिंग, सर्व्हे. नं. ७८, प्लॉट नं. ७, औदुबंर अपार्टमेंट समोर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर, पालघर (पूर्व) या कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन आर. एम. मेश्राम, जिल्हा व्यवस्थापक यांनी केले आहे.

# भिवंडीत कॉलेज युवकाची धारदार शस्त्राने वार करून निर्घृण हत्या

**भिवंडी/प्रतिनिधी**



तालुक्यातील पडघा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मोहंडूल ग्रामपंचायत अंतर्गत असलेल्या कंरजोटी गावातील एका २० वर्षीय कॉलेज युवकाला अज्ञात मारेकऱ्यांनी फोन करून गावालगतच्या माळरानावर बोलावून हात व डोक्यावर तीक्ष्ण हत्याराने वार करून शुक्रवारी सायंकाळी निर्घृण हत्या करण्यात आल्याची घटना घडली आहे.या घटनेने पडघा परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. आकाश नारायण शेलार (२०)असे निर्घृण हत्या झालेल्या कॉलेज तरुणाचे नाव आहे.तो खडवली येथील महाविद्यालयात १४ वीच्या वर्गात कला शाखेमध्ये शिक्षण घेत होता.मात्र गेल्या पाच महिन्यांपासून कोरोनाच्या पार्श्वभूमीवर लॉक डाऊन असल्यामुळे कॉलेज बंद आहे. त्यामुळे तो वासींद येथील जिंदाल कंपनीमधे काम करीत होता. काल सायंकाळी तो चार वाजेच्या सुमारास घरी असताना त्याला अज्ञात व्यक्तीने मोबाईलवरून फोन करून गावालगतच्या शेपटीच्या माळरानावर बोलावून घेतले. त्यावेळी तो मोबाईलवर बोलत बोलत त्या ठिकाणी गेला असता मारेकऱ्यांनी त्याचा गळा आवळून हात व डोक्यावर तीक्ष्ण हत्याराने वार करून त्याची निर्घृण हत्या केली त्यानंतर मारेकऱ्यांनी त्याचा मृतदेह गावाजवळील एका शेतात फेकून पळ काढला आहे. या घटनेची माहिती वडील नारायण शेलार यांना मिळताच त्यांनी पडघा पोलीस ठाण्यात या हत्येची माहिती देताच एपीआय पी.जे.चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस पथक घटनास्थळी दाखल होवून पंचनामा केला व मृतदेह शवविच्छेदनासाठी स्व. इंदिरा गांधी उपजिल्हा रुग्णालयात पाठवण्यात आला आहे. या हत्येप्रकरणी अज्ञात मारेकऱ्यांविरोधात पडघा पोलिसांनी खुनाचा गुन्हा दाखल केला आहे. हत्येचे कारण मात्र अजून समजू शकले नसून हल्लेखोरांच्या शोधासाठी वरिष्ठ पोलिस निरीक्षक सुरेश मनोरे यांच्या मार्गदर्शनाखाली वेगवेगळी पोलिस पथके तयार करून खुन्यांचा शोध सुरू केला आहे.

# कार मोटारसायकलच्या अपघातात मोटार सायकल जळुन खाक



**देवणी/प्रतिनिधी**

तालुक्यातील वलांडी उदगीर रोडवर कार व मोटारसायकलच्या भीषण अपघातात दुचाकी जागेवरच जळुन खाक झाली.सुदैवाने जिवित हानी झाली नसलि तरी मोटारसायकलस्वार किरकोळ जखमी झाले आहेत. वलांडीहून जागृती कारखाना मार्गे उदगीरकडे निघालेल्या मोटारसायकल क्रमांक एम एच २४ वाय २९८१ ला समोरुन येणाऱ्या कार क्रमांक केए ५६-४८५३ ने जोराची धडक दिली.यात मोटारसायकलने पेट घेतला.अन मोटारसायकल जळुन खाक झाल्याची घटना बुधवार दिनांक ९ सप्टेंबर रोजी दुपारच्या सुमारास घडली. या अपघातात मोटारसायकल स्वार मकबुल शरफोद्दीन सय्यद व सुनिल व्यकंटराव गुणाले दोघेही रा.जवळगा हे किरकोळ जखमी झाले आहेत. घटनास्थळावर बघ्यची गर्दी झाली होती. घटना घडताच कारचालकाने चावी जखमीच्या हाती देवुन नाव व पत्ता न सांगता पोबारा केला. सदर घटनेची देवणी पोलिसात अद्यापही गुन्हा नोंद झाला नसल्याचे देवणी पोलीसांकडुण सांगण्यात आले.

## थोडक्यात वृत्तांत



### भिवंडीत पेपर गोदामांना भीषण आग

भिवंडी : तालुक्याच्या गोदाम पट्यातील दापोडा ग्रामपंचायत हद्दीतील इंडियन कार्पोरेशन या गोदाम संकुलातील पेपर गोदामांना शनिवारी दुपारी २ वाजेच्या सुमारास भीषण आग लागण्याची घटना घडली आहे. इंडियन कॉर्पोरेशन गोदाम संकुलातील इमारत क्र.२२९ मधील गोदाम क्रमांक ७ येथे सर्वप्रथम आग लागली. त्यानंतर पाहता पाहता या आगीने रौद्ररूप धारण करून आग सर्वत्र पसरल्याने या आगीत तब्बल ५ गोदामांमध्ये साठवून ठेवलेले पेपर ,प्लास्टिक साहित्य ,रंगीत कागदी पॅकिंग यंत्र व कच्चा माल तसेच लगतच्या गोदामातील फरसाण बनविण्याच्या कारखान्यात देखील ही आग पसरून येथील सर्व साहित्य जाळून खाक झाले आहे.या घटनेची माहिती भिवंडी अग्निशमन दलास मिळताच दोन फायर गाड्या घटनास्थळी दाखल होत त्यांनी खाजगी टँकरच्या मदतीने पाणी उपलब्ध करून या आगीवर दोन तासांच्या अथक प्रयत्नांनी नियंत्रण मिळवले आहे. मात्र आग अजूनही धुमसत असून अग्निशमन दलाकडून कुलिंगचे काम सायंकाळी उशिरापर्यंत सुरू होते. गोदामांना लागलेली आग एवढी भयानक होती की या सर्व गोदामांचे पत्र्याचे छत लोखंडी अँगलसह जमिनीवर कोसळले आहेत. सुदैवाने या आगीच्या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी कोट्यवधी रुपयांच्या मालमत्तेचे नुकसान झाले आहे.

### खावटी अनुदान योजनेच्या लाभासाठी अर्ज करावे

पालघर : कोरोना विषाणूच्या प्रार्दुभावामुळे राज्यात उद्भवलेल्या अर्थिक संकटाच्या काळात अनुसूचित जमातीच्या कुटुंबांना सहाय्य करण्यासाठी खावटी अनुदान योजनेचे पुर्नज्जीवन राज्य शासनाने आदिवासी विकास विभागाच्या दिनांक ०९ सप्टेंबर २०२० च्या शासन निर्णयान्वये केले आहे. खावटी अनुदान योजनेअंतर्गत अनुसूचित जमातीच्या कुटुंबांना लाभ घेण्यासाठी लाभार्थ्यांनी करावयाचे अर्ज, पोचपावती, नोंदवह्या इत्यादी बाबींचे नमुने तयार करण्याचे काम शासन स्तरावर चालू आहे. लाभार्थी यांनी विहित पद्धतीचा अवलंब करून अर्ज करावे. तथापि या कार्यालयाच्या असे निदर्शनास आले आहे की, काही संघटना/व्यक्तिकडुन पैसे घेवून अर्जाचे वितरण लाभार्थ्यांना करण्यात येत आहे. सदर बाब बेकायदेशिर असल्याने अशा तक्रारीच्या अनुषंगाने गुन्हे दाखल करण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे. अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांनी अर्ज प्राप्त करण्यासाठी किंवा इतर कोणत्याही कारणासाठी उपरोक्त कोणत्याही प्रकारच्या खाजगी अमिषाला अथवा गैरप्रकाराला बळी न पडता खावटी अनुदान योजनेबाबत अधिकची माहिती प्राप्त करण्यासाठी महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ जव्हार आणि प्रकल्प कार्यालय, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प डहाणू जि.पालघर येथे संपर्क करण्याचे आवाहन डहाणू प्रकल्पाच्या प्रकल्प अधिकारी आशिमा मित्तल यांनी अनुसूचित जमातीच्या बांधवांना केले आहे.

### वैतरणा नदीच्या दोन्ही पुला खालून नौकानयनावर बंदी

पालघर : रेल्वे ब्रिज क्र. ९२ व ९३ च्या कार्यक्षेत्रामध्ये व त्यांच्या पोहोच मार्गामधील रेती उत्खन्न व नौकानयन मार्ग वाहतूकीसाठी बंद करणे आवश्यक आहे. ज्याअर्थी उपोद्धातातील अनुक्रमांक २ वर अंतर्भूत असलेल्या पत्रान्व्ये मुख्य ब्रिज अभियंता यांनी पश्चिम रेल्वेवरील सदर ब्रिज बाबतचे महत्व व रेल्वे ब्रिज बाबतचा संभाव्य धोका उद्भवल्यास होणारे परिणाम याबाबत कळविले आहे. ज्याअर्थी महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २० अन्वये सर्व सार्वजनिक रस्ते, गल्ल्या आणि मार्ग, पुल, खदंक, धरणे आणि त्यांच्या वरील किंवा त्यांच्या बाजूंची कुंपणे आणि पूर्ण भरतीच्या पाण्याच्या खुणेच्या खालील समुद्राचा, बंदराचा व खाडयांचा आणि नदया, ओहोळ, नाले, सरोवर व तळी आणि सर्व कालवे व पाण्याचे पाट आणि साचलेले सर्व पाणी व वाहते पाणी इत्यादी वर राज्य शासनाचा मालकी हक्क आहे. रेल्वे ब्रिज क्र.९२ च्या कार्यक्षेत्रातील रोडचा वापर रेती वाहतूक ट्रकसाठी प्रतिबंधित केला आहे. पोलीस अधीक्षक पालघर यांना वैतरणा नदीवरील रेल्वे ब्रिज व इतर ब्रिजच्या ६०० मीटर कार्यक्षेत्रात २४ X ७ पोलीस गस्त ठेवण्याच्या सुचना दिल्या आहेत. तसेच पुलाच्या दोन्ही बाजूस ६०० मीटर (२००० फुट) च्या क्षेत्रात रेती उत्खन्नास परवानगी देणेत आलेली नाही. डॉ. माणिक गुरसळ, जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, पालघर यांना फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम १४४ (१) (२) व (३) आणि राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ चे कलम ३० व ३४ अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून वैतरणा नदीवरील रेल्वेपुलाच्या (पुल क्र.९२ व ९३) दोन्ही बाजूस ६०० मीटर कार्यक्षेत्रात दि. ०३/११/२०२० रोजीचे २४.०० वाजेपर्यतच्या कालावधीत पोलीस, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, नौदल, मत्स्य व्यवसाय, वन, कोस्ट गार्ड, उत्पादन शुल्क इत्यादी शासकीय विभाग वगळून इतर सर्व व्यक्तींना वैतरणा नदीवरील रेल्वेपुलाच्या दोन्ही बाजूस ६०० मीटर अंतरात मनाई आदेश लागू करीत आहे.

# नालासोपाऱ्यातील प्रगती नगरमध्ये तरुणाची हत्या की अपघाती मृत्यू?

**नालासोपारा/प्रतिनिधी**

नालासोपारा पूर्वेकडील प्रगती नगरमध्ये राहणाऱ्या २८ वर्षीय तरुणाच्या मृत्यूनंतर संपूर्ण परिसरात खळबळ माजली आहे. त्याची हत्या झाली आहे की त्याचा अपघाती मृत्यू याचा तुळींज पोलीस शोध घेत आहे. पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदनसाठी पाठवला असून पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पण तरुणाच्या पत्नीने ही हत्या केल्याचा आरोप केला आहे. नालासोपारा पूर्वेकडील प्रगती नगरमधील गुरुकृपा बिल्डिंगमध्ये ब्रिजेश हरीशंकर जैस्वाल (२८) हा पत्नी व दोन मुलांसह राहत होता. बुधवारी त्याच्या मुलीचा रात्री वाढदिवस होता. यानंतर ही घटना घडली आहे. तो रात्री एक वाजण्याच्या सुमारास सी विंग मधील अशोक यादव यांच्या घरी दारूच्या नशेमध्ये गेला होता. अशोक यांचे मुख्य दार बंद असल्याने ते उघडण्यासाठी जबरदस्ती करू लागला. दरवाजा उघडला नाही म्हणून काचेच्या खिडकीवर ठोशा मारल्याने सदर खिडकीची काच तुटून ब्रिजेश याच्या उजव्या हाताच्या कोपराच्या आतील बाजूला लागून त्यातून जास्त प्रमाणात रक्तस्त्राव होऊन त्याचा मृत्यू झाल्याचे पोलिसांनी सांगितले आहे. दरम्यान माझ्या पतीला अशोक यादव नेहमी चिडवायचा. त्यामुळे दोघांमध्ये अनेक वेळा वाद झाले होते. काल रात्री त्याच्यावर चाकूने हल्ला केला. कारण जो वार आहे त्या ठिकाणचे मासच नाही म्हणून असे वाटते की चाकूने वार केलेला आहे. माझ्या पतीची हत्या झालेली आहे, मयत ब्रिजेशची पत्नी पूजा जैस्वाल यांचे म्हणणे आहे.

**काचेमुळे जास्त प्रमाणात रक्तस्त्राव झाल्यामुळे त्याचा मृत्यू झाला आहे. आजूबाजूच्या लोकांनी सांगितले की खिडकीची काच त्याला लागली आहे. प्रथम अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. शवविच्छेदनसाठी मृतदेह पाठवला असून त्याचा रिपोर्ट आल्यावर कळेल की त्याचा मृत्यू कशामुळे झाला आहे.**

**- डी.एस. पाटील**
**(वरिष्ठ पोलीस निरीक्षक, तुळींज पोलीस ठाणे)**

# पालघर जिल्ह्यातील जनावरांना टॅगिंग व लसीकरण करून घेण्याचे आवाहन

**पालघर/प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाकडून पशुधनामधील संसर्गजन्य लाळ-खुरकूत या रोगावरील लसीकरण कार्यक्रमाबाबत जिल्हाधिकारी डॉ.माणिक गुरसाळ यांच्या अध्यक्षतेखाली दि.०३ सप्टेंबर २०२० रोजी सभा आयोजित करण्यात आली. सदर लसीकरण कार्यक्रम हा केंद्र पुरस्कृत असून राष्ट्रीय पशु रोग नियंत्रण कार्यक्रमाअंतर्गत जिल्ह्यामध्ये दिनांक ०१ सप्टेंबर २०२० पासून राबविण्यात येत आहे.

पालघर जिल्ह्यातील सर्व पशुपालकांनी दि. १ सप्टेंबर २०२० ते ३० सप्टेंबर २०२० पर्येत तालुकास्तरीय सहाय्यक आयुक्त, पशुसंवर्धन व पशुधन विकास अधिकारी, पंचायत समिती यांच्या अधिनस्त असलेल्या पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-१ व श्रेणी-२ यांच्या स्तरावर १००% अनुदानावर प्राप्त झालेल्या लाळ-खुरकत लसीचा आपल्या पशुधनासाठी पुरेपूर लाभ घ्यावा व आपल्या पशुधनाचे लाळ-खुरकत रोगापासून संरक्षण करावे व यासंदर्भात काही सूचना अथवा तक्रार असल्यास जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, पालघर अथवा जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, पालघर जिल्हा यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ.माणिक गुरसाळ यांनी केले आहे.

सर्व गाय वर्ग व म्हैस वर्ग यांना लाळ खुरकुत ह्या रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता अधिक असते. त्यामुळे दुधत्या जनावरांचा मृत्यू होऊन पशुपालकांना फार मोठे आर्थिक नुकसान सहन करावे लागते. सदर रोगामुळे शेतकऱ्यांना फार



मोठ्या आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागते. करिता पशुसंवर्धन विभाग पालघर यांच्या वतीने सदर लसीचे तालुकानिहाय वाटप करून प्रत्येक पशुवैद्यकीय संस्था प्रमुखांना त्यांच्या कार्यक्षेत्रातील पशुधनाच्या लसीकरणा बाबत आवश्यक असणाऱ्या मार्गदर्शक सूचना देखील पशुसंवर्धन विभागाकडून निर्गमित करण्यात आल्या आहेत. तसेच सदर लसीकरणाच्या वेळी प्रत्येक पशुवैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांच्या कडून सदर जनावरांना tagging करण्यात येणार असून सदर tag नंबर चा खात्याशी संबंधित असलेल्या सर्व तांत्रिक बाबींशी निगडीत इनाफ प्रणालीवर नोंद घेणे बंधनकारक असल्याने पशुपालकानी निसंकोच पणाने जनावरांना tagging व लसीकरण करून घ्यावे असे आवाहन जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त पालघर डॉ प्रशांत ध. कांबळे यांनी केले आहे. पशुपालकानी जास्तीत जास्त जनावरांना लसीकरण करून घ्यावे व जनावरांचे लाळ खुरकुत रोगापासून सरांक्षण करून सदर योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन या वेळी जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त पालघर डॉ.प्रशांत ध. कांबळे यांनी केले आहे.

पान १ वरून...

## त्याचे तिच्यावर मुळीच नव्हते प्रेम...

बघून अनेकजण तिच्या जवानी बघून मिटक्या मारत होते. तिचा पती संजिदा हा साधा भोळा तरूण होता. आपण भले आणि आपले काम भले असे तो वागत होता. घरची आणि कुटूंबाची जबाबदारी तो व्यवस्थीत पार पाडत होता. घरची परिस्थीती बेताची असली तरी तो बायको मुलांना काही कमी करत नव्हता. तो मेरठमध्ये सकाळी कामाला गेला की रात्री उशिराच घरी परतत होता. वयाच्या ४०शीत तो पोहचला असल्याने रात्रीच्या खेळात तो जरा कमी पडत होता. या उलट ३०शीतील हसीना ही त्या सुखासाठी रात्रभर तडफडत होती. नवऱ्याकडून तिला अलिकडे ते सुख पाहिजे तसे मिळत नव्हते. म्हणून ती बाहेर एखादे सावज शोधत होती. तिच्यावर लाईन मारणारे अनेकजण होते. त्यातच ती कापड दुकानात काम करणाऱ्या सौरभला चिकटली होती. ते दोघे ही भेटत होते. तो ही तिच्या जवानीला भुलला होता. ती चार मुलाची आई असली तरी तिची जवानी ही मदमस्त आणि भरगच्च अशी होती. तर सौरभ हा २२शीतील तरणाबांड तरूण असल्याने त्या कामात तो कमी पडत नव्हता. घरी नवरा नसताना आणि मुले शाळेला गेल्यावर ती त्याला बोलावून घेत होती.

बेडवर तो तिच्या शेजारी झोपली की त्याची ही आग भडकत होती. ती कपडे काढेपर्यंत ही त्याला दम निघत नव्हता. त्याचा घुसमळेपणा वाढत होता. तिचा गाऊन तो वर करून तिच्यावर स्वार होईपर्यत तिच्या अंगाशी झोबांझोबी करून दाबादाबीतच तो तिला खुश करत होता. प्रत्यक्ष खेळाला सुरूवात झाल्यावर काही विचारण्याची सोय नव्हती. तिची नागडी जवानी तो सोलून काढत असताना ती ही त्याला तशीच साथ देत होती. त्याच्याकडून आपल्या जवानीची आग शांत करून घेऊन ती ही शांत होत होती. तिच्या नवऱ्याची कसर तो भरून काढत असल्याने त्या कामासाठी तिला तोच पाहिजे होता. म्हणून ती त्याला नवरा कामावर गेल्यावर एक तर घरी बोलावून घेत होती. किंवा एखाद्या शेतात त्याला भेटायला जात होती. तेथे ही त्या दोघांचा रासलिला चालत होती. त्या दोघांचे चोरून भेटणे हे अनेकांच्या नजरेत आले होते.तिच्या जवानीचा रस तो चाखत होता. तिला ही पाहिजे तसे सुख देत होता. म्हणून ती ही त्याच्यावर खुश होती.नवऱ्यापेक्षा तिला तो तगडा आणि तरणाबांड सौरभ आवडत होता. त्याचे मोबाईलवरून ही संभाषण वाढले होते. त्या संभाषणात ते दोघे ही अश्लिल बोलत होते. एकदा तो दारूच्या नशेत असताना आपल्या मित्रासमोरच त्याने तिला कुोणती चड्डी घातली आहेस काय वारे खेळायला रिकामे ठेवले आहेस. असे खोचकपणे बोलला होता. ती ही हजरजबाबी होती. वारे खेळायला रिकामे ठेवले नाही. तर माझ्या राजाला हवा दयायला खिडकी उघडी ठेवली आहे असे बोलली होती. पुढे, त्या दोघांच्या विवाहबाहय संबंधाची चर्चा गावात होऊ लागली होती. तशी ही चर्चा तिचा नवरा संजीदा याच्याही कानावर आली होती. आपली बायको विवाहबाहय संबंधात अडकून भरकटत चालली आहे. हे समजाताच तो ही तिच्यावर चिडला होता.त्याने तिलासमजावून सांगत असले उदयोग करू नकोस. मुलांच्याकडे बघुन संसार कर असे सांगितले होते. पण ती काही त्याचे ऐकणाऱ्यातील नव्हती. उलट ती जास्तच करत होती. म्हणून त्याने तिला घराबाहेर पडायला ही बंदी घातली होती. परंतू त्या संबंधात तिला सैरभच पाहिजे असल्याने काही करून ती त्याला भेटायला जात होती. त्याच्याकडून शारीरिक सुख लुटत होती. सौरभला ही चार मुलांची आई पाहिजे तसे अंगावर घेत असल्याने तो ही तिच्या जवानीला आपला रस पुरवत होता.त्याचे हे विवाहबाहय संबंध हे जवळपास दीड ते दोन वर्ष चालू होते. त्याच दरम्यान तिच्या नवऱ्याने ही सौरभला जीवे मारण्याची आणि तिला न भेटण्याची धमकी दिली होती. त्यामुळे तो तिला भेटायचे टाळत होता. परंतू तिला तोच पाहिजे असल्याने भेटायला आला नाही की ब्लॅकमेल करू लागली होती. तु मला जर असेच सोडलेस तर मी तुझ्यावर बलात्काराची केस घालेन अशी तिने ही त्याला धमकी दिली होती.म्हणून तो ही आता वैतागलेला होता. त्यातून ती त्याला भेटून त्याच्याबरोबर भांडण काढत होती.माझ्याकडून पाहिजे तसे सुख भोगून आता मी तुला नको झाले काय असे ती त्याला विचारीत होती.एकीकडे नवरा तिला या संबंधापासून परावृत करीत होता. तर दुसरीकडे प्रियकर सौरभ तिला टाळत होता. त्यामुळे ती ही त्या दोघांच्यावर चिडत होती.त्यातल्या त्यात सौरभच्या ती हाधवूनच पाठीमागे लागली होती. सौरभ हा २२ वर्षाचा तरूण असल्याने आणि तो बाहेरच्या विवाहित बाईच्या नादाला लागला असल्याचे समजल्याने त्याच्या घरचे लोक ही त्याचे लग्न लावून देण्याच्या विचारात होते. त्याच्या लफडयाला त्याचे घरचे लोक ही वैतागलेले होते. आपल्या मुलाने वाट चुकली आहे. विवाहित चार मुलाच्या बाईच्या नादाला लाकून जीवनाचे वाटोळे करून घेतले आहे म्हणून ते ही त्याला तिचा नाद सोड म्हणून सांगत होते. परंतु या सगळ्या भानगडीत हसीना त्याला आपल्या पासून दुर जावू देत नव्हती. आणि त्याला दुसऱ्या मुलीबरोबर लग्न ही करू देत नव्हती. मी तुझ्यासाठी आहे ना. तुला माझ्यापासून पाहिजे ते सुख भेटते ना. मग तु मला सोडून दुसऱ्या मुलीबरोबर लग्न का करतोस असा तगादा ती त्याच्या मागे लावीत होती. त्याला ही आता काय करावे काय नको असे झाले होते.अलिकडे तो कापड दुकानात कामाला ही जाईनासा झाला होता. हसीना त्याला आपल्या पदराला बांधून ठेवू इच्छित होती. तु जर मी असताना दुसऱ्या मुलीबरोबर लग्न केलास तर मी तुझ्यावर बलात्काराची केस करीन किंवा तुझ्या नावाने आत्महत्या तरी करेन अशी धमकी ती त्याला वारंवार देत होती. तिच्या या धमकीला तो घाबरत होता. पण आता त्याच्याकडे आता दुसरा कोणताही मार्ग नव्हता. आपण विवाहित बाईच्या नादाला लागून चुकले असल्याचे त्याला वाटत होते. तो ही तिच्याबरोबर उलट भांडण काढत होता. आता तो तिला म्हणत होता. मला दारुला पैसे दे. मला तु ठेवून घेतले आहेस, तर मी तुला सांभाळतो पण तुझ्या चार मुलांची मी जबाबदारी घेणार नाही.ती त्याला आपली मुले ही घेऊन आपण जावून दुसरीकडे राहुया. तु माझ्याबरोबर लग्न कर असे सांगत होती. त्याच्याबरोबर या कारणातून सारखे भांडत होती. त्याला करावे आणि काय नको असे झाले होते. हा पेच कसा सोडवयचा या विचारात तो कायम असायचा.त्याच्या घरच्या लोकांनी तर त्याच्यासाठी दुसरी समाजातील मुलगी बघून ठेवली होती. तो आता वेगळ्याच कात्रीत सापडला होता. अलिकडे तर ती नवऱ्याचा डोळा चुकवून त्याला तो सांगेल तेथे भेटायला येत होती. पण शरीराला हात लावू देत नव्हती. आधी आपण मुलासह पळून जावूया आणि दुसरीकडे जावून लग्न करुया असा हठ्ठच तिने त्याच्याकडे धरला होता. काहीही करून ती त्याला आपल्यापासून जावू देत नव्हती. वारवार धमकी देवून त्याला गप्प बसवित होती. तुच माझा नवरा आहेस म्हणून त्याला सांगत होती.

गेल्या आठवडयात यातुन मार्ग काढण्यासाठी म्हणून त्याने नेहमीप्रमाणे तिला एका शेतात बोलावून घेतले होते.त्यावेळी तो लाडात येत तिला मिठीत घेत तिच्याकडून शारीरिक सुख घेवू इच्छित होता.पण ती त्याला हात लावू देत नव्हती.त्यावेळी दोघात लग्नाच्या विषयावरून भांडणे लागली होती. संध्याकाळचा कडूस पडायला सुरूवात झाली होती. रस्त्यावर आणि आजु बाजुच्या शेतातही कुणी नव्हती. आज हिची गेम केली तरच यातून मार्ग निघेल या विचाराने तो तेथे आला होता. येताना त्याने आपल्या पॅन्टेच्या खिशात चाकु लपवून आणला होता.ती त्याच्यावर उलट सुलट बोलून तोंड सुख घेत होती. भांडणात ती त्याला माझ्याबरोबर लग्न करीत नाहीस तु ना मर्द आहेस अशी म्हणाली, याचा राग त्याला आला होता. त्याचवेळी त्याने तिला काही कळायच्या आतच आपल्या पॅन्टेच्या खिशातून चाकू काढला आणि तिच्या गळ्यावर सर्रकन फिरविला. त्यासरशी तिचा गळा चिरला गेला. आणि त्यातून रक्ताची चिळकांडी उडाली होती.ती ओरडण्याचा प्रयत्न करत असताना त्याने तिच्या अंगावर चाकूचे सपासप असे वार केले. त्यासरशी ती जमीनीवर रक्ताच्या थारोळत्यात पडली.ती त्याच्यासमोरच तडफडत होती.

काही वेळातच गळ्यातून आणि शरीरातून मोठया प्रमाणात रक्तस्त्राव झाल्याने तिचा जागीच मृत्यु झाला होता. तिचा मृत्यू झाल्याने तो भानावर आला. आपल्या हातून तिचा खून झाल्याचे लक्षात येताच त्याने त्या रक्तरंजित चाकू सह जवळचे पोलीस स्टेशन गाठून पोलीसांना सर्व हकीकत सांगितली. पोलीसांनी ही तातडीने त्याला ताब्यात घेऊन घटनास्थळ गाठले होते. घटनास्थळाचा पंचनामा करून पोलीसांनी या घटनेची माहिती तिच्या नवऱ्याला सांगून त्याला ही घटनास्थळी बोलवून घेतले होते. पंचनाम्यानंतर तिचा मृतदेह शवच्छिेदनासाठी सरकारी रुग्णालयात पाठवून देण्यात आला. या घटनेची फिर्याद तिचा नवरा संजिदा (वय ४०) याने पोलीस स्टेशनला दिली. त्याच्या फिर्यादीवरून पोलीसांनी हसीना (वय ३२) हिच्या खून प्रकरणी सौरभ (वय २२) याच्या विरोधात भा.दं.वी.कलम ३०२ प्रमाणे गुन्हा नोंदवून त्याला मा.कोर्टासमोर उभे केले होते. मा.कोर्टाने त्याला चार दिवसाची पोलीस कोठडी दरम्यान त्याने आपल्या गुन्हयाची कबुली पोलीसांना दिली. त्याच्या कबुलीनंतर पोलीसांनी त्याच्याकडून गुन्हयात वापरलेला चाकु जप्त केला. या घटनेचा पुढील तपास मेरठ ग्रामीण पोलीस करीत आहेत. विवाहित स्त्री जर विवाहबाहय संबंधात अडकली तर ती आपल्या नवऱ्याचा आणि मुलांचा ही विचार करीत नाही.त्या संबंधासाठी तिला तिचा प्रियकरच पाहिजे असल्याने आणि तो प्रियकर तिच्यापेक्षा वयाने लहान असला आणि तरणाबांड असला की ती त्याच्याकडूनच आपल्या जवानीची आग भागवित असते. परंतु असे विवाहबाहय संबंध हे नाजुक वळणावर पोहचले की त्यातून अघटित अशी घटना घडते हेच या घटनेवरून दिसून येते.

## सवर्णांनी हत्या केलेल्या बालाजी कांबळे ...

माहिती द्यायला तयार नव्हते. मात्र क्राईम संध्याच्या प्रतिनिधीने पाठपुरावा सुरु करताच पोलिसांवर दबाव आला आणि नंतर पोलिसांनी आरोपीला अटक केली. त्यानंतर क्राईम संध्याच्या प्रतिनिधीने हे प्रकरण वरपर्यंत नेऊन कांबळे कुटुंबाना समाज कल्याण केंद्राकडून ८ लाखांची मदतही मिळवून दिली आणि या पुढेही कांबळे कुटुंबाला मदत करणार आहे. याबाबत कृशिकेश कांबळे यांनी कांबळे कुटुंबियांच्या वतीने क्राईम संध्याचे आभार मानलेत.

14 TO 20 SEPTEMBER 2020 - Page 7 (CRIME SANDHYA):Layout 1 12/09/2020 8:37 PM Page 1



# महानगरपालिका मुख्य वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या गैरव्यवहार प्रकरणी शासनाचे कारवाईचे निर्देश

**भिवंडी/प्रतिनिधी**

भिवंडी शहर महापालिकेच्या सार्वजनिक आरोग्य व वैद्यकीय विभागातील प्रशासकीय अनियमितता व आर्थिक अपहारप्रकरणी प्रभारी वैद्यकीय अधिकारी डॉ.विद्या शेट्टी यांची सखोल चौकशी करून त्यांच्यावर फौजदारी कारवाईची मागणी तत्कालीन महापौर जावेद दळवी यांनी शासनाकडे केली होती.त्यामुळे शासनाने गंभीर दखल घेऊन भिवंडी पालिकेच्या मुख्य लेखा परिक्षकांमार्फत गोपनीय चौकशी करून त्यांनी दिलेल्या अहवालानुसार तत्कालीन प्रभारी वैद्यकीय अधिकारी डॉ.विद्या शेट्टी यांच्यावर आयुक्त डॉ. पंकज आशिया यांनी तातडीने कारवाई करून शासनाला अहवाल सादर करावा असे गोपनीय पत्र नुकतेच राज्याचे राष्ट्रीय आरोग्य अभियान मुंबई विभागाचे सहसंचालक महेश बोटले यांनी महापालिका प्रशासनाला पाठविले आहे.त्यामुळे पालिकेच्या आरोग्य वैद्यकीय विभागात खळबळ माजली आहे.



भिवंडी पालिकेची सार्वजनिक आरोग्य व वैद्यकीय विभागाअंतर्गत शहरात विविध ठिकाणी १५ आरोग्य उपकेंद्र सुरू आहेत. या आरोग्य केंद्रात उपचारासाठी येणाऱ्या रूग्णांसाठी शासनाने दरवर्षी औषधांचा पुरवठा केला आहे. त्यापैकी २०१५ – १६ पासून सन २०१८ – १९ पर्यत या विभागातील प्रशासकीय अनियमितता व आर्थिक अपहार तसेच शासनाकडून आलेल्या औषधांच्या नोंदीचे स्टॉक रजिस्टर व अनेक महत्वाचे दस्ताऐवज गहाळ करून आर्थिक अपहार केल्याची तक्रार भाजप व शिवसेना नगरसेवकांनी महापौर यांच्याकडे केली होती. त्यामुळे तत्कालीन महापौर जावेद दळवी यांनी दखल घेत शासनाकडे तक्रार केली आहे. त्यांनी वैद्यकीय अधिकारी डॉ.विद्या शेट्टी यांच्यासह कर्मचारी व आरोग्य विभागातील डॉक्टर यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे. याबाबत शासनाने पालिकेचे तत्कालीन आयुक्त मनोहर हिरे यांना या प्रकरणी गोपनीय चौकशी करून अहवाल सादर करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार आयुक्त हिरे यांनी पालिकेचे मुख्य लेखा परिक्षक कालिदास जाधव यांची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती केली. लेखापरिक्षक जाधव यांनी या प्रकरणी सखोल गोपनीय चौकशी करून सुनावणी घेतली त्यामध्ये शासनाकडून आलेल्या औषधांच्या नोंदीचे स्टॉक रजिस्टर व अनेक महत्वाचे दस्ताऐवज डॉ.शेट्टी यांनी सादर केलेले नाही तर काही औषधे व दस्ताऐवज आगीमध्ये जळून खाक झाल्याचा बहाणा करण्यात आला आहे. मात्र याबाबत डॉ.शेट्टी यांनी पोलीस ठाण्यात तक्रार केलेली नाही. तसेच शासनाकडील सिव्हिल हॉस्पिटल, डी.डी.ऑफिस, डी.एच.ए.ऑफिस क्षयरोग ऑफिस पुणे आदींकडून आलेल्या लाखो रूपयांचा औषधसाठा तसेच जन्म, मृत्यू दाखल्यांबाबत प्रशासकीय अनियमितता व आर्थिक अपहार प्रकरणी वैद्यकीय अधिकारी डॉ.शेट्टी यांच्यासह अन्य वैद्यकीय कर्मचाऱ्यांची सुनावणी घेतली असता ते देखील समाधानकारक उत्तर देऊ शकलेले नाहीत. त्यामुळे पालिकेचे मुख्य लेखा परिक्षक कालिदास जाधव यांनी गोपनीय चौकशी तपास अहवाल तयार करून राज्य शासनाच्या आरोग्य विभागाकडे पाठवून दिला आहे. या अहवालाची पडताळणी करून राष्ट्रीय आरोग्य अभियान मुंबई विभागाचे सहसंचालक महेश बोटले यांनी महापालिका आयुक्त डॉ.पंकज आशिया यांना लेखी पत्र पाठवून अपहार प्रकरणी वैद्यकीय अधिकारी डॉ.शेट्टी यांच्यावर कारवाई करून अहवाल सादर करावा असे आदेश दिले आहेत.

# जालन्यात पोलीस कर्मचाऱ्याची आत्महत्या

**जालना/क्राईम रिपोर्टर**



१९८५ मध्ये रुजू जिल्हा पोलीस दलात रुजू झालेले झालेले सुभाष विठ्ठल गायकवाड (५४) जालना यांच्याकडे अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या पिस्तूल सव्हिसिंगची जबाबदारी आहे. परंतु त्यांना रात्रीच्या वेळी अचानक सामाजिक कार्यकर्ते शाम मानव यांच्या सुरक्षेसाठी स्कॉटींगला जाऊन त्यांना जिल्हा पार करुन दिला. दरम्यान, गायकवाड यांना नातेवाईकांना भेटण्यासाठी मंगळवारी सकाळी लातूरला जायचे होते. यासाठी भाड्याने वाहनही पाहत होते. परंतु आदल्या दिवशी सोमवारी रात्री स्कॉटींगच्या ड्युटीवर त्यांना जावे लागले. रात्री दीड वाजेच्या सुमारास त्यांनी नातेवाईक, मित्रमंडळीना गुड मॉर्निगचे मॅसेजही टाकले. या नंतर मुख्यालयात सकाळी शस्त्र जमा करण्यासाठी गेले असता, ८.५८ वाजेच्या सुमारास त्यांनी मुख्यालयाच्या बाजूलाच असलेल्या सिमेंट रस्त्यावर स्वता:च्या डोक्यात बंदूकीने गोळी झाडून आत्महत्या केल्याने पोलीस दल हादरले आहे. सकाळच्या सुमारास मुख्यालय परिसरात क्वार्टर असल्यान मोठ्या प्रमाणात पोलीसांची वर्दळ असते. दरम्यान, सकाळच्या सुमारास घडलेल्या या घटने मुळे पोलीस कुटूंबियांना जोरदार झटका बसला. घटनेची माहिती मिळताच पोलीस अधिक्षक पोलीस अधिक्षक एस. चैतन्य, अपर पोलीस अधिक्षक समाधान पवार यांच्यासह डिवायएसपी सुधीर खिरडकर, पोलीस निरीक्षक राजेंद्रसिंह गौर, संजय देशमुख, संजय लोहकरे, यशवंत जाधव, प्रशांत महाजन यांच्यासह विविध शहरातील सर्व ठाण्यांचे पोलीस निरीक्षक, कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. घटनास्थळावर मोठ्या प्रमाणात रक्तस्त्राव झाला होता. बंदूकीच्या गोळीचा आवाज काही नागरिकांपर्यत गेल्यामुळे या ठिकाणी नागरिकांची ही गर्दी झाली होती. पोलीसांनी येऊन घटनास्थळाचा पंचनामा केला. यानंतर मृतदेह रुग्णवाहिकेव्दारे शव विच्छेदनासाठी औरंगाबादेत हलविण्यात आला. दरम्यान, पोलीस अधिक्षक एस. चैतन्य यांनी या आत्महत्येची चौकशी करण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक राजेंद्रसिंह गौर यांच्याकडे जबाबदारी दिली आहे. यानंतर पो.नि. गौर यांनी तात्काळ चौकशी सुरु केली आहे. गायकवाड यांच्या आत्महत्येचे कारण शोधण्याची जबाबदारी पो.नि. गौर यांच्याकडे असल्यामुळे त्यांनी जबाब घेत कारण शोधणे सुरु केले आहे. चौकशी अंती पोस्टमार्टमध्ये बुलेट डोक्यात आहे की, बाहेर पडली ? या पुर्वी त्यांचे कुणाशी दुरध्वनी वर बोलणे झाले का? आर्थीक व्यवहारामुळे ते तणावग्रस्त होते का, वरिष्ठांच्या जाचाला तसेच कामाच्या तणावामुळे त्यांनी आत्महत्या केली का याबाबत अनेक बाबी समोर येणार आहेत.

# ‘फाईव्ह स्टार व्हिलेज’साठी कंचाड गावाची निवड

## केंद्रीय मंत्री संजय धोत्रे यांच्या हस्ते ऑनलाईन उद्घाटन



**वाडा/प्रतिनिधी**

ग्रामीण भागातील जनतेला पोस्टाच्या माध्यमातून जास्तीत जास्त बँकिंग सुविधा मिळाव्यात, ग्राहकांना अर्थिक लाभाच्या विविध योजनांचा थेट फायदा मिळावा व ग्रामीण भागातील नागरिकांना अर्थिक समावेशन योजनांमध्ये समाविष्ट करावे या हेतूने ‘फाईव्ह स्टार व्हिलेज’ हा उपक्रम संपूर्ण देशात राबविण्यात येणार आहे. यासाठी पालघर जिल्ह्याच्या वाडा तालुक्यातील कंचाड या गावाची निवड करण्यात आली असुन आज दुपारी ३:०० वाजता दुरसंचार मंत्री संजय धोत्रे यांच्या हस्ते कंचाड या गावामध्ये ‘फाईव्ह स्टार व्हिलेज’ या उपक्रमाचे उद्घाटन व्हिडिओ कॉन्फरसिंगद्वारे करण्यात आले. या योजने अंतर्गत या गावातील प्रत्येक घरात पोस्टाच्या पाच योजना पोहोचवल्या जाणार आहेत. जनधन खाते, गॅस सबसिडी, विद्यार्थी शिष्यवृत्ती असे अर्थिक लाभ थेट प्रत्येक कुटुंबाला, नागरिकांला, विद्यार्थ्यांना मिळणार आहेत. पोस्टाच्या माध्यमातून कॅशलेस व्यवहार व्हावेत, अर्थिक सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी ‘फाईव्ह स्टार व्हिलेज’ हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. दुसऱ्या टप्प्यात पालघर जिल्ह्यातील ५० गावांची निवड करण्यात येणार असल्याची माहिती पालघर डाक विभागाचे डाक अधिक्षक सी.व्ही. रामीरेड्डी यांनी यावेळी दिली. यावेळी कंचाड येथील जान्हवी यशवंत चौधरी या प्रथम ग्राहकाला या उपक्रमाचा लाभ डाक अधिक्षक सी.व्ही रामीरेड्डी यांच्या हस्ते देण्यात आला. या प्रसंगी जव्हार उप विभागाच्या डाक निरिक्षक आरती खाडे, वाड्याचे उप डाकपाल विनोद रत्नाकर, कंचाडच्या शाखा डाकपाल निकिता चौधरी आदी मान्यवर उपस्थित होते.

# सोलापूर पोलिसांनी मोटारसायकल चोराला केले जेरबंद; २५ दुचाकी जप्त

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट तालुक्यातील कल्लहिप्परगे गावातील परशुराम शिवाजी मोरे (वय २५) याला सोलापूर स्थानिक गुन्हे शाखेने जेरबंद केली असून त्याच्याकडून सुमारे साडे अकरा लाखांचा २५ चोरीच्या मोटारसायकली स्थानिक गुन्हे शाखेने जप्त केल्या आहेत.



परशुराम मोरे यांनी ग्रामीण भाग, शहर तसेच जिल्हा व राज्याबाहेरून मोटारसायकल चोरल्याची माहिती सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक मनोज पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिली आहे. सोलापूर स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरुण सावंत यांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार विशेष पथकातील पोलीस कर्मचाऱ्यांनी अक्कलकोट तालुक्यातील वागदरी येथे सापळा रचला होता. काही वेळानंतर अक्कलकोटच्या दिशेने वागदरी गावाकडे बिगर नंबर प्लेटच्या मोटारसायकल वरून एक व्यक्ती येत असल्याचे दिसले. त्याचा संशय आल्याने त्यास वागदरी गावाबाहेरच्या चौकात पकडले. त्याने सुरुवातीला उडवाउडवीची उत्तरे दिली. त्याच्याजवळ असलेल्या मोटारसायकलची कागदपत्रे, लायसन्स त्याच्याकडे नव्हते, त्याच्या अधिक संशय आल्याने त्यास अधिक विश्वासात घेऊन चौकशी केली असता त्याने सांगितले की १५ दिवसांपूर्वी करजगी ते कलहिप्परगे रोडवर लावलेली मोटारसायकल चोरून आणल्याचे सांगून ती (ता. आळंद जि कलबुर्गी) येथे विकण्याकरिता जात असल्याचे सांगितले. मागील दोन वर्षापासून तो सोलापूर शहर, अक्कलकोट, दक्षिण सोलापूर, उत्तर सोलापूर, तुळजापूर, इंदापूर, पुणे तसेच कर्नाटकातील कलबुर्गी व आळंद आदी भागांतून दिवसा व रात्रीच्या वेळी हँडल लॉक नसलेल्या मोटारसायकल चोरी केल्या आहेत व चोरलेल्या मोटारसायकलची विल्हेवाट, नातेवाईक, मित्रांना फायनान्सच्या मोटारसायकल लिलावात विकत घेतल्याचे सांगून विकल्या व काही मोटारसायकल गहाण ठेवल्या आहेत तसेच काही मोटारसायकल वापरण्यास दिली असल्याचे त्यांनी पोलिसांना सांगितले. किणी, तडवळ, जेऊरवाडी, किणी सुलतान, कोराळी (ता. आळंद), कलबुर्गी शहर, आलमेल (ता.सिंदगी), होर्ती (ता.इंडी) आदी ठिकाणाहून साडे अकरा लाखांचा २५ मोटारसायकली जप्त करण्यात आली आहेत. यामध्ये ७ होंडा सी बी शाईन, ६ हिरो स्प्लेनडर, ५ क्लासिक बुलेट, २ एच एफ डीलक्स, १ होंडा युनिकॉर्न, १ बजाज पल्सर, २ पॅशन प्रो, १ टीव्हीएस, एक्स एल १०० या वाहनांचा समावेश आहे. अक्कलकोट दक्षिण पोलीस ठाण्यात गु.र.नं. ३७७/२०२० भादंवि ३७९ प्रमाणे गुन्हा दाखल झाले आहे. आरोपी परशुराम मोरे याच्याविरुद्ध अक्कलकोट दक्षिण पोलीस स्टेशन, वळसंग पोलीस स्टेशन, कर्नाटकातील विजयपूर येथील गांधी चौक पोलीस स्टेशन, ठाणे शहर येथील कोनगाव पोलीस स्टेशनमध्ये गुन्हे दाखल असून तो गुन्ह्यात हवा असलेला आरोपी आहे. याद्वारे नागरिकांना आवाहन करण्यात येते की ज्याच्या वरील कंपनीच्या मोटारसायकल चोरीस गेलेल्या आहेत अशा नागरिकांनी त्यांचे कडील वाहनांचे कागदपत्रेसह अक्कलकोट दक्षिण पोलीस स्टेशन येथे संपर्क साधावा. ही धाडसी कारवाई सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक मनोज पाटील, अप्पर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे त्यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरूण सावंत, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक ख्वाजा मुजावर पोलीस कर्मचारी नारायण गोलेकर, दिलीप राऊत, मोहन मनसावाले, अक्षय दळवी, पांडुरंग केंद्रे, विलास पारधी यांनी केले.

# दारूची बेकायदेशीर वाहतूक करणाऱ्यास चार लाखाच्या मुद्देमालासह अटक

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर जिल्ह्यातील बार्शी तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शिवाजी जायपत्रे यांना मिळालेल्या गोपनीय माहितीवरून खांडवी येथे पोलिसांनी सापळा लावून बेकायदेशीर दारूची वाहतूक करणाऱ्यास मुद्देमालासह ताब्यात घेऊन महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम ६५इ ६५क ६५ड आणि ८३ यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाईमुळे तालुका पोलिसांचे आणि पोलीस निरीक्षक शिवाजीराव जायपत्रे यांचे कौतुक होत आहे. पकडण्यात आलेली संपूर्ण दारू आणि त्या बाटल्यांवर असलेले बॅच नंबर राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या मदतीने तपासून ही दारू कोणत्या दुकानातून आणली का नारी येथेच बनवली आहे, याची खात्री होऊन आणखीन मोठे मासे पोलिसांच्या हाती लागतील असे वाटते, राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक रवींद्र आवळे आणि पोलिस अधीक्षक मनोज पाटील यांनीही या प्रकरणात लक्ष घालणे आवश्यक आहे ज्यामुळे अशा गुन्ह्यांना



आळा बसेल.

अधिक माहिती अशी की, पोलिसांना गोपनिय बातमीदारा मार्फत बातमी समजली की, शेंद्री कडुन कुर्डूवाडी बार्शी रोडने खांडवीकडे एक पीक अप टेम्पो मध्ये टेंगो पंचचे बॉक्स घेऊन येत आहे. यामुळे तात्काळ पोलिसांनी खांडवी गावचे पश्चिमेस रोडवरील स्पिडब्रेकर जवळ न्यु डायमंड या हॉटेलच्या पुढे सदरचे वाहन थांबवुन रोडचे बाजुला घेतले व चालकास ताब्यात घेवून वाहनाची तपासणी केली तर त्यामध्ये रिकामे कॅरेट लावलेले होते व कॅरेटच्या पुढील भागात टँगोपंच दारूचे बॉक्स दिसुन आले. त्यावर टॅम्पो चालकास त्याचे नाव गाव विचारता त्याने आपले नाव मोहसिन महमुद सय्यद वय ३६ वर्षे रा. नारी ता. बार्शी जि. सोलापुर असे असल्याचे सांगुन सदरचा माल टँगोपंचचे बॉक्स मी मौजे नारी येथून सागर बाळासाहेब बारंगुळे यांनी माझ्या गाडीत भरून कुर्डूवाडीच्या दिशेने घेवून ये, मी पुढे आहे असे सांगितले, मी त्याने सांगितल्या प्रमाणे कुर्डुवाडी – बार्शी रोडवरील एसार पेट्रोलपंप येथे वांगरवाडी हद्दीत जाऊन थांबलो बराच वेळ बारंगुळे याची वाट पाहिली त्यांचा फोन ही लागला नाही म्हणून मी परत बार्शी मार्गे नारी येथे चाललो आहे अशी हकीकत सांगितली त्यानंतर टॅम्पोतील १ लाख १७ हजाराचे टँगोपंच कंपनीच्या १८० मिलीच्या एकुण ४८ सिलबंद बाटल्या असलेले ४२ दारूचे बॉक्स आणि वाहन असा एकूण ४ लाख १७हजाराचा मुद्देमाल जप्त करून संबंधितांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बार्शी शहर आणि तालुक्यातून विनापरवाना बेकायदेशीरपणे दारूची वाहतूक नेहमीच होत असते, तसेच पांगरी पोलीस ठाणे हद्दीतील नारी या भागात बेकायदेशीर व्यावसाय मोठ्याप्रमाणात चालतात येथे चंदन तस्करी, घरगुती गॅस साठा, मटका आणि डुप्लिकेट दारू बनविण्याचे केंद्र हे चालतात या बेकायदेशीर व्यवसायाला जबाबदार असलेले पोलीस यांचेवर देखील वरिष्ठांनी कारवाई करणे गरजेचे आहे.

# वीज कोसळून अंबिस्ते गावातील एका तरुणाचा मृत्यू तर ५ जखमी

**वाडा/प्रतिनिधी**



तालुक्यातील अंबिस्ते येथे रविवारी वीज अंगावर कोसळून सागर शांताराम दिवा (वय १७) या तरुणाचा मृत्यू झाला आहे तर त्याच्या सोबतचे ५ तरुण जखमी झाले आहेत. रविवारी सायंकाळी विजेच्या कडकडासह पाऊस सुरू होता. पावसापासून संरक्षणासाठी हे सर्व तरुण एका झाडाखाली जमा झाले होते. यावेळी सागर शांताराम दिवा या तरुणाच्या अंगावर वीज पडून त्याचा जागीच मृत्यू झाला, तर त्याच्या सोबतचे संदिप अंकुश दिवा (वय २५), अनंता चंद्रकांत वाघ (वय २४), रविंद्र पवार (वय१८), नितेश मनोहर दिवा (वय १९) व सनी बाळु पवार (वय १८) हे जखमी झाले आहेत. जखमींना शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

# प्रधानमंत्री आवास योजनेचे लाभार्थी प्रतीक्षेत

**औसा/प्रतिनिधी**

औसा नगर परिषदेच्या वतीने प्रधानमंत्री आवास योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी नगरपालिका पदाधिकारी आणि मुख्याधिकारी टाळाटाळ करीत आहेत. यामुळे या योजनेचे नवीन लाभार्थी प्रतीक्षेत आहेत. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०२२ पर्यत बेघरांना घरे देण्याचा संकल्प केला असून औसा नगर परिषदेच्यावतीने केवळ दोन वेळा प्रधानमंत्री घरकुल योजनेचे लाभार्थी निवडले आहेत. हजारो बेघर लाभधारकांनी नगर परिषदेकडे सर्व कागदपत्रांसह प्रस्ताव दाखल केले आहेत. या प्रस्तावासाठी गरीब व बेघर लाभधारकांनी हजारो रुपये खर्च करून, तसेच नगर परिषदेस नळपट्टी, घरपट्टी भरून जागेचा ८–अ जोडला आहे. परंतु औसा शहराची लोकसंख्या ५० हजाराच्या जवळपास झाली असून अनेक कुटुंब शहरात बेघर आहेत. १९९३ च्या भूकंपानंतर अनेक कुटुंब विभक्त झाले असून बेघरांच्या लाभार्थ्यांनी मोठ्या प्रमाणात खर्च करून प्रधानमंत्री आवास योजनेचे प्रस्ताव दिले आहेत. एका खासगी एजन्सीकडे प्रस्ताव भरून घेण्याचे काम नगर परिषदेने दिले होते. अनेक लाभधारकांनी सर्व कागदपत्रांसह प्रधानमंत्री आवास योजनेतील घराचे स्वप्न साकार करण्यासाठी हजारोंच्या संख्येत प्रस्ताव दिले आहेत. परंतु नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष, मुख्याधिकारी, संबंधित प्रभागातील नगरसेवक या योजनेला गांभीर्याने घेत नसल्याने दिसत आहे.

मुख्याधिकारी तानाजी चव्हाण यांना विचारणा केली असता कोरोना विषाणूंच्या प्रादुर्भावामुळे ही योजना रखडली आहे असे सांगितले. परंतु कोरोनाचा प्रसार काही केल्या कमी होत नाही. त्यामुळे नगराध्यक्ष, मुख्याधिकारी यांनी औसा शहरातील प्रलंबित प्रधानमंत्री आवास योजनेचे प्रस्ताव मंजूर करावे अशी मागणी होत आहे.

# कोरोनाच्या पार्श्वभूमीवर शैक्षणिक वर्षात फी वाढ करू नये

## महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेची शाळा व्यवस्थापनाकडे मागणी

**भिवंडी/प्रतिनिधी**

कोरोना काळात सर्वांवर आर्थिक संकट कोसळलेले आहे. त्यामुळे शालेय व्यवस्थापनेने सन २०२० – २१ या चालू शैक्षणिक वर्षाच्या शैक्षणिक शुल्कामध्ये कोणत्याही प्रकारची वाढ करू नये अशी मागणी महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेच्यावतीने करण्यात आली असून त्याबाबतचे निवेदन नुकतेच भिवंडी शहरातील एनईएस इंग्लिश मिडीयम स्कुल व्यवस्थापनाकडे देण्यात आले आहे.

भिवंडी शहरामधील नामांकित एनइएस इंग्लिश मिडीयम प्री प्रायमरी स्कुलमधून गेल्या काही दिवसांपासून पालकांच्या मोठ्या प्रमाणात फी वाढी संदर्भात तक्रारी येत होत्या. त्या तक्रारींची दखल घेऊन महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेचे ठाणे जिल्हा अध्यक्ष संतोष साळवी यांच्या नेतृत्वाखालील भिवंडी पश्चिम शहर अध्यक्ष सचिन पाटील,भिवंडी पुर्व शहर अध्यक्ष योगेश धुळे, पदाधिकारी महेश मिरजे, हर्षद पाटील, गिरीश देव आदींच्या शिष्टमंडळाने एनइएस इंग्लिश स्कुल व्यवस्थापन समितीचे सचिव अस्वले व मुख्याध्यापक संजय कालगावकर यांची भेट घेऊन पालकांचे व विद्यार्थ्यांचे प्रश्न मांडले. यावर सकारात्मक चर्चा करून येत्या १५ दिवसात फी वाढ, ऑनलाइन अभ्यासक्रम यावर व्यवस्थापन निर्णय घेऊन विद्यार्थी व पालकांना फी वाढीत सूट देतील अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेचे जिल्हा अध्यक्ष संतोष साळवी यांनी पालकांना आवाहन केले आहे, की सध्याच्या कोरोनाच्या संकटकालीन परिस्थितीत कोणतीही शाळा किंवा व्यवस्थापन आपाल्याकडे फीसाठी तगादा लावत असेल किंवा फी वाढ करत असेल तर त्या पालकांनी महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी संपर्क साधावा असे आवाहन केले आहे.



# भिवंडी ग्रामीण भागात ५८ टक्के विद्यार्थी शिक्षणापासून वंचित

## ४२ टक्के विद्यार्थ्यांना दिले जाते ऑनलाईन शिक्षण



**भिवंडी/अभिजित हिरे**

कोरोना पार्श्वभूमीवर ऑनलाईन शिक्षण हा पर्याय शासनाने स्वीकारला परंतु ग्रामीण भागात आज ही असंख्य पालकांकडे स्मार्ट फोन नसणे व ग्रामीण भागात इंटरनेट नेटवर्कची वानवा यामुळे या ग्रामीण भागातील तब्बल ५८ टक्के विद्यार्थी शिक्षणा पासून वंचित राहिले असून फक्त ४२ टक्के विद्यार्थी ऑनलाईन शिक्षणाचा लाभ घेत असल्याचे पंचायत समिती शिक्षण विभाग कडील आकडेवारी वरून समोर आले आहे.

कोरोना काळात अन लॉक काळात टप्याटप्याने विविध आस्थापने सुरू करीत असताना शासनाने शाळा ऑनलाईन सुरू करण्या बाबत धाडस केले परंतु ऑनलाईन शिक्षणास शहरात थोडया फार प्रमाणात यश येत असले तरी ग्रामीण भागात ऑनलाईन शिक्षण राबविणे जिकरीचे असल्याने हजारो विद्यार्थी ऑनलाईन शिक्षणा पासून वंचित राहणे ही चिंतेची बाब आहे. भिवंडी तालुक्यात एकूण ३०८ जिल्हा परिषद शाळांमधून तब्बल ७०९६९ विद्यार्थी शिक्षण घेत असून सध्या सुरू असलेल्या ऑनलाईन शिक्षणाचा लाभ ३३०६३ विद्यार्थी घेत आहेत तर ३७९०६ विद्यार्थी ऑफलाईन शिक्षण घेत असून २९८७० विद्यार्थ्यांच्या पालकांकडे फक्त स्मार्टफोन असल्याची माहिती पंचायत समिती गटशिक्षणाधिकारी नीलम पाटील यांनी दिली आहे.

सध्या शाळा विद्यार्थ्यांसाठी बंद असल्या तरी विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजन म्हणून कोरडी शिधा धान्य वितरण शिक्षकांच्या माध्यमातून सामाजिक अंतर राखून करण्यात येत असून जून पर्यंत पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्यांना प्रत्येकी ३ किलो ४०० ग्रॅम प्रमाणे ७५१५० किलो तांदूळ, ९०० ग्रॅम प्रमाणे २४८०४ किलो हरभरा व ६०० ग्रॅम मुगडाळ प्रमाणे १२४०० किलो तर सहावी ते आठवी दरम्यानच्या विद्यार्थ्यांना २७०६० किलो तांदूळ, १३५१२ किलो हरभरा, १३५१२ किलो मुगडाळ वितरण शाळां मध्ये शिक्षकांनी केले असल्याची माहिती पंचायत समिती गटशिक्षणाधिकारी नीलम पाटील यांनी दिली आहे. भिवंडी तालुक्याचे क्षेत्रफळ मोठे असल्याने ३०८ शाळां मधून ९५५ शिक्षक ज्ञानदानाचे कार्य करीत असताना पंचायत समिती शिक्षण विभागात ४ विस्तार अधिकारी पदे रिक्त असून गटशिक्षणाधिकारी यांना प्रशासकीय व शाळा भेटीसाठी वाहन नसल्याने कामावर मर्यादा पडत असून, नुकताच पाच सप्टेंबर हा शिक्षक दिन साजरा झाला परंतु यंदा कोरोना मुळे सार्वजनिक कार्यक्रमांचे आयोजन कोठेही करण्यात आले नसल्याने शिक्षकांनी कोरोना काळात केलेले सेवकार्या व त्यांच्या ज्ञानदान कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी थँक्स टू टीचर हा ऑनलाईन उपक्रम गटशिक्षणाधिकारी नीलम पाटील यांनी राबविला असता त्या उपक्रमात शेकडोंच्या संख्येने पालक विद्यार्थी यांनी उपस्थिती लावून शिक्षकांच्या कार्य बद्दल प्रशंसा केली आहे.

**आकडेवारीचा प्रमाण पाहता एकूण विद्यार्थी संख्या ७०९६९**

- ऑनलाईन शिक्षण घेणारे विद्यार्थी संख्या ३३०६३ – ४६.५८ %
- ऑफलाईन शिक्षण घेणारे विद्यार्थी संख्या ३७९०६ – ५३.४१%
- स्मार्ट फोन धारक विद्यार्थी पालक संख्या २९८७० – ४२.०८%

# भूकंपाने नुकसान झालेल्या डहाणू आणि तलासरी परिसराची पालघर जिल्हाधिकाऱ्यांनी केली पाहणी



**पालघर/प्रतिनिधी**

जिल्ह्यात मागील काही दिवसा पासून भूकंपाचे धक्के सातत्याने जाणवत आहेत.या भूकंपामुळे जिल्ह्यातील ज्या भागात नुकसान झाले आहे त्या परिसराची पाहणी जिल्हाधिकारी डॉ.माणिक गुरसळ यांनी केली. सासवद येथील श्रीमती अंती डोंगरे यांच्या घराला जिल्हाधिकारी डॉ.माणिक गुरसळ यांनी भेट देऊन नुकसानग्रस्त कुटुंबाशी संवाद साधला या वेळी गुरसळ यांनी शासन आपल्या सोबत असून लवकरच आपल्याला नुकसान भरपाई मिळेल असे सांगून परिसरातील रहिवाशी यांना धीर दिला.

भूकंपामुळे सदर परिसरात घराची भिंत कोसळली होती. त्यानंतर जिल्हाधिकारी डॉ.गुरसळ यांनी धुंदलवाडी येथील वेदांत हॉस्पिटलला भेट दिली. तेथे त्यांनी Covid-19 या संसर्गजन्य आजारासाठी उभारलेले ऊउकऊ सेंटर येथे भेट देऊन रुग्णांशी संवाद साधून समस्या जाणून घेतल्या. तसेच धुंदलवाडी येथील आश्रम शाळेमध्ये अधिकारी व पदाधिकारी यांची बैठक घेऊन भूकंप तसेच Covid-19 बाबतीत सूचना दिल्या सदर दौऱ्यावेळी सहायक जिल्हाधिकारी अशिमा मित्तल, तहसीलदार राहुल सारंग, गटविकास अधिकारी भरक्षे, पंचायत समिती सभापती श्रीमती सातवी, धुंदलवाडीचे सरपंच महाले तसेच इतर पदाधिकारी उपस्थित होते.

# खाजगी कोविड सेटंरचे शासनाने निर्धारीत केलेले दर आणखीन कमी करुन रुग्णांना दिलासा द्यावा!

## रुग्ण हक्क संघर्ष समितीचे लातुर जिल्हाधिकारीना निवेदनाद्वारे मागणी अन्यथा आंदोलन!



**लातूर/करकरे अंबादास**

लॉकडाऊन मुळे सर्वसामान्य जनतेची आर्थिक परिस्थिती बिकट झाली आहे व त्यातच करोना साथरोगाचे प्रमाणही वाढले आहे. सरकारणे खाजगी कोविड १९ हॉस्पिटल्स मध्ये उपचारसाठी शासकिय शुल्क नियमावली जाहिर केली आहे. हे शासकिय शुल्क हे जास्तीचे आहेत ते सरकारणे आणखीन कमी करुन रुग्णांना दिलासा द्यावा या मागणीचे निवेदन रुग्ण हक्क संघर्ष समितीचे जिल्हा कार्याध्यक्ष विश्वास कुलकर्णी यांच्या नेतृत्वाखाली समितीचा शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी यांना प्रत्यक्ष भेटुन सविस्तर चर्चा करुन मागणी निवेदनाद्वारे केली. खाजगी कोविड सेंटर मध्ये शासनाने शासकिय दर निर्धारीत केले आहेत हे दर दररोज ४००० रुपयांपासुन ते ९००० रुपयापर्यत आहेत या शासकिय दराप्रमाणे कमित कमि चौदा दिवसाचे शुल्क हे लाखाचा पुढे जाते. हे दर सर्वसामान्यानां परवडणारे नाहित म्हणून सदरील दर हे आणखीन कमि करुन रुग्णांना दिलासा देणारे अत्यंत माफक दर शासनाने निर्धारीत करावेत व रुग्णांणा दिलासा द्यावा. तसेच सर्वच खाजगी हॉस्पिटल्सची तपासणी मोहिम राबवुन दोषी आढळणाऱ्या लुटारु हॉस्पिटल्सची नोंदणी हि कायमची रद्द करावी व रुग्ण लुटीस प्रतिबंधक घालावा अशि मागणीहि करण्यात आली जिल्हाधिकारी साहेबांनी या गंभिर समस्येची दखल घेऊन शासनास याबाबत सुचवावे व रुग्णहितार्थ न्याय द्यावा अन्यथा रुग्ण हक्क संघर्ष समितीचा वतीने तीव्र आंदोलन केले जाईल असा इशारा दिला या समितीच्या शिष्टमंडळात समितीचे ॲड. निलेश करमुडी, संजयकुमार सुरवसे, विश्वास कुलकर्णी, श्रीकृष्ण डाळे, प्रशांत चव्हाण, रविराज घोडके, विशाल होके, मिनाक्षीताई शेटे, ज्योतीताई मारकडे, प्रगती डोळसे, प्रा. शंकरराव सोनवणे, संतोष सोनवणे, बळिराम चाटे आदि पदाधिकारी सहभागी होते.

# ३० टक्के विजदर कपातीचे आश्वासन पूर्ण करा आम आदमी पक्षच्यावतीने उर्जामंत्र्यांना निवेदन!



**उदगीर/प्रतिनिधी**

राज्यातील नागरिकांचे कोविड संसर्ग लॉकडाऊन कालावधीतील चार महिन्यांचे २०० युनिट पर्यंत विजबिल माफी व वीज दरवाढ मागे घेवून ३० टक्के दर कपातीचे आश्वासन पूर्ण करा अशी मागणी आम आदमी पक्ष, उदगीरच्या वतीने महावितरण विभागीय कार्यालय उदगीरकडे दिलेल्या एका निवेदनातून राज्याचे मुख्यमंत्री आणि उर्जामंत्र्यांकडे करण्यात आली आहे.

या निवेदनात कळविण्यात आले आहे की, राज्यातील जनतेची कोविड संकट काळात परिस्थिती बिकट झाली आहे. तरी वाढीव दराने वीजेची देयके देण्यात आले आहे. तरी ते रद्द करून राज्यातील नागरिकांचे कोविड कालावधी दरम्यान चार महिन्यांच्या २०० युनिट पर्यंत विजबिल माफीचे आश्वासन दिले होते परंतु याविषयी अद्यापर्यंत कोणताही निर्णय झाला नाही तरी याविषयी आम आदमी पक्षाच्यावतीने हे आंदोलन करण्यात आले असल्याचे या निवेदनात कळविण्यात आले आहे. त्याचबरोबर विविध मागण्याही करण्यात आल्या आहेत. यामध्ये कोविड कालावधी दरम्यान मार्च ते जून या चार महिन्यांच्या २०० युनिट पर्यंत विजबिल माफी करण्यात यावे, महावितरणकडून १ एप्रिलपासून करण्यात आलेली वीज दरवाढ मागे घ्यावी, शिवसेना जाहीरनाम्यातील आश्वासनाप्रमाणे ३०० युनिटपर्यंत ३० टक्के स्वस्त वीज देण्याचे आश्र्वासन पूर्ण करावे, राज्य सराकारच्या १६ टक्के अधिवार व वहन कर रद्द करण्यात यावा, वीज वैंपन्यांचे सीएजी ऑडिट करण्यात यावे, कोविड दरम्यानचे भरमसाठ दिलेले विजबिल मागे घेवून जून्या दराने मागील वर्षाप्रमाणे महिनेवारी देयक द्यावे आदी मागण्या करण्यात आल्या आहेत. यानिवेदनावर जयश्री तोंडारे, सय्यद सैदोद्दिन, अजिंक्य शिंदे, आनंदा कामगुंडा, अमित पांडे, शाम माने, शेख मोसिन, एम.शेख, शेख सलमान, वस्ताद, व्ही.के. अंबेसंगे, माणिक कसबे, जे.कि.पटले, शेख अन्सार, हाश्मी सय्यद, आशाबाई कांबळे, कौशाबाई कांबळे, छायाबाई कांबळे, कमलबाई पांढरे, मुक्ताबाई काळे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# लातूरमधील अवैध धंदे तात्काळ बंद करण्याची मागणी




**लातूर/प्रतिनिधी**

शहरातील प्रभाग क्र.१८ मध्ये अवैध धंद्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढलेले आहे. याकडे पोलीस प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्यामुळे नागरिकांना अवैध धंदे चालविणार्यामुळे होणार्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे आता तरी पोलीस प्रशासनाने लक्ष देवून प्रभाग क्र.१८ मधील अवैध धंदे तात्काळ बंद करा, या मागणीसाठी शहरातील बसवेश्वर चौकात भाजपा युवा नेते अजितसिंह पाटील कव्हेकर यांच्या उपस्थितीत निदर्शने करून या मागणीचे निवेदन भारतीय जनता पार्टी युवा मोर्चा महात्मा बसवेश्वर मंडलाच्यावतीने विवेकानंद पोलीस स्टेशनचे पोलीस निरिक्षक यांना देण्यात आले आहे. प्रभाग १८ मध्ये व त्या लगतच्या परिसरात मोठ्या प्रमाणात मटका व गावठी दारू विकण्याचे प्रमाण वाढलेले आहे. त्यामुळे प्रभागातील नागरिकांना याचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे. अगोदरच कोरोनामुळे लोकांचे आर्थिक कंबरडे मोडलेले आहे. त्यातच नागरिकांना अवैध धंद्याचा त्रास सहन करावा लागत आहे. मागील लॉकडाऊन पासून चालणारे अवैध धंदे आजही राजरोसपणे सुरू आहेत. प्रशासन कोरोनाच्या संकटाचा सामना करण्याच्या नावाखाली अवैध धंद्याकडे दूर्लक्ष करीत आहे. परिणामी अवैध धंद्याचे प्रमाण वाढलेले आहे. पण आता तरी या अवैध धंद्यावरती लक्ष देवून अवैध धंदेवाल्याविरोधात तात्काळ कारवाई करावी. अशा मागणीचे निवेदन विवेकानंद पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक यांना निवेदन देण्यात आले. अवैध धंद्याच्या विरोधात निदर्शने करून युवा नेते अजितसिंह पाटील कव्हेकर यांच्या उपस्थितीत पोलीस प्रशासनाचा निषेध व्यक्त करण्यात आला. यावेळी पोलीस प्रशासनाला देण्यात आलेल्या निवेदनावर महात्मा बसवेश्वर मंडल अध्यक्ष संजय गिर, ॲड.गणेश गोजमगुंडे, महात्मा बसवेश्वर मंडल युवा मोर्च्या अध्यक्ष राजेश पवार, अमर पाटील, शिवाजी कामले, अजय कोटलवार, सागर घोडके, अफ्रिन खान, सुमन राठोड,भामाबाई काळे, सरोबी शेख, लताताई घायाळ, महादेव पिटले, विकास बनसुडे, बालाजी झाकने, बस्वराज सुलगुडले, गजेंद्र बोकन, आकाश पिटले, ज्ञानेश्वर भुसे, फैय्याज शेख, संतोष गायकवाड, श्रीकांत भराडीया,सुनिल डोलसे, मदिना शेख, वैशाली मुंढे, गणेश शेटे, सुरेश सुर्यवंशी आदींच्या स्वाक्षर्या आहेत.

# भाजयुमोच्या ठाणे जिल्हाध्यक्षपदी श्रीधर पाटील तर कार्याध्यक्षपदी जगन पाटील यांची नियुक्ती



**भिवंडी/प्रतिनिधी**

महाराष्ट्र प्रदेश भाजपमध्ये गेल्या महिनाभरात विविध फेरबदल केल्यानंतर प्रदेश अध्यक्ष चंद्रकांत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पक्षांतर्गत सर्वत्र नव्या उमेदीच्या कार्यकर्त्यांच्या नेमणूका करण्यात येत आहेत. त्या अनुशंगाने ठाणे (ग्रा.) जिल्हा भाजयुमोच्या अध्यक्षपदी श्रीधर जयवंत पाटील यांची तर कार्याध्यक्षपदी ईताडे ग्रामपंचायतीचे कार्यकुशल सरपंच जगन पाटील यांची नेमणूक करण्यात आली आहे. यावेळी भाजप किसान आघाडीचे जिल्हाध्यक्ष यशवंत सोरे यांच्या पक्षांतर्गत कार्याची दखल घेऊन त्यांना पदोन्नती देत भाजपच्या जिल्हा व्यापारी आघाडीच्या अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. तर काल्हेर येथील भाजपचे सक्रीय कार्यकर्ते छत्रपती पाटील यांचे जिल्हा उपाध्यक्षपद कायम ठेवून त्यांच्या सकारात्मक कार्याचा गौरव करण्यात आला आहे. ठाणे जिल्हा भाजप कार्यकर्त्यांच्या नियुक्ती पत्रांचे वाटप करण्यासाठी मुरबाड – कल्याण रोडवरील गोवेली येथील एका सामाजिक संस्थेच्या सभागृहात भाजप प्रदेश उपाध्यक्ष तथा खासदार कपिल पाटील यांच्या अध्यक्षतेखाली व ठाणे जिल्हा भाजप (ग्रा.) अध्यक्ष तथा आमदार किसन कथोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

# औद्योगिक वसाहतीतील सर्व कर्मचाऱ्यांची रॅपिड ॲंटीजन टेस्ट करून घ्यावी –डॉ.माणिक गुरसळ




**पालघर/प्रतिनिधी**

पालघर जिल्ह्यात कोरोनाचा प्रादुर्भाव दिवसेंदिवस वाढत असून पालघर नगर परिषद व बोईसर – तारापूर एमआयडीसी या क्षेत्रामध्ये कोव्हीड–१९ चा प्रसार जास्त होत आहे तरी सर्व औद्योगिक वसाहतींमधील कर्मचाऱ्यांची रॅपिड एंटीजन टेस्ट २५ सप्टेंबर पर्यत कुठल्याही परिस्थितीत करून घ्यावी, अशा सूचना जिल्हाधिकारी डॉ माणिक गुरसळ यांनी दिल्या.औद्योगिक क्षेत्रातील कोरोनाचा वाढता प्रादुर्भाव पाहता जिल्हाधिकारी यांनी तारापूर एमआयडीसी व पालघर मधील औद्योगिक वसाहतींच्या व्यवस्थापकांची आढावा बैठक आयोजित केली होती. त्यावेळी ते बोलत होते. या बैठकीत विराज प्रोफाइल, आरती ड्रग्स, लुपिन फार्मा, निऑन लॅबरोटरीज टाटा स्टील व इतर अद्योगिक वसाहती सहभागी झाल्या होत्या. प्रत्येक कर्मचाऱ्याची रॅपिड एंटीजन टेस्ट केल्यास ज्या कर्मचाऱ्यांमध्ये लक्षणे नाहीत परंतु ते पॉझिटिव आहेत असे रुग्ण समोर येऊन कारखान्यांमधील व कारखान्यात बाहेरील कोरोनाचा संसर्ग थांबण्यास मदत होऊ शकते. त्यामुळे दर दहा दिवसांनी औद्योगिक वसाहतीत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची कोरोना चाचणी करणे गरजेचे आहे. तसेच सर्व औद्योगिक वसाहतीं कडे स्वतःची स्वतंत्र अशी सुविधा असणे आवश्यक असून शंभर कर्मचाऱ्यां मागे दोन टक्के बेड असलेले डेडिकेटेड कोविड हेल्थ सेंटर (DCHC) निर्माण करावे अशा सूचनाही यावेळी जिल्हाधिकारी डॉ माणिक गुरसळ यांनी केल्या. उपस्थित असलेल्या प्रतिनिधींकडून आपापल्या कर्मचाऱ्यांची संख्या कोव्हीड साठी केलेल्या सुविधा कर्मचाऱ्यांची केलेली चाचणी याबद्दल जिल्हाधिकाऱ्यांकडून सविस्तर आढावा घेण्यात आला. यावेळी उप जिल्हाधिकारी डॉ.किरण महाजन,जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.कांचन वानेरे, तहसिलदार चंद्रसेन पवार, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. दयानंद सुर्यवंशी व अधिकारी उपस्थित होते.

# वाड्याच्या उपनगराध्यक्ष पदी शिवसेनेच्या वर्षा गोळे बिनविरोध



**वाडा/प्रतिनिधी**

वाडा नगरपंचायतीच्या उपनगराध्यक्ष पदाच्या निवडणूकीत शिवसेनेच्या वर्षा गोळे यांची बिनविरोध निवड झाली असून भाजपाच्या वतीने उपनगराध्यक्ष पदासाठी भरण्यात आलेले रीमा गंधे आणि रामचंद्र भोईर यांनी आपले उमेदवारी अर्ज मागे घेतल्याने ही निवडणूक बिनविरोध पार पडली. वाडा नगरपंचायतीमध्ये एकूण १७ सदस्य संख्या असून शिवसेना ६, भाजप ६, काँग्रेस २, राष्ट्रवादी काँग्रेस, रिपाइं, बहुजन विकास आघाडी यांचे प्रत्येकी १ सदस्य असल्याने भाजपला डावलून शिवसेना, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, रिपाइं व बहुजन विकास आघाडी मिळून महाविकास आघाडीची सत्ता स्थापन केली होती तर शिवसेनेच्या नगराध्यक्षा गीतांजली कोलेकर या जनतेतून थेट निवडून आल्या आहेत. मात्र सत्तास्थापने दरम्यान झालेल्या करारानुसार काँग्रेसच्या तत्कालीन उपनगराध्यक्षा विशाखा पाटील यांनी राजीनामा दिल्याने हे पद रिक्त झाले होते. या पदासाठी आज झालेल्या निवडणूकीत वर्षा गोळे यांची बिनविरोध निवड झाली आहे. दरम्यान या भिवंडी ग्रामीणचे आमदार शांताराम मोरे, विक्रमगडचे आमदार सुनिल भुसारा यांनी उपनगराध्यक्षा वर्षा गोळे यांचे पुष्पगुच्छ देवून अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष निलेश गंधे, जिल्हा परिषद सदस्य नरेश आकरे, पंचायत समितीचे सभापती योगेश गवा, शिवसेनेचे उपजिल्हा प्रमुख सुनील पाटील, तालुका प्रमुख उमेश पटारे, तालुका समन्वयक प्रकाश केणे, कांग्रेसचे मनिष गणोरे, तालुकाध्यक्ष दिलीप पाटील, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष रोहिदास पाटील, युवराज ठाकरे, अशोक गव्हाळे, रोहिदास शेलार, अमिन सेंदू आदी उपस्थित होते.